सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २ सप्टेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २९४ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



निःस्वार्थ, गुणसंपन्न, प्रसन्न, चारित्र्यवान, प्रामाणिक, निर्भय, त्यागी, कर्तव्यकठोर आणि विजिगीषुवृत्तीच्या लोकांची परंपरा निर्माण करणे व या गुणसुमनांनी समृद्ध अशा सुगंधाने समाजात सामूहिक जीवनाची सवय निर्माण करून संपूर्ण समाजात या गुणांची निर्मिती करणे हे संघकार्याचे उद्दिष्ट आहे. ज्याप्रमाणे तप्त अग्नीतील मुशीत सोने शुद्धच होते, त्याप्रमाणे कर्तव्य मार्गावर पुढे सरणाऱ्या व्रती लोकांच्या गुणांना संकटाशी झुंजल्यामुळे झळाळीच प्राप्त होते. अशाच प्रकारे गुणांचा विकास होऊन अशुद्धता नष्ट होऊन ध्येयवादी लोकांचे सामर्थ्य आणि आकर्षण या दोन्ही गोष्टी वृद्धिंगत होतात.

**- भय्याजी दाणी**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## आज ज्येष्ठा गौरी विसर्जन



# 'एससीओ'च्या घोषणापत्रात पहलगाम हल्ल्याचा निषेध

**● दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात दुटप्पीपणा अस्वीकारार्ह ● भारताचा मोठा विजय**

**◆ तियानजिन, १ सप्टेंबर**

शांघाय सहकार्य संघटना अर्थात् एससीओने सोमवारी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात दुटप्पीपणा अस्वीकारार्ह असल्याच्या भारताच्या भूमिकेशी सहमती दर्शवली. भारताचा हा मोठा विजय मानला जात आहे.

येथे झालेल्या दोन दिवसांच्या वार्षिक शिखर परिषदेच्या शेवटच्या दिवशी जाहीर केलेल्या संयुक्त घोषणापत्रात या प्रभावशाली गटाने दहशतवादाविरुद्ध लढण्याचा आपला दृढसंकल्प नमूद केला. या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि इतर अनेक जागतिक नेते उपस्थित होते.



एससीओ परिषदेदरम्यान दिलखुलास गप्पा करताना व्लादिमिर पुतिन, नरेंद्र मोदी, शी जिनपिंग

एससीओ सदस्य राष्ट्रांनी गाझामध्ये इस्रायलने केलेल्या लष्करी हल्ल्यांचा निषेध केला. कारण, त्यामुळे असंख्य नागरिकांचा मृत्यू झाला आणि गाझा पट्टीमध्ये आपत्तिजनक मानवतावादी परिस्थिती निर्माण झाली आहे. या घोषणापत्रात प्रादेशिक सुरक्षा वाढवण्याचे मार्ग नमूद करण्यात आले आणि दहशतवादी लढणे हे एक मोठे आव्हान म्हणून ओळखले.

सदस्य देशांनी २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला, असे घोषणापत्रात म्हटले आहे. एससीओ सदस्य देशांनी पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील खुजदार आणि जाफर एक्स्प्रेसवरील दहशतवादी हल्ल्यांचाही निषेध केला. सदस्य देशांनी मृत्युमुखी पडलेल्यांच्या आणि जखमींच्या कुटुंबीयांबद्दल तीव्र सहानुभूती आणि संवेदना व्यक्त केल्या. दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीवादाविरुद्धच्या लढाईसाठी आपल्या दृढ वचनबद्धतेची पुष्टी करीत असताना, दहशतवादी, फुटीरतावादी आणि अतिरेकी गटांचा भाडोत्री हेतूंसाठी वापर करण्याच्या प्रयत्नांना मान्यता नाही, यावर एससीओ भर देते.

### संयुक्त राष्ट्राच्या सनदेची अंमलबजावणी करणार

दहशतवादी गटांचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या संबंधित ठरावाची आणि संयुक्त राष्ट्राची सनद आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांनुसार पूर्णपणे अंमलबजावणी करण्याची मध्यवर्ती भूमिका एससीओने दर्शवली आहे.

कट्टरवादी आणि अतिरेकी धोक्यांचा सामना करण्यासाठी सार्वभौम राज्ये आणि त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांची प्रमुख भूमिका मान्य केली आहे, असे एससीओने म्हटले आहे.

सदस्य देश सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध करतात. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत दुहेरी निकष अस्वीकारार्ह आहेत यावर भर देतात आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला दहशतवादाचा सामना करण्याचे आवाहन करतात. यात दहशतवाद्यांच्या सीमापार हालचालींचा समावेश आहे, असे घोषणापत्रात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



मुंबईतील सीएसटी रेल्वे स्थानकावर निदर्शने करताना मराठा आंदोलक

# आंदोलकांना बाहेर काढून मुंबईचे रस्ते मोकळे करा

**मनोज जरांगेंना उच्च न्यायालयाने फटकारले**

**◆ मुंबई, १ सप्टेंबर**

मंगळवारी दुपारपर्यंत दक्षिण मुंबईतून आंदोलकांना बाहेर काढा, सर्व रस्ते मोकळे करा आणि मुंबईच्या सर्व प्रवेशद्वारावरून कोणत्याही नव्या आंदोलकांना मुंबईत येऊ देऊ नका, असा निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहे. त्याचवेळी आंदोलन हाताबाहेर गेले आहे, रेल्वे, रस्ते रोखण्याचे समर्थन कसे करू शकता, नियम आणि अटींचे उल्लंघन होत आहे, अशा शब्दात मनोज जरांगेंना न्यायालयाने फटकारले.

ॲमी फाऊंडेशनने रविवारी ही जनहित याचिका दाखल करीत त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार सोमवारी सुटीचा दिवस असूनही विशेष सुनावणी घेण्यात आली. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. महेंद्र रत्ना, ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी बाजू मांडली. तर, आंदोलक मनोज जरांगे यांच्या वतीने ॲड. श्रीराम पिंगळे आणि राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली.

मनोज जरांगे यांनी आंदोलन सुरू करण्यापूर्वी न्यायालयात हमिपत्र दिले होते. या हमिपत्रात सर्व अटी-शर्तींचे पालन करू असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले होते. परंतु प्रत्यक्षात त्या अटींचे वारंवार उल्लंघन झाल्याचे सरकारतर्फे युक्तिवाद करताना वीरेंद्र सराफ यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करताना सांगितले. तर, जरांगेंच्या आंदोलनाला परवानगी वाढवून दिली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

### वाहनांमधून आणली जातेय् दारू : ॲड. सदावर्ते

आंदोलकांना येऊ देऊ नका, असा निर्देश न्यायालयाने दिल्यानंतर, आंदोलक नाही तर, किमान जेवणाच्या गाड्या तरी मुंबईत सोडा. आमचे जेवण अडवू नका अशी मागणी मराठा आंदोलकांच्या वकिलांनी कोर्टात केली. त्यावर मराठा आंदोलक गाडीमधून दारू आणत आहेत, असा आरोप ॲड. सदावर्ते यांनी केला.

### आदेशाकडे सर्वांचे लक्ष

मुंबईतील बिकट परिस्थिती लक्षात घेता न्यायालयाने सुटी असूनही तातडीची सुनावणी घेतली. यात आंदोलकांना चांगलेच फटकारले आणि सरकारलाही धारेवर धरले. मात्र, अंतिम आदेश न्यायालयो अद्याप दिला नसून, मंगळवारी दुपारी पुन्हा सुनावणी घेतली जाणार आहे. यावेळी आंदोलकांनी अटीशर्तींचे पालन केले किंवा नाही. याची माहिती सरकारने न्यायालयाला द्यायची आहे. त्यानंतर न्यायालय आंदोलनावर अंतिम आदेश पारित करणार आहे.

### न्यायालयाने व्यक्त केली नाराजी

न्यायलयाने आंदोलक मनोज जरांगे यांना फटकारले. अटी-शर्तींचे पालन होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. आंदोलकांना वानखेडे किंवा ब्रेबॉन स्टेडियम देण्यात यावे अशी मागणी केली होती. यावरही न्यायालयाने फटकारले, दोन्ही मैदाने ही आयकॉनिक स्टेडियम आहेत. वाटेल ती मागणी कराल का? आज आंदोलक रस्त्यावर कबड्डी खेळतात, उद्या रस्त्यावर क्रिकेट खेळायला सुरुवात कराल, असा संतप्त सवालही न्यायालयाने केला.

## महत्त्वाचे

### अफगाणिस्तानातील भीषण भूकंपात ८०० ठार

**काबुल :** अफगाणिस्तानच्या नांगरहार आणि कुनार प्रांतात रविवारी रात्री १२.४७ वाजता झालेल्या भूकंपात मृतांचा आकडा ८०० वर पोहोचला आहे, तर २००० पेक्षा जास्त लोक जखमी झाले. जलालाबादपासून २७ किमी अंतरावर नांगरहार प्रांतात ८ किलोमीटर खोलीवर भूकंपाचे केंद्र होते आणि रिश्टल स्केलवर भूकंपाची तीव्रता ६ इतकी मोजण्यात आल्याची माहिती यूएसजीएसने दिली.

### अमेरिकेला आठवली भारतासोबतची मैत्री

**नवी दिल्ली :** १ सप्टेंबर चीनमध्ये सुरू असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेच्या निमित्याने जगातील तीन महासत्ता एकत्र येत असताना. याचे पडसाद अमेरिकेत जाणले. भारत, चीन आणि रशियाचे राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान मोदी, राष्ट्राध्यक्ष जिनपिंग आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या बैठकीदरम्यान, भारतातील अमेरिकी दूतावासाने एक पोस्ट केली आहे. यात अमेरिकेला भारतासोबतची मैत्री आठवली. अमेरिका आणि भारत यांच्यातील भागीदारी सतत नवीन उंची गाठत आहे. हे २१ व्या शतकातील एक परिभाषित नाते आहे.

# भारताकडून टॅरिफ कमी करण्याचा प्रस्ताव

**डोनाल्ड ट्रम्प यांची पोस्ट चर्चेत**

**◆ वॉशिंग्टन, १ सप्टेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रूथ सोशल या सोशल मिडीयावर पोस्ट करून पुन्हा एकदा भारतावर टीका केली आहे. भारत आम्हाला भरपूर माल विकतो पण, आमच्याकडून खरेदी मात्र फारशी करीत नाही. भारत तेल आणि शस्त्रांची खरेदी रशियाकडून करतो. सर्वाधिक आयात शुल्क लावणारा देशही भारतच आहे. भारतासोबतचा व्यापार म्हणजे एकतर्फी आपत्ती असल्याचे ट्रम्प म्हणाले.

ट्रम्प यांनी दावा केला की, भारताने अमेरिकन आयातीवरील टॅरिफ कमी करण्याचा प्रस्ताव दिला आहे. मात्र, हे भारताने खूप आधीच करायला हवे होते. ट्रम्प यांची ही पोस्ट शांघाय सहकार्य परिषदेत भारत, रशिया आणि चीनच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये झालेल्या सकारात्मक चर्चेच्या तसेच, भारत-अमेरिकेच्या तणावपूर्ण संबंधांच्या पृष्ठभूमीवर महत्त्वाची ठरली आहे. दरम्यान, ट्रम्प सरकारने भारतीय आयातीवर ५० टक्के टॅरिफ लावला आहे. त्यात २५ टक्के बेस लाईन टॅरिफ असून, रशियाकडून तेल खरेदी केल्याची शिक्षा म्हणून आणखी २५ टक्के टॅरिफ लावण्यात आला आहे. रशियाकडून तेल विकत घेऊन, भारत अप्रत्यक्षपणे युक्रेनवरील हल्ल्यांसाठी मदत करीत असल्याचा आरोप केला आहे. (वृत्तसंस्था)

# हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणीबाबत मसुदा अंतिम टप्प्यात : विखे-पाटील

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. १ सप्टेंबर :**

हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याबाबतचा मसुदा लवकरच अंतिम करण्यात येईल. यासाठी विधितज्ज्ञ आणि महाधिवक्त्यांसोबत सविस्तर चर्चा सुरू असून, न्यायालयीन कसोटीवर टिकणारा निर्णय घेण्यावर भर देण्यात येत आहे. अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पत्रकारांशी दिली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारकडून वेगवान हालचाली सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर ते म्हणाले की, हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याबाबतचा मसुदा लवकरच अंतिम करण्यात येईल. न्यायालयीन कसोटीवर टिकणारा निर्णय घेण्यावर भर देण्यात येत आहे. मात्र, मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेमुळं प्रक्रियेला थोडा विलंब झाला आहे. आंदोलकांनी केलेल्या मागण्यांबाबत गेल्या तीन दिवसांपासून वेगवेगळ्या विधितज्ज्ञांशी चर्चा करीत आहोत. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी न्या. संदीप शिंदे आणि आमचे अधिकारी आंदोलनस्थळी जाऊन आले. त्यांचं निवेदनही प्राप्त झाले आहे. आज सकाळी झालेल्या बैठकीत स्वतः मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय महाधिवक्ता आणि न्या. संदीप शिंदे देखील हजर होते. बैठकीचा मुख्य फोकस हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवर होता.



उच्च न्यायालयात आज एक जनहित याचिका दाखल झाल्यामुळे महाधिवक्त्यांना तिथे जावे लागले. न्यायालयाने या याचिकेच्या सुनावणीदरम्यान काय निर्देश दिले आहेत, हे पाहिल्यानंतर पुन्हा महाधिवक्त्यांसोबत बैठक होईल. त्यानंतरच प्रारूप मसुद्याला अंतिम स्वरूप देता येईल, असेही त्यांनी सांगितले.

# मोदींनी पाकिस्तानला फटकारले

**तियानजिन :** शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट दहशतवादावर हल्ला चढवला आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करून पाकिस्तानला कठोर शब्दांत संदेश दिला. विशेष म्हणजे मोदींनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या उपस्थितीत पाकिस्तानवर घणाघात केला. पहलगाममध्ये दहशतवादाचे एक अतिशय घृणास्पद रूप दिसले. या दुःखाच्या वेळी, आपल्यासोबत उभ्या राहिलेल्या मित्र देशांचे मी आभार मानतो. हा हल्ला केवळ भारताच्या विवेकाला धक्का नव्हता, तर तो प्रत्येक देशाला, मानवतेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला एक उघड आव्हान होते.

### जीएसटी वसुलीत ६.५ टक्के वाढ

**नवी दिल्ली :** सोमवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, देशांतर्गत वाढत्या महसुलामुळे ऑगस्टमध्ये एकूण जीएसटी संकलन ६.५ टक्क्यांनी वाढून १.८६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये एकूण जीएसटी संकलन १.७५ लाख कोटी रुपये होते. गेल्या महिन्यात हे संकलन १.९६ लाख कोटी रुपये होते.








जयपूर येथे झालेल्या मिस टीन इंटरनॅशनल स्पर्धेत स्पेनची लोरेना रुईझ विजेती ठरली.

### किरीट सोमय्या यांच्यावर हल्ला

**छत्रपती संभाजीनगर, १ सप्टेंबर**

भाजपा नेते आणि खासदार किरीट सोमय्या यांच्यावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे हा हल्ला झाला. याबाबतची माहिती त्यांनी 'एक्स' समाज माध्यमावर दिली. ते सोमवारी सकाळी सिल्लोड पोलिस आणि तहसीलदारांकडे ११०० बोगस जन्म प्रमाणपत्रांच्या फसवणुकीचे पुरावे सादर करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या कारवर हल्ला करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाबाहेर माझ्यावर व माझ्या गाडीवर हल्ला करण्यात आला. हा हल्ला मुस्लिम अतिरेक्यांनी केला. पण, सीआयएसएफ कर्मचाऱ्यांनी त्यांना हाकलून लावले.

# मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास आमचा विरोध : भुजबळ

**आजपासून राज्यभरात ओबीसींची उपोषणे आणि आंदोलने**

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ सप्टेंबर-**



मराठा समाजाला आरक्षणाला आमचा विरोध नाही. मात्र त्यांना ओबीसीतून आरक्षण दिल्यास ओबीसीतील मधल्या लहान जातीचे मोठे नुकसान होईल, त्यामुळे त्यांना स्वतंत्र आरक्षणाला आमचा पाठिंबा असून ओबीसी मधून आरक्षण देण्यास आमचा विरोध कायमच असेल, शासनाने तसे केल्यास त्या विरोधात पुन्हा ओबीसीची वज्रमुठ उभी करू, लाखोच्या संख्येने आम्ही मुंबईत येऊ,असा इशारा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे.

मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ओबीसी समाजाच्या नेत्यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत सांताक्रुज येथे बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला ओबीसी बहुजन पक्षाचे अध्यक्ष प्रकाश शेंडगे, समता परिषदेचे कार्याध्यक्ष समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, भटक्या विमुक्तांचे अभ्यासक लक्ष्मण गायकवाड, प्रा. लक्ष्मण हाके,तौलिक समाजाचे अध्यक्ष ईश्वर बाळबुधे,ॲड.मंगेश ससाणे, बंजारा समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.पी टी चव्हाण, कुणबी समाजाचे अध्यक्ष दशरथ पाटील,बापूसाहेब भुजबळ,कुणबी सेना अध्यक्ष विश्वनाथ पाटील, जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष दौलतराव शितोळे ,नवनाथ वाघमारे, डॉ. स्नेहा सोनकाटे, वंजारी समाजाचे नेते ,प्रा. सत्संग मुंढे,धनराज गुट्टे,बाळासाहेब कर्डक,लोणारी समाजाचे अध्यक्ष डॉ. सुदर्शन घेरडे,राष्ट्रीय विणकर समाज अध्यक्ष सुनील मेटे, मुकुंद सोनटक्के,मंजिरी धाडगे, दिलीप खैरे,सदानंद मंडलिक,प्रितेश गवळी, शंकरराव लिंगे,आरिफ काझी यांच्यासह ओबीसी आणि भटक्या विमुक्तांमधील विविध संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...



### जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत कडलास हायस्कूलचे यश

**सांगोला, दि. १ सप्टेंबर -**

सांगोला तालुक्यातील कडलास हायस्कूलच्या इ.६ वी मधील धनश्री विकास गायकवाड, इ.७ वी मधील यशराज दत्तात्रय गायकवाड व इ.८ वी मधील श्रुतिका विजयकुमार गव्हाणे या तिघांनी जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेत धडक मारली आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल संस्थाध्यक्ष, संचालक मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी यशस्वी तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



### कांबळे मंडळातर्फे महिलांना साड्या, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**बार्शी, दि.१ सप्टेंबर-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त येथील अतुल कांबळे मित्र मंडळाच्यावतीने १०५ महिलांना साड्या व १०५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट व खाऊ वाटप करण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन ॲड. रणवीर राऊत यांनी याचे कौतुक केले. मुख्याध्यापक उमाकांत राऊत यांनी कांबळे यांचे आभार मानले. अध्यक्ष आप्पा भालेराव, उपाध्यक्ष राहुल बगाडे, खजिनदार किशोर कोळी, सचिव शुभम कांबळे, सहसचिव कैफ शेख, दादासाहेब दळवी, महादेव पेटाडे, उमेश बारंगुळे, प्रमोद घोडके, सुधीर गव्हाणे, संतोष पाटील, आबा दळवी, अजित देवकर, अनिल शिंदे, हर्षद सय्यद, शुभम जगदाळे, महादेव गव्हाणे, आर्यन यादव, राजेश यादव, तात्या शेंडगे, रितेश मांगडे, हेमंत भालशंकर, कुणाल खंदारे, श्रीकांत रिटे, आरमान शेखान, धीरज पवार, अशपाक कुरेशी, रेहान मुकेबिल, मोहम्मद शेखन, कपिल जमादार, अब्दुल्ला अलजिलानी, तुषार कांबळे रामेश्वर पोळ आदी उपस्थित होते.

### गणेश विसर्जनावेळी काळजी घेण्याचे तहसीलदारांचे आवाहन

**अक्कलकोट, दि.१ सप्टेंबर**



अनंत चर्तुदशी व इतर दिवशी नदी, नाले, ओढे, बंधारा या ठिकाणी श्री गणेश विसर्जन करीत असताना नागरीकांनी सावधगिरी बाळगून कोणतीही जिवितहानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. नदीपात्रालगत विसर्जनाचे हौद तयार करुन सदर ठिकाणी गणेश विसर्जन करावे असे आवाहान तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, तथा तहसीलदार शिल्पा पाटील यांनी केले आहे. अक्कलकोट तालुक्यात यंदाच्या पावसाळा मध्ये मौजे-आंदेवाडी (ज) बोरी नदी पात्रात एक नागरीक, मौजे-शावळ येथील को.प.बंधारा येथे एक नागरीक तसेच कल्लकर्जाळ येथील नदीपात्रात एक नागरीक असे तीन नागरीक वाहून गेलेले आहेत.

# शाळा हस्तांतरणातून होतेय लाखोंची उलाढाल; संस्थाचालकांचा गोरखधंदा

### शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. १ सप्टेबर-**

सोलापूर शहरासह जिल्ह्यातील अनेक भागात खासगी शाळा देणे घेणेचा व्यवसाय जोरात सुरू आहे. संस्थाचालकांच्या या गोरख धंद्यामुळे शिक्षकांना मात्र आर्थिक भुर्दंड आणि मनस्ताप सहन करावा लागत आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने एका संस्थाचालकाची शाळा दुसरा संस्थाचालक घेत असल्याने यामधून लाखो रूपयांची उलाढाल होत आहे. त्यामुळे शिक्षणाचा बट्याबोळ होत असल्याचे दिसून येते.

दहा ते पंधरा वर्षापूर्वी शहरातील संस्थाचालकांकडून शाळा व संस्था विकत घेऊन शेकडो शिक्षकांची भरती करण्यात आली. या शाळा सुरळीत सुरू असताना व गरीबांच्या मुलांचे शिक्षण पूर्ण होत असताना सध्या संबंधित संस्थाचालक शाळा दुसऱ्या संस्थाचालकांना विकत आहेत. पहिली ते सातवीपर्यंत वर्ग असणारी एक शाळा कमीत कमी पन्नास लाख रूपयापर्यंत विक्री होत असल्याचे सांगण्यात येते. विकत घेणारा संस्थाचालकही स्वताची शाळा दुसऱ्याला विकूनच शाळा हस्तांतर करून घेत आहे. यामुळे शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या नोकरीवर गंडांतर येत आहे. शाळा हस्तांतर झाल्यानंतर नवीन संस्थाचालकांकडून त्या शाळेतील शिक्षकांकडून एका शिक्षकाला तीन ते पाच लाख रूपयांपर्यंत डोनेशन घेण्यात येत आहे.



त्यामुळे शिक्षकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. शिवाय शाळा दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर झाल्यामुळे नोकरीचा मनस्तापही होत आहे. त्यामुळे 'तोंड दाबुन बुक्यांचा मार' अशी शिक्षकांची अवस्था झाली आहे. शाळा स्थलांतर झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचेही हाल होत आहेत. शाळा खरेदी विक्रीमधून संस्थाचालकांचा गोरख धंदा सुरू आहे. शाळा हस्तांतरामुळे शिक्षणावर परीणाम होत आहे. मात्र शिक्षकांची हेळसांड होत असल्याने अध्यापनावरही परीणाम होत आहे. शहरातील ठराविक संस्थाचालकांचा शाळा हस्तांतरणाचा नवीन व्यवसाय जोरात सुरू असून शिक्षण विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. शिक्षण विभागातील अधिकार्यांच्या मार्गदर्शनातूनच हा नवीन व्यवसाय जोरात सुरू आहे. विशिष्ट भागात नवीन शाळा सुरू करायचा आणि दहा ते पंधरा वर्षे झाल्यानंतर ती शाळा दुसऱ्याला विकायचा. शाळा सुरू करताना शिक्षकांकडून भरमसाठ डोनेशन घेण्यात येते. मात्र शाळा विकताना संस्थाचालकांकडून शिक्षकांच्या डोनेशनचा विचार न करता स्वताच्या फायद्यासाठी शाळा विकली जात आहेत. नवीन जागी शाळा स्थलांतर झाल्यानंतर नवीन इमारत बांधकामापासून ते विद्यार्थ्यांची शोधाशोध करेपर्यंत शिक्षकांची दमछाक होत आहे. शिक्षकांकडून प्रतिसाद न मिळाल्यास नोकरीवरून काढण्याची धमकीही दिली जाते. त्यामुळे अनेक शिक्षक संस्थाचालकांच्या दबावाखाली काम करीत आहेत. आदिवासी अथवा आश्रमशाळा हस्तांतर करून घ्यायचे आणि विशिष्ट परीसरातील मुलांचे प्रवेश दाखवायचे, असा प्रकार सुरू आहे. यामागे मोठ्या प्रमाणात बोगसगिरी असून राजकीय पदाधिकाऱ्याच्या वरदहस्ताने हा गोरखधंदा उघडपणे सुरू आहे. मात्र यामुळे शिक्षणाचा बट्याबोळ होत आहे.

**अनेक शिक्षक बीपी व शुगरचे रूग्ण :** संस्था विकण्यापूर्वी शिक्षकांकडून दोन ते तीन लाख रूपये घेतली जाते. अन्यथा जिल्हा परिषदेत समायोजन करून जिल्ह्यातील अन्य शाळेत पाठविणार असल्याचे सांगण्यात येते. खासगी संस्थाचालकांकडून शिक्षकांची सर्रास लूट सुरू आहे. शिवाय पगारावेळी दरमहा पाच ते दहा टक्के रक्कम देणे बंधनकारक आहे. संस्थाचालकांच्या दबावामुळे अनेक शिक्षक बीपी व शुगरचे रूग्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

**गरीबांच्या विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय :** शहरातील गरीब व सामान्य कुटुंबातील मुलांना विविध आमिष दाखवून खासगी शाळेत प्रवेश घेण्यास भाग पाडले जाते. त्यानंतर दहा ते पंधरा वर्षानंतर त्या परीसरात शाळा सुरळीत चालुन अनुदान सुरू झाल्यानंतर गरीब मुलांच्या शिक्षणाचा विचार न करता शाळा विकली जात आहेत. त्यामुळे गरीब मुलांचे शिक्षण बंद होत असल्याने भविष्य अंधकारमय बनत आहे.



## मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त सोशल महाविद्यालयात ११० रक्तदात्यांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

रक्तदान म्हणजेच जीवनदान'' या उदात्त संदेशाला प्रत्यक्ष कृतीत उतरवणारा एक सामाजिक व मानवतावादी उपक्रम सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट्स अँड कॉमर्स म हाविद्यालयामध्ये मोहम्मद पैगंबर जयंतीच्या औचित्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे रक्तदान शिबिर सोशल महाविद्यालय, प्रोफेट फॉर ऑल, एचडीएफसी बँक आणि अतहर ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ११० रक्तदात्यांनी आपल्या रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटने प्रभारी प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक नारायणकर, एन.सी.सी. ऑफिसर कॅप्टन डॉ. गॉस अहमद शेख, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. मुश्ताक शेख,या शिबिरास उर्दू विभाग प्रमुख डॉ. शफी चोपदार, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. आसमा खान, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जैनुद्दीन मुल्ला, भूगोल विभाग प्रमुख डॉ. सचिन राजगुरू, प्रा. राहिसा मिर्झा, प्रा. वाहिद जमादार, प्रा. एम. डी. शेख, प्रा. टी. बी. लडफ, प्रा. तसलीम वड्डो प्रा. जैनुद्दीन पटेल व प्रा. इन्नुस शेख, एचडीएफसी बँकेचे उमर विजापुरे, इकबाल मुजावर उपस्थित होते.

## लोकगीतांनी अक्कलकोटकरांची सांज ठरली अविस्मरणीय

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ सप्टेंबर-**

लोकगीत गावा गावापर्यंत पोहचले आहे लोकगीत कधीच संपणारे नाही लोक गीताचा प्रारंभ कोकणातुन झाला आहे. गायकाबरोबर वादक चांगला असेल तर गायकाला स्फुर्ती चढते. दोघेही उत्तम असेल तर चांगल्या गायनाची निर्मीती होते चोखंदळ प्रेक्षक व त्यांच्या कडून मोठा प्रतिसाद मिळाल्यास कला परमोच्य शिखर गाठते असे प्रतिपादन निर्माते संकल्पना निवेदक स्वप्निल रास्ते यांनी केले. निर्मिती व निवेदक स्वप्निल रास्ते यांचे होते. उत्सव लोक गीतांच्या कार्यक्रमात गायक कलाकार सुजित सोमण, वेदिका दामले अमिता घुगरी यांनी सादर केलेल्या रसीक श्रोत्यांच्या ओठावरील गीतांनी अक्कलकोटकरांची सांज अविस्मरणीय ठरली.

**विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला पुष्प – ५ वे**

विवेकानंद प्रतिष्ठान अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ५ वे पुष्प लोक गीतांच्या कार्यक्रमाने गुंफण्यात आले. प्रारंभी दिपप्रज्वलन व प्रतिमापुजन संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, प्रा. भिमराव साठे, मुकुंद पतकी, बसवराज शास्त्री, वागदरे सर, मनोहर चव्हाण आदिंच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, मुकुंद पतकी, उषा हंचाटे, प्रा.साठे, गुरुपादप्पा आळगी, संतोष वगाले यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. सर्व कलाकारांचा परिचय बापुजी निंबाळकर यांनी करून दिला. याप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी, अशोक येणगुरे, प्रा. भिमराव साठे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, विवेकानंद पतसंस्थेचे व्यवस्थापक चंद्रकांत दसले, दयानंद परिचारक, डॉ. विपुल शहा, निनाद शहा, शिवशरण टाके, शिवशरण वाले, बाळा शिंदे, विजय शिंदे, मेजर शेख, महेश लोकापुरे, महेश कापसे, निलकंठ कापसे, मल्लीनाथ मसुती, गुरुपादप्पा आळगी, बाबा भूसनूरे, बापुजी निंबाळकर, ओंकार पाठक, महावीर येणगुरे, राजशेखर बोदले, राजशेखर उमरणीकर आदि उपस्थित होते.



**गणेश वंदना, छत्रपती शिवरायांची आरती, गण गौळण, भुपाळी, जांभुळ पिकल्या झाडाखाली, आम्ही ठाकर या रानाची पाखर, धनगराची मेंढरं, अभंग, खेळ मांडियेला वाळवंटी अशी प्रेक्षकांच्या ओठावरील लोकगीतं, अभंग सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली.**



## शमी विघ्नेश मंदीरात गणेश पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात सोमवारी अक्कलकोट तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरुळे व महावितरणचे कनिष्ठ अभियंता अरुण कांबळे यांच्या हस्ते पूजा संपन्न झाली.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरुळे आणि कनिष्ठ अभियंता अरुण कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपकृषीअधिकारी सतीशकुमार वाघमोडे, सहा. कृषीअधिकारी सतीश संगोळगी उपस्थित होते.

**मंगळवार दि. २ सप्टेंबर रोजी सायं. ७ वा. रमाकांत डाके, मुख्याधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद यांच्या हस्ते श्रींची पूजा आयोजित करण्यात आली आहे.**

गेल्या सहा दिवसापासून श्रींचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत आहे. शमीवृक्षाखाली गेल्या ३२ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर व सभामंडप बांधण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमीविघ्नेश गणेश असल्याने त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे. या प्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मुख्य पालखी संयोजक संतोष भोसले, मनोज निकम, प्रा.शरणप्पा अचलेर सर, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, मुख्य सुरक्षा रक्षक महादेव अनगले, अनिल गवळी, ज्ञानेश्वर भोसले, ॲड.फहीम पीरझादे, आप्पा हंचाटे, रोहन शिर्के, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, रमेश हेगडे, मुन्ना कोल्हे, राजेंद्र काटकर, बाबुशा महिंद्रकर, शिवाजी उपरे, समर्थ घाटगे उपस्थित होते.

# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था : सारथी

**राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.**

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत म ार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

### शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०20 ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षेमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०20 ते २०२३ या कालावधीत १०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग एक मध्ये २२९ तर वर्ग दोन मध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झाली.

### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

सारथी मार्फत राबविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

### श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण उपक्रम

या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

### परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

**महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत**

मुला-मुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते, यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेअंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

### उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (खत्रढ) आणि थळपश ईशुळपस रपव श्रलेहेश्र ढशलहपेश्रेसू (थइढ) विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. खत्रढ मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व थइढ मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रूपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक म राठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात एक हजार लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रिय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### निबंध स्पर्धांचे आयोजन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी व इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिक ठेवण्यात आली होती.

### छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळविण्याच्या दृष्टीकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू म हाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादी पैकी १३ इनक्युबेशन केंद्राने सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

### सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना

सारथी मार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्र, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये पीएचडी करणाऱ्या १०८६ विद्यार्थ्यांनी एक लाख १८ हजार ८३४ सीड बॉल तर अधिकारी कर्मचारी यांनी १३ हजार ६०० सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल २०२४ मध्ये ७५ किल्ल्यांच्या परिसरात टाकण्यात आले. सरदार शिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन अभियानांतर्गत ३८ किल्ले व दोन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ८५८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चावडी वाचन अभियानामध्ये पाच हजार विद्यार्थ्यांद्वारे ग्रामसभांमध्ये योजनांची माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

### सारथीची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम

सारथीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी सारथीचे संकेतस्थळhttps://www.sarthi-maharashtragov.in/, सारथी अँड्रॉइड एप्लीकेशन https://play.google.com/store/apps/details?id=com.srthinew, फेसबुक पेज facebook.com/sarthimaharashtra, यूट्यूब चॅनल sarthipune178, सारथी व्हाट्सप चॅनेल https://whatsapp.com/channel/0029VaELiPmJUM2hyekQ6R1R सुरू आहे. ज्या द्वारे सारथीच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत आहे. विविध युवा शिबिरे, सारथी दिनदर्शिका वाटप यासारखे उपक्रमातून लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येत आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते. हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**-संध्या गरवारे-खंडारे**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# गॅस गळतीने दोन बालकांसह वृध्देचा मृत्यू

## दोघांवर उपचार सुरू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

रात्री झोपताना गॅस व्यवस्थित बंद न झाल्याने १० बाय ५च्या हवाबंद खोलीत झोपलेले पाच जण झोपेतच गुदमरून बेशुद्ध झाल्याची घटना रविवारी सोलापुरात घडली. त्यातील दोन्ही बालकांचा रात्री मृत्यू झाला. लष्कर, बेडरपूल येथे सकाळी ११च्या सुमारास ही घटना उघडकीस आली होती. दरम्यान उर्वरित तिघांवर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना सोमवारी या वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

या घटनेमध्ये आता हर्ष बलरामवाले (वय ६), अक्षरा बलरामवाले (वय ४) या बहिण-भावासोबत विमल बलरामवाले (वय ६०) या महिलेचा देखील मृत्यू झाला आहे. युवराज मोहनसिंग बलरामवाले (वय ४०), रंजना युवराज बलरामवाले (वय ३५) यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, सर्वांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. ही घटना गॅस गळती की विषबाधा, याचा पोलिस तपास करत आहेत.

बेडरपूल, लष्कर येथे युवराज व त्याची पत्नी रंजना, मुलगा हर्ष, मुलगी अक्षरा, आई विमल हे एकत्र राहतात. युवराज हा गवंडी तर पत्नी रंजना ही विडी कामगार आहे. आई विमलही मजुरीचे काम करतात. सर्वजण रविवारी सकाळी उठले नाहीत. शेजारी व नातेवाईकांनी उठवण्याचा प्रयत्न केला पण घरातून प्रतिसाद मिळाला नाही. नातेवाइकांनी दरवाजाच्या फटीतून पाहिले असता सर्वजण झोपलेले दिसले. मात्र लहान मुलांच्या तोंडातून फेस येत असल्याचे दिसले. ते पाहून त्यांनी हंबरडा फोडला. नागरिकांनी घरावरील पत्रा काढून खोलीत प्रवेश केला. त्यावेळी घरात गॅसचा वास येत होता. दरवाजाची कडी काढून अगोदर हर्ष व अक्षरा या दोन मुलांना तत्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलविले. घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

ही घटना रविवारी सकाळी अकराच्या सुमारास लष्कर, बेडरपूल येथील बलरामवाले यांच्या घरात उघडकीस आली. पाचजणांना बेशुध्द अवस्थेत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते. सहा तासाच्या संघर्षानंतर हर्ष व अक्षरा या दोघांचा रविवारी रात्री उपचार झाला. त्यानंतर सोमवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास विमल बलरामवाले या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. युवराज बलरामवाले व त्याची पत्नी रंजना या दोघांवर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. मयत झालेल्या तिघांचे शव विच्छेदन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये त्याच्या फुप्फुसावर सूज असल्याचे दिसून आले, तसेच त्याचा मृत्यूही विषारी वायू मुळे झाल्याचा अंदाज डॉक्टरांनी वर्तवल्याचे सूत्रांकडून माहिती मिळाली.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

# जिल्ह्यात साडेचार हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

गणेशोत्सव काळात कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी ही प्रतिबंधात्मक कारवाई केली जात असल्याचे सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून सांगण्यात आले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात जवळपास साडेचार हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून अनेकांना हद्दपारीच्या किंवा तडीपारीच्या नोटीस देण्यात आलेल्या आहेत.




सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधुम सुरु आहे. सण-उत्सवाच्या कालावधीत कोणीही अनुचित प्रकार करू नयेत म्हणून ज्याच्यावर एक किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बीएनएसएस १६८, १२६, १२८, १२९, १७० १६३ कलमा अंतर्गत तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम १०२, १२२, ५५, ५६, ५७ नुसार कारवाई केली जात आहे.

रेकॉर्डवरील सर्व गुन्हेगारांवर पोलिसांची नजर असली पाहिजे आणि त्यांच्यावर नियंत्रण असला पाहिजे यासाठी ही प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे. गणेशोत्सव काळात कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी ही प्रतिबंधात्मक कारवाई केली जात असल्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले. याशिवाय ज्या मंडळांवर किंवा कार्यकर्त्यांवर या आधीचे गुन्हे दाखल झाले असतील अशाही लोकांवर यामध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.

आतापर्यंत अनेकांना तडीपारीच्या नोटीसा देखील बजावण्यात आल्या आहेत. तसेच खून, खुनाचा प्रयत्न, मारामारी, बेकायद हत्यार बाळगणे, दहशत माजवणे असे गुन्हे दाखल असलेल्या आरोपीची यादी तयार करण्यात आली आहे. या गुंडावर देखील कारवाई करण्यात येत आहे.



# मुस्लिम बांधवांकडून गौरीचे पूजन

## हिंदू मुस्लिम राष्ट्रीय ऐक्याचे हे प्रतीक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. १ सप्टेंबर-**

तालुक्यातील सिंदखेड येथील गेल्या १५ वर्षापासून नवाज सय्यद व फतरुद्दीन सय्यद या दोन भाऊ गौरी सण साजरा करतात. हिंदू धर्माप्रमाणे गौरीचे आगमन, पुजन व आरास करतात. हिंदूचा गौरी पुजन सण मुस्लिम बांधवांनी भक्तीने साजरा केल्याने हिंदू-मुस्लिम राष्ट्रीय ऐक्याचे हे प्रतीक असलेले सिंदखेड गावचे सय्यद कुंटुबाने तालुक्यातून साऱ्याचे लक्ष वेधुन घेतले आहे. त्यामुळे त्यांचे हिंदू कुटुंबाकडून कौतुक होत आहे. हिंदू संस्कृतीप्रमाणे गौरीची आरती करणे, पूजा करणे त्याची सजावट करणे हे सर्व काम हे दोन्ही भाऊ व त्यांचे कुटुंब मिळून एकत्रितपणे करतात.

# कल्लकर्जाळ बंधाऱ्यात तरुण गेला वाहून; गणपती विसर्जनावेळी घडली घटना

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१ सप्टेंबर**

तालुक्यातील कल्लकर्जाळ कुडल बंधाऱ्यावरून गणपती विसर्जन करताना तोल जाऊन रविवारी दुपारी अनिल रेवप्पा कोळी हा १८ वर्षाचा तरुण पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला. २४ तास उलटून गेले तरी शोधकार्य सुरू असून अद्याप शोध लागला नाही. अक्कलकोट तालुक्यात दोन दिवसांत ही दुसरी दुर्दैवी घटना घडल्याने शोककळा पसरली आहे.



कल्लकर्जाळ येथे पाच दिवसांच्या गणपती विसर्जनासाठी गणेश मंडळाचा कार्यकर्ता कल्लकर्जाळ येथे सीना नदीत बुडाल्याची घटना ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:३० वाजता घडली. ग्रामदैवत कलमेश्वर मंदिरात बाल गणेश मंडळाने गणरायाची प्रतिष्ठापना केली होती. रविवारी पाचव्या दिवशी मूर्ती विसर्जनासाठी सायंकाळी ७:३० वाजता बारावी वर्गात शिकत असलेला अनिल आणि त्याच्या सोबत दहा-बारा मुले मिळून मिरवणुकीने सीना नदीत गेले. तेथे विसर्जन करीत होते. दरम्यान, बंधाऱ्यावर लोखंडी गेट नसल्याने अनिल हा तोल जाऊन पडून वाहून गेला. रात्री उशिरापर्यंत ग्रामस्थांनी शोध घेतला. मात्र, तो आढळून आला नाही. त्याच्या पाठीमागे आई, वडील, भाऊ, काका असा परिवार आहे. या घटनेची माहिती ग्रामस्थांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना दिली. त्यानंतर तहसीलदार शिल्पा पाटील, पोलिस निरीक्षक सुरेश चिल्लावार, पोलिस कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, पंढरपूर येथून आपत्ती व्यवस्थापन पथकाला याची माहिती देण्यात आली. तसेच नागरिकांनी शोधण्याचा प्रयत्न केला. आपत्कालीन पथक सोमवारी सकाळी येणार आहे. या घटनेमुळे कल्लकर्जाळ येथे शोककळा पसरली आहे.



सोलापूर : लकी चौक येथील श्री समर्थ तरुण मंडळाच्या श्रीं ची पूजा सोलापुरातील पत्रकारांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी तरुण भारतचे संपादक प्रशांत माने. ज्येष्ठ पत्रकार हेमंत चौधरी, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनिष केत, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, एस न्यूजचे शिवाजी सुरवसे, अमोल व्यवहारे, अभिषेक अदेप्पा, अमोल रामपुरे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब रोडगे, अध्यक्ष रोहित नलावडे आदी.

# महापालिका निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना फुटल्याची अफवा

## प्रभाग रचना नव्हे तर स्वच्छता अभियान संदर्भातील यादी : पवार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना जाहीर होण्यापूर्वीच फुटली असल्याची अफवा वजा चर्चेला आज शहरात उधाण आले होते. यामुळे राजकीय वर्तुळ तसेच इच्छुकांमध्ये मोठी खळबळ उडाली असल्याचे दिसून आले. मात्र ही प्रारूप प्रभाग रचना नव्हे तर जुन्या प्रभागानुसार स्वच्छता सर्वेक्षणासाठीची पालक अधिकाऱ्यांची यादी असल्याचे स्पष्टीकरण महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिले आहे.

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. दरम्यान, आज सोमवारी सायंकाळी २६ प्रभाग निहाय ठिकाणांची माहिती असलेली एक यादी सोशल मीडियावर व्हायरल झाली. या यादीमध्ये प्रभाग क्रमांक, अधिकारी/ पदनाम/ प्रभागांमध्ये येणारे मुख्य ठिकाणांची नावे, आरोग्य निरीक्षक, रूट क्रमांक, मोबाईल नंबर आणि झोन क्रमांक अशा पद्धतीने माहिती आहे. ती यादीच प्रारूप प्रभाग रचना असल्याची अफवा वजा चर्चेला उधाण आले. बघता बघता ही यादी राजकीय वर्तुळांबरोबरच सर्वत्र पोहोचली. यामुळे प्रारूप प्रभाग रचना जाहीर होण्यापूर्वीच फुटली असल्याचे अफवा सर्वत्र पसरली आहे. दरम्यान, एका व्हाट्सअप ग्रुपवर ही प्रारूप रचना फुटल्याचे मेसेज पडले. मात्र ती प्रारूप रचनेची यादी नसून स्वच्छता अभियानची नियोजन यादी असल्याचे स्पष्टीकरण भाजपचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिल्याचे दिसून आले. त्यावर उलट सुलट चर्चा होत असल्याचे दिसून आले.

# ‘कृषी समृध्दी योजने’तून जिल्ह्याला मिळणार १६ कोटीचा निधी

## महाडिबीटीच्या योजनांसाठी १२९ कोटीचा अतिरिक्त निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

कृषी समृद्धी योजना ही महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवण्यासाठी सुरू केलेली एक योजना आहे. या योजनेअंतर्गत पुढील पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपयांची वार्षिक गुंतवणूक केली जाणार असून, हवामान बदलाच्या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कृषी समृद्धी योजनेतून सोलापूर जिल्ह्याला १६.१५ कोटी रुपये निधी मिळणार असून, हे पैसे शेतकऱ्यांच्या नाविण्यपूर्व कामासाठी (शेतकऱ्यांच्या स्थानिक गरजांच्या पूर्ततेसाठी) वापरले जाणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. १) दिली. दरम्यान, महाडिबीटीच्या पूर्वीच्या योजनांमध्ये भर घालण्यासाठी जिल्ह्याला अजून १२९ कोटीचा अतिरिक्त निधीही मिळणार असल्याचेही भोसले यांनी सांगितले.

कृषी समृद्धी योजना नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या धर्तीवर असून, डीबीटीद्वारे राबवली जाणार आहे. योजनेचा उद्देश उत्पादन खर्च कमी करून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीसाठी कृषी समृद्धी योजना राबविण्यात येणार आहे. राज्य सरकारने सर्वसमावेशक पीकविमा योजनेत सुधारणा करीत पीक कापणी प्रयोगावर आधारित सुधारित पीकविमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

### योजनेतून शेतकऱ्यांना होणार फायदा

हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हवामान अनुकूल, बाजार केंद्रित, नवीन तंत्रज्ञान आधारित आणि सर्वसमावेशक कृषी विकासाचा मार्ग शेतकऱ्यांकरिता तयार करण्यासाठी यंदापासून कृषी समृद्धी योजना राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याचा फायदा शेतकरी बांधवांना होणार आहे.

**- शुक्राचार्य भोसले,**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर

### योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये:

राज्यातील कृषी क्षेत्राला भांडवली गुंतवणूक वाढवून अधिक सक्षम करणे. शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या संकटातून बाहेर काढणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. राज्याच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणणे. दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक या योजनेअंतर्गत केली जाणार आहे. पुढील पाच वर्षांसाठी ही योजना लागू केली जाईल. या योजनेतून लाभाचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातील.

# एआयमुळे सुमारे ९० टक्के कारकुनी कामे नष्ट होणार : डॉ. शिकारपूर

## उद्योग बँक व रोटरी बौद्धिक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे तंत्रज्ञान डिजिटल डेटावर आधारित माहिती देऊ शकते, मात्र नॉन-डिजिटल डेटावर काम करण्यात त्याला मर्यादा आहेत. एआय वापरून सुरू केलेल्या तब्बल ८० टक्के स्टार्टअप्स अयशस्वी झाले आहेत. तरीसुद्धा येत्या काळात एआयमुळे सुमारे ९० टक्के कारकुनी कामे नष्ट होणार असून, त्यामुळे कारकुन वर्गावर बेरोजगारीची वेळ येऊ शकते, असे मत पुण्याचे एआय अभ्यासक डॉ. दीपक शिकारपूर यांनी व्यक्त केले.



सोलापूर उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ व रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेत त्यांनी ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स सर्वांसाठी’ या विषयावर पाचवे पुष्प गुंफले. समितीचे प्रेसिडेंट यल्लादास अध्यक्ष श्रीनिवास बिंगी, रोटरी अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशिनाथ कुंटला, जिल्हा यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, सुयश खानापुरे उपस्थित होते. वक्त्यांचा परिचय बुचय्या गुंडेटींनी करून दिला, प्रा. विठ्ठल वंगांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विलास बेत, डॉ. ज्योती चिडगुपकर, श्रीनिवास इट्टम, डॉ. संजय मंठाळे, प्राचार्य एस. बी. क्षीरसागर, प्राचार्य तुकाराम शेवाळे, प्राचार्य मोहन देशपांडे आदी उपस्थित होते.

### आनंद माडगुळकर यांचे आज व्याख्यान

मंगळवार, २ सप्टेंबर रोजी पुण्याचे आनंद माडगुळकर ‘माझ्या खिडकीतून गदिमा’ या विषयावर व्याख्यान देतील. ही व्याख्यानमाला रोज सायंकाळी साडेसहा वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होत आहे.

## निधन वृत्त...

### सुरेश काळे



**अक्कलकोट: दि १ सप्टेबर**

सेवा निवृत्त पोलिस निरीक्षक सुरेश राजाराम काळे (वय ७५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, एक भाऊ असा परिवार आहे. अक्कलकोटच्या नगरसेविका सोनाली शिंदे यांचे ते वडील होत. काँग्रेस नेते अरुण जाधव यांचे मेव्हणे होत.

### राधाबाई चव्हाण



**टेंभुर्णी, दि.१ सप्टेंबर-**

येथील राधाबाई शंकर चव्हाण (वय-५७) यांचे ०१ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तिन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्या टेंभुर्णी येथील इंजिनीयर किरण चव्हाण यांच्या मातोश्री होत.

# महापालिकेतील ४३ लिपिकांच्या विविध विभागात बदल्या

- ३८ कश्रेली, वमुले २ तर ३ वश्रेलीचा समावेश
- महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

महापालिकेतील ४३ लिपिकांच्या विविध विभागात अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये ३८ कनिष्ठ श्रेणी लिपिक, २ वरिष्ठ मुख्य लेखनिक तर ३ वरिष्ठ श्रेणी लिपिक यांचा समावेश आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज या संदर्भात आदेश काढले आहेत.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तसेच प्रशासकिय कारणास्तव नमूद बिगर तांत्रिक पदावर कार्यरत सेवकांची नमूद कार्यालयाकडे या आदेशाच्या दिनांकापासून बदलीने नियुक्ती करण्यात येत आहे. यामध्ये मुख्य लेखा परीक्षक विभागातील वरिष्ठ मुख्य लेखनिक जयंत क्षीरसागर यांची अंतर्गत लेखा परीक्षक विभागात बदली करण्यात आले आहे. अंतर्गत लेखापरिक्षक विभातील वरिष्ठ मुख्य लेखनिक अमर कादे यांची मुख्य लेखापरिक्षक विभागात बदली झाली आहे.

तीन वरिष्ठ श्रेणी लिपिकांच्याही बदल्या झाल्या असून यामध्ये शहाजहानबेगम शेख यांची आरोग्य विभागातून विभागीय कार्यालय क्रमांक आठ मध्ये बदली करण्यात आली आहे. विभागीय कार्यालय क्रमांक आठ येथील तेजस्विता कासार यांची आरोग्य विभागाकडे तर भूमी व मालमत्ता कार्यालयाकडील निर्मलकुमार शितोळे यांची निवडणूक व जनगणना विभागाकडे बदली झाली आहे. तसेच ३८ कनिष्ठ श्रेणी लिपिकांच्याही महापालिकेतील विविध विभागात बदल्या करण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या नियंत्रण आणि मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागाने बदल्याचे नियोजन केले. बदल्या संदर्भात महापालिका आयुक्तांनी आज आदेश काढले आहेत.



संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी साप्रवि कडील दि.३० नोव्हेंबर २०२० चे कार्यालयीन आदेशातील निर्देशानुसार त्यांचेकडील असलेले कार्यभार ( ) खातेप्रमुख यांचेकडे दि.२ सप्टेंबर २०२५ अखेर हस्तांतर करुनच बदलीच्या ठिकाणी रूजू व्हावे. नमूद अधिकारी / कर्मचारी यांना या आदेशान्वये त्यांचे सध्याचे कार्यरत पदावरून वरीलप्रमाणे कार्यभार हस्तातरण करताच दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी बदलीच्या ठिकाणी रूजु होणेकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे.त्यांनी नेमून दिलेल्या बदलीच्या ठिकाणी रूजू होऊन रूजू रिपोर्ट एक प्रत सामान्य प्रशासन विभागाकडे बिनचूकपणे सादर करावी. संबंधित विभागानी सदर अधिकारी/ कर्मचारी त्यांचे विभागात रुजू झाल्याबाबतची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे तात्काळ सादर करावी, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

### राजकीय दबाव आणल्यास शिस्तभंगाची कारवाई

दरम्यान, बदलीच्या ठिकाणी रूजू न झाल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित खातेप्रमुख यांनी या कार्यालयाकडे सादर करावा. बदली प्रकरणी कुठल्याही प्रकारे राजकीय दबाव अथवा संघटनेमार्फत दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ मधील नियम क्र. २३ चे उल्लंघन केल्याचे समजून त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आदेशात म्हटले आहे.

# तरुणीस लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १ सप्टेंबर-**

एका २३ वर्षीय तरुणीस लग्नाचे अमिष दाखवून पळवून नेवून तिच्या इच्छेविरुध्द शारिरीक संबंध ठेवून गर्भवती केल्याप्रकरणी समाधान श्रीपती कसबे याच्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, यातील पिडीतेच्या वडिलाचे दुकान असल्यामुळे ती दुकानावर बसत होती. आरोपी हा येवून काही तरी घेण्याचा बहाना करुन दुकानात येत असे. तू मला खूप आवडतेस माझ्या तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणत असताना पिडीतेने त्यास साफ नकार दिला होता.त्यानंतरही आरोपीने पिडीतेस लग्न करुया असे म्हणाल्यानंतर त्यास पिडीतेने होकार दिला. यावेळी आरोपीने पिडीतेस एक संपर्क साधण्यासाठी छोटा मोबाईलही घेवून दिला. त्यामध्ये सीमकार्ड टाकून दोघांचे एकमेकाशी संभाषण होत असे. एकदा आरोपीने पिडीतेस एका फॉरेस्टमध्ये भेटण्यास बोलावून घेतले. त्यावेळी आपण लग्न करु असे म्हणून गोड बोलून आरोपीने पिडीतेशी शारीरिक संबंध ठेवले. तद्नंतर अधून मधून सतत फॉरेस्ट मध्ये अनैतिक संबंध ठेवले जात असे. या दरम्यान पिडीतेस मासिक पाळी आली नाही. तिने प्रेग्नंसी चेक केली असता ती गरोदर असल्याचे समजले. यानंतर आरोपीने पिडीतेस आपण पळून जावून लग्न करु असे म्हणाल्यावर दि.६ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता फॉरेस्टकडे ये असे सांगितले. पिडीतेने सर्व आवरुन ९.३० वाजता फॉरेस्टकडे गेली,त्यावेळी आरोपी व त्याचा मित्र तेथे उपस्थित होते. आरोपीने पिडीतेस मोटर सायकलवर बसवून पुढे मिरज येथे नेले. तेथील भोसे गावात आरोपीने त्याचे ओळखीने शेतातील एक खोली भाड्याने घेतली. त्यामध्ये संसार उपयोगी साहित्य ठेवून पिडीतेसह तो राहू लागला. आरोपी ट्रॅक्टर वर ड्रायव्हर म्हणून काम करु लागला. तेथे आरोपी दररोज पिडीतेशी शारिरीक संबंध ठेवत असे,पिडीतेने वारंवार लग्न कधी करायचे? असे विचारल्यावर नंतर करु असे तो म्हणत असे. वारंवार लग्नाचे अमिष दाखवून शारिरीक संबंध ठेवल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लातूरकर हे करीत आहेत. आरोपीला अद्याप अटक नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पुरस्काराचा सन्मान!

प्रत्येक वर्षातील सप्टेंबर महिना हा जगभरातील आणि देशातीलही मुलींच्या जन्माची प्रतिष्ठा आणि महत्त्व अधोरेखित करणारा असतो. तो महिना आता सुरू झाला असतानाच देशाच्या आणि देशातील तमाम महिला-मुलींच्या आत्मविश्वासास नवी उभारी देणारी एक बातमी जगाच्या चर्चेचा मुद्दा झाली ही केवळ महिलांच्याच नव्हे, तर उभ्या भारताच्या अभिमानाची बाब ठरली आहे. म्हणूनच, या बातमीची दखल घेताना या अभिमानाचे समाधान देशास मिळवून देण्यास कारणीभूत ठरलेल्या संस्थेचे अभिनंदन करावयास हवे. काही पुरस्कारांमुळे व्यक्ती किंवा संस्थांचा सन्मान होतो. या संस्थेला मिळालेल्या पुरस्कारामुळे त्या पुरस्काराच्या सन्मान झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. राजस्थानाच्या एका लहानशा आणि दुर्गम अशा सुमारे ५० गावांत या संस्थेच्या कामाची बीजे रुजली आणि बघता बघता या संस्थेच्या कार्याने यशाचे उत्तुंग शिखरही गाठले. खरे म्हणजे, अशी कामे ही आपल्या सामाजिक आणि पारंपरिक विचारसरणीच्या पराभवाची प्रामाणिक कबुली असते. गेल्या अनेक दशकांत शिक्षण, प्रगती, सामाजिक समतेच्या संधी आणि लिंगभेदातून जन्माला आलेल्या मानसिकतेमुळे देशातील महिलांच्या प्रगतीचा प्रश्न सातत्याने उपेक्षित राहिला होता. गेल्या जवळपास शंभर वर्षांच्या सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेतून याची खंत डोके वर काढू लागली आणि स्त्री शिक्षणाच्या प्रेरणादायी कामाची वाटचाल सुरू झाली. ही वाटचाल संघर्षमय होती. ब्रिटिश काळात सुरू झालेली जागृती, स्वातंत्र्यानंतरची धोरणे आणि आजच्या काळातील स्त्रियांचा वाढता सहभाग असे या वाटचालीचे टप्पे ठरविता येतील. या प्रत्येक टप्प्यातून सामाजिक बदलाचा प्रवाह उलगडतो. राजस्थानातील शाळाबाह्य मुलींच्या शिक्षणाचा वसा घेऊन गेल्या काही वर्षांत वीस लाखांहून अधिक मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करून घेऊन आज जवळपास तीस हजार गावांतील उपेक्षित, वंचित मुलींना शिक्षणाची कवाडे खुली करणाऱ्या एज्युकेट गर्ल्स नावाच्या बिगरशासकीय संस्थेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचा रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानाच्या रूपाने मॅगसेसे पुरस्कार विजेत्यांच्या प्रतिष्ठित यादीत यंदा भारताचा समावेश झाल्याने, या पुरस्कार विजेत्या संस्थेने देशाच्या शैक्षणिक विश्वात इतिहासाचे नवे पान समाविष्ट केले आहे. एज्युकेशन गर्ल्स या नावाने देशात परिचित असलेल्या या संस्थेचे काम आता देशाच्या विविध भागांतील ३० हजारांहून अधिक गावांत विस्तारले आहे आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, अर्ध्यावर शाळा सोडल्यामुळे स्वयंप्रगतीचे मार्ग खुंटलेल्या २० लाख मुलींना या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. मुलगी शिकली, प्रगती झाली, अशी सरकारी घोषणा अस्तित्वात येण्याआधी महिलांचे कौटुंबिक महत्त्व अधोरेखित करणाऱ्या काही बाबी समाजाने स्वीकारल्या आहेत. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगातें उद्धारी अशा एका म्हणीतून, स्त्रीची महती गेल्या अनेक दशकांपासून घराघरात संस्काररूपाने शिकविली जाते. बेटी बचाओ, बेटी पढाओ नावाच्या सरकारी घोषणांतून स्त्रियांच्या जगण्याचा सन्मान आणि शिक्षणातून मिळणाऱ्या प्रतिष्ठेचा मान स्त्रियांना देण्याचे संस्कारही घडविले गेले, तरीही पठडीबाज समाजरचनेच्या उतरंडीत स्त्रीचे महत्त्व पुरुषांहून कमीच राहिले. काही पारंपरिक समजुतींच्या लक्ष्मणरेषांनी जखडलेल्या त्यांच्या जगण्याला नवी दिशा देण्याचे काम गेल्या शंभर वर्षांत झाले, म्हणून आज एज्युकेशन गर्ल्ससारख्या संस्थांच्या कामाला सन्मान मिळाला आहे. पुढील दशकभरात देशभरातील एक कोटींहून अधिक मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प या पुरस्काराच्या निमित्ताने या संस्थेने जाहीर केला आहे. विविध सरकारी योजना, जुन्या समजुतींच्या प्रवाहातून बाहेर पडून महिलांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याची बदलती मानसिकता आणि महिलांच्या प्रगतीचे सर्वसमावेशक पुरावे समोर येत असतानाही, देशाच्या दुर्गम भागांत अजूनही कोट्यवधी मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचितच आहेत आणि त्यांना या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी कोणीतरी स्वयंसेवी संस्थांच्या संवेदनशीलतेने भारलेल्या कार्याची मदत गरजेची आहे हा याचा स्पष्ट अर्थ आहे.

एकोणिसाव्या शतकात, सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने स्त्री शिक्षणाची पायाभरणी झाली, तरी विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत स्त्री शिक्षणास सामाजिक विरोधाचे आव्हानही होतेच. पंडिता रमाबाईंनी स्त्रियांना शिक्षण सुलभतेने घेता यावे यासाठी वसतिगृहे उभारली, शिक्षणसंस्था उभ्या केल्या. महात्मा गांधींनी स्त्री शिक्षण हा सामाजिक सुधारणांचा आधार असल्याचा विचार समाजात रुजवला आणि उच्चवर्णीय व शहरी भागांत स्त्रियांच्या शिक्षणाची चळवळ सुरू झाली. शिक्षणामुळे प्रगल्भ झालेल्या जाणिवांनिशी, त्या लेखन, अध्यापन, आदी क्षेत्रांत सहभागीही होऊ लागल्या. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे सामाजिक स्थान बहाल केले आणि मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचे धोरणही अवलंबिले गेले. १९४८ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाने तर १९६४ मध्ये कोठारी आयोगाने स्त्रीशिक्षणावर भर देण्याची गरज अधोरेखित केली, तर १९६८ व १९७६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात, मुलींची पटनोंदणी वाढविण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. परिचारिका, अध्यापन, समाजसेवा, साहित्य, कायदा, वैद्यकीय आणि बँकिंग, विज्ञान, प्रशासन आणि आता तर, संरक्षणासारख्या क्षेत्रांतही मुलींचा सहभाग दिसू लागला आहे. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित झाल्यावर महिलांच्या शिक्षणाच्या चळवळीला नवी दिशा प्राप्त झाली. महिलांसाठी विद्यापीठे स्थापन झाली, अनेक स्वयंसेवी संस्था स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्यरतही झाल्या. नव्या, डिजिटल युगात तर मुलींच्या शिक्षणाच्या संधीही आता विस्तारल्या आहेत, तरीही शहरी आणि ग्रामीण भागांतील शिक्षणाच्या संधींमधील तफावत हा प्रश्न पुरता सुटलेला नाही. अजूनही वेगवेगळ्या सामाजिक समजुतींच्या प्रभावामुळे, मुलांना शिक्षणात प्रोत्साहन देणारी कुटुंबे, मुलींच्या शिक्षणाबाबत उदासीनच आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाने यावर मार्ग शोधला आहे. शाळेच्या पटावरून मुलींची गळती रोखण्यासाठी लैंगिक समावेशक निधी तयार केला जात आहे, तर ग्रामीण व दुर्गम भागांतील मुलींच्या शिक्षणावर विशे लक्ष केंद्रित केले जाणार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही वर्षांत देशातील दर शंभर महिलांपैकी जवळपास नऊ महिला साक्षर, म्हणजे जेमतेम अक्षरओळख असलेल्या होत्या. २०११ मध्ये हे प्रमाण वाढले.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या पदवीधर असलेल्या आणि परदेशात सुस्थित झालेल्या सुफिना हुसैन यांनी २००७ मध्ये भारतातील वंचित मुलांच्या साक्षरतेसाठी काम करण्याचा निर्णय घेतला आणि सरकार व समुदाय यांच्या सहकार्यातून मुलींचे शालेय शिक्षण सुनिश्चित करण्याच्या योजनांसाठी स्वत:स वाहून घेतले. शिक्षणाच्या प्रसारासाठी ग्रामीण भागातील गावागावात स्वत:स समर्पित करणाऱ्या बालिका स्वयंसेवक म्हणून जोडल्या गेल्या आणि हे स्वयंसेवक घरोघरी जाऊन मुलींचे शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती व समुपदेशन आदी मार्गांनी मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देतात. विद्या आणि प्रगती या दोन मार्गांनी मुलींना शिक्षणप्रवाहात जोडणे, शिक्षण हा उपजीविकेचा मार्ग असतो हे पटवून देणारे उपक्रम राबविणे हा एज्युकेट गर्ल्स या संस्थेच्या कामाचा गाभा आहे. लैंगिक रूढी आणि निरक्षरतेमुळे आलेल्या बंधनांपासून मुक्ती मिळवून दिल्याबद्दल या संस्थेला रॅमन मॅगसेसे पुरस्कार मिळाला आहे. एका सामुदायिक प्रेरणादायी कर्तव्यभावाचा हा सन्मान समाजातील व्यापक परिवर्तन घडवून आणण्यासाठी साह्यभूत ठरणार आहे. समाज, सरकार आणि संस्था यांनी हातात हात घालून एखाद्या कामास सुरुवात केली, तर असे परिवर्तन अशक्य नाही, ही बाब या संस्थेने आपल्या कामातून सिद्ध केली आहे आणि त्याला मॅगसेसे पुरस्काराने पसंतीची पावती दिली आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ हा केवळ संदेश नाही, तर कृतिशीलतेचा विचार आहे, हे या संस्थेने सिद्ध करून दाखविले आहे. म्हणून या सन्मानाचे धनी ठरलेल्या या संस्थेचे अभिनंदन करावयास हवेच!

## आंतरराष्ट्रीय

# भारत-जपान संबंधाची नवी दिशा

**प्रा. जयसिंग यादव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जपान दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये नवीन बळकटी आली. या भेटीत दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्याबाबत ऐतिहासिक घोषणाच करण्यात आल्या नाहीत, तर शीर्ष नेत्यांमध्ये अभूतपूर्व जवळीकता दिसून आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी भारत-जपान आर्थिक मंचाला हजेरी लावली, जिथे दोघांनीही आर्थिक सहकार्य आणखी वाढवण्याचे स्वप्न पाहिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात जपानने एक मोठी घोषणा केली. त्यानुसार पुढील दहा वर्षांमध्ये भारतात दहा ट्रिलियन येनची खाजगी गुंतवणूक होईल. ही या भेटीतील सर्वांत महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे. या भेटीने येत्या दशकासाठी भारत-जपान संबंधांची दिशा निश्चित केली आहे. या रोडमॅपचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे 'पुढील दशकासाठी भारत-जपान संयुक्त दृष्टी'. यानुसार आर्थिक विकासापासून सुरक्षा, तंत्रज्ञान, नवोपक्रम, आरोग्य, शाश्वत विकास, गतिशीलता आणि परस्पर देवाणघेवाण अशा अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य दिले-घेतले जाणार आहे. भारत आणि जपानमध्ये संरक्षण, मानव संसाधन देवाणघेवाण, डिजिटल नवोपक्रम, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा, अंतराळ सहकार्य आणि सांस्कृतिक भागीदारी यासारख्या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे करार करण्यात आले. मोदी आणि इशिबा यांनी महत्त्वाचे करार केले. दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत द्विपक्षीय संबंध नवीन उंचीवर नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी मोदी म्हणाले की, भारत आणि जपान या दोन मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अशा परिस्थितीत जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी त्यांची भागीदारी महत्त्वाची आहे. दोन्ही देशांनी आर्थिक सुरक्षा सहकार्य उपक्रम सुरू करण्यास आणि शाश्वत इंधन उपक्रम आणि बॅटरी पुरवठा साखळी भागीदारी पुढे नेण्यास सहमती दर्शवली. मोदी आणि इशिबा यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांततेचे समर्थन केले आणि पश्चिम आशियातील स्थिरतेबद्दल चिंता व्यक्त केली. गाझामधील मानवतावादी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करताना, दोन्ही नेत्यांनी तत्काळ युद्धबंदी, सर्व ओलिसांची सुटका आणि मानवतावादी मदत सुनिश्चित करण्यावर भर दिला.

२०१४ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर मोदी यांचा हा आठवा जपान दौरा आहे आणि पंतप्रधान इशिबा यांच्यासोबत त्यांची पहिली वार्षिक शिखर परिषद होती. हा दौरा भारत जपानसोबतच्या संबंधांना देत असलेल्या उच्च प्राधान्यावर प्रकाश टाकतो. दोन्ही देशांचा राजनैतिक संबंधांचा इतिहास मोठा आहे. त्यात व्यापार, गुंतवणूक, स्वच्छ ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानातील अनेक उच्चस्तरीय भेटी आणि भागीदारी समाविष्ट आहेत. भारत आणि जपानमधील द्विपक्षीय व्यापार २२.८ अब्ज डॉलर्स आहे. जपान हा भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचा पाचवा सर्वांत मोठा स्रोत आहे. दोन्ही देशांमधील व्यापार डिसेंबर २०२४ पर्यंत ४३.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. दोन्ही देश सेमीकंडक्टर, स्टार्ट अप्स, स्वच्छ ऊर्जा, पुरवठा साखळी लवचीकता, औद्योगिक स्पर्धात्मकता आणि कौशल्य विकास यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यतादेखील शोधत आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, मोदी यांच्या या भेटीमुळे भारत आणि जपानमधील दीर्घकालीन मैत्री मजबूत होईल, सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील आणि इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि त्यापलीकडे शांतता, समृद्धी आणि स्थिरतेसाठी दोन्ही देशांच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी होईल. जपान हा भारतातील पाचवा सर्वांत मोठा गुंतवणूकदार आहे. त्याची भारतातील थेट गुंतवणूक ४३.२ अब्ज डॉलर्स आहे. डिजिटल सहकार्य, स्वच्छ ऊर्जा आणि कौशल्य विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढत आहे. जपान १९५८ पासून भारताचा सर्वांत मोठा देणगीदार आहे. तो मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेलसारख्या प्रकल्पांना पाठिंबा देत आहे. २०२३ मध्ये या प्रकल्पासाठी तीनशे अब्ज येनची मदत देण्यात आली. पर्यटन आणि पर्यावरणीय उपक्रमदेखील सहकार्याचा एक भाग आहेत. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध आणखी मजबूत होतील. ते इंडो-पॅसिफिक प्रदेशातील शांतता आणि समृद्धीसाठी महत्त्वाचे आहेत. भारत आणि जपानमध्ये २००० पासून जागतिक भागीदारी आहे आणि २०१४ पासून एक विशेष धोरणात्मक भागीदारी आहे. भारताचे ॲक्ट ईस्ट पॉलिसी आणि जपानचे फ्री ॲण्ड ओपन इंडो-पॅसिफिक उपक्रम एकमेकांना पूरक आहेत. दोन्ही देश 'क्वाड', 'इंटरनॅशनल सोलर अलायन्स' आणि 'कोअलिशन फॉर डिझास्टर रेझिलिएंट इन्फ्रास्ट्रक्चर'सारख्या व्यासपीठांवर एकत्र काम करतात. मोदी आणि जपानचे शिगेरू इशिबा यांनी टोकियो इलेक्ट्रॉन फॅक्टरीला भेट देऊन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. जपान आणि भारत यांच्यात सेमीकंडक्टरबाबत करार झाला आहे.

या दोन नेत्यांनी सेंडाई येथील सेमीकंडक्टर क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या टोकियो इलेक्ट्रॉन मियागी लिमिटेड (टेल मियागी)ला भेट दिली. या दरम्यान, मोदी यांना जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत 'टेल'ची भूमिका, त्याची प्रगत उत्पादन क्षमता आणि भारतासोबत सुरू असलेल्या आणि नियोजित सहकार्याबद्दल माहिती देण्यात आली. सेमीकंडक्टर क्षेत्र हे भारत-जपान सहकार्याचे एक प्रमुख क्षेत्र आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने या क्षेत्रात बरीच प्रगती केली आहे. अनेक तरुणही त्यात सामील होत आहेत. भारत आणि जपानने सेमीकंडक्टर पुरवठा साखळीबाबत करार केला आहे. अशा परिस्थितीत परस्पर मदतीने दोन्ही देश आता मजबूत, लवचीक सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी एकत्र काम करतील. मोदी यांनी भारतीय लोको पायलटांशी चर्चा केली. त्यांनी नवीन अल्फा-एक्स ट्रेनची पाहणी केली आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून बुलेट ट्रेन प्रकल्पाची माहिती घेतली. शिगेरू इशिबा यांच्यासोबत मोदी यांनी मियागी प्रीफेक्चरमधील ओहिरा गावात बांधल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टर वेफर फॅब्रिकेशन प्लांटला भेट दिली. हा प्लांट तैवानच्या पीएसएमसी, एसबीआय होल्डिंग्ज आणि जपानी भागीदारांचा संयुक्त उपक्रम असलेल्या जपान सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (जेएसएमसी) द्वारे बांधला जात आहे. पंतप्रधान मोदींचा हा दौरा भारत-जपान संबंधांच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. सेमीकंडक्टर उद्योगातील सहकार्यामुळे भारताला चिप उत्पादन क्षमता वाढवण्याची संधी मिळेल. 'एआय' आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या क्षेत्रातील जपानसोबतची भागीदारी भारताच्या तांत्रिक प्रगतीला गती देऊ शकते. भारताच्या बुलेट ट्रेन प्रकल्पात जपानचे सहकार्य भारतीय रेल्वे नेटवर्क आधुनिक आणि जलद बनवण्यास मदत करेल. अल्फा-एक्स बुलेट ट्रेन मॉडेलचा आढावा आणि लोको पायलटच्या प्रशिक्षणामुळे रेल्वेक्षेत्रात सुधारणा होईल. यामुळे रेल्वे वाहतूक प्रणालींच्या बांधकाम आणि विकासात जपानकडून तांत्रिक सहकार्याला चालना मिळेल. चांद्रयान-५ मोहिमेवर विशेष लक्ष केंद्रित करून भारत आणि जपानमधील अवकाश तांत्रिक सहकार्य वाढवले जाईल. अवकाश संशोधन आणि संयुक्त प्रकल्पांमध्ये नवीनतम प्रगतीसाठी अवकाश संस्थांचे सहकार्य काम करेल. हे सहकार्य अवकाश प्रवास आणि अन्वेषणात जागतिक स्तरावर भारताला बळकटी देईल. मोदी यांच्या जपान दौऱ्याचा उद्देश स्वच्छ ऊर्जा आणि हरित ऊर्जा क्षेत्रात दोन्ही देशांमधील भागीदारीला चालना देणे हा होता. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेच्या क्षेत्रात भारत आणि जपानमधील सहकार्य वाढल्यामुळे पर्यावरणीय दुष्परिणाम कमी होतील. या भेटीमुळे भारत आणि जपानमधील सुरक्षा संबंधही मजबूत होतील. दोन्ही देशांनी विशेषतः प्रादेशिक सुरक्षेच्या संदर्भात लष्करी आणि धोरणात्मक सहकार्य वाढवण्यावर भर दिला. परिणामी, संरक्षण उद्योग आणि लष्करी प्रशिक्षण क्षेत्रातही दोन्ही देशांचे सहकार्य असेल.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# जीवघेणा कर्करोग अन् उपाय

**चंद्रकांत लोहाणा**

देशामध्ये कर्करोगाचे वाढते प्रमाण फार चिंताजनक आहे. अतिशय घातक व जीवघेण्या रोगाबाबत समाजामध्ये अजूनही पाहिजे तेवढी जनजागृती नसल्याने कर्करोगाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. कितीही प्रयत्न केले तरी कर्करोगाशी दिलेली झुंज आयुष्यामध्ये बहुतांश अपयशी ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा रोग होऊच नये अशी खबरदारी घेऊन जीवन जगण्यामध्येच शहाणपण आहे, हे गृहीत धरून प्रत्येकाने आपली दिनचर्या काटेकोरपणे जपायला हवी. अभिनेत्री प्रिया मराठे हिची कर्करोगाशी झुंज अखेर अपयशी ठरली. ती जवळपास दीड वर्षापासून कर्करोगाशी लढत होती.

संशोधनामुळे वैद्यकीय क्षेत्र अतिशय प्रगत झाले असले तरी तज्ज्ञांना अजूनही कर्करोगावर रामबाण इलाज शोधण्यामध्ये फारसे यश मिळाले नाही. कर्करोग का होतो, याबाबतही तज्ज्ञांमध्ये एकवाक्यता नसली तरी बदललेली जीवनशैली, आहारामध्ये झालेला बदल, शरीरावर होणारा रसायनांचा अति मारा, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे कर्करोगाचे घर असल्याचे तज्ज्ञ निष्कर्षाप्रत आले आहेत. त्यामुळे कर्करोग होऊच नये, म्हणून जीवनामध्ये काही पथ्ये पाळली तर समाजामध्ये कर्करोगाचा लढा अतिशय संयमितपणे लढला जाऊ शकतो. पूर्वी कर्करोगाचे रुग्ण समाजामध्ये बोटावर मोजण्याएवढे सापडायचे. हल्ली हा आकडा कित्येक पटीने वाढला आहे. कर्करोग हा शरीराच्या पेशीमधील बदलामुळे होतो. शरीरामध्ये सामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढायला सुरुवात झाली की, कर्करोगाची लागण होऊ शकते. मानवाच्या शरीरातील पेशी एका ठरावीक पद्धतीने वाढतात. त्यानंतर त्या विभाजित होतात आणि नष्ट होतात. कर्करोगामध्ये पेशीमधील डीएनए खराब होतो. त्यामुळे शरीरातील पेशी सामान्यपणे वाढू लागतात आणि नंतर नियंत्रणाबाहेर या पेशी पसरतात. कर्करोगास आनुवंशिक हे जरी एक कारण असले तरी त्यास अन्य कारणेही अतिशय महत्त्वाची आहेत.



बदललेल्या आहारशैलीमुळे कर्करोगाचा धोका संभवतो, असा तज्ज्ञांचा दावा आहे. त्यामध्ये प्रक्रिया केलेले अन्न, साखर व ज्यामध्ये ट्रान्सफॅट अधिक प्रमाणामध्ये आहे, अशा आहाराने पोटाचा कर्करोग होण्याची शक्यता अधिक असते. तसेच तंबाखूचे सेवन, नशेची सवय, रेडीएशन, वायुप्रदूषण व आजकाल घराघरामध्ये सर्रास वापरली जाणारी घरगुती रसायने कर्करोग होण्यास प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांचे ठाम मत आहे. त्यामुळे आजच्या आधुनिक युगामध्ये मानवास जडलेल्या अशा घातक सवयी आम्ही जोपर्यंत सोडत नाही, तोपर्यंत कर्करोगाचा धोका कमी होणे अशक्य आहे.

आम्ही आमच्या परंपरांना टाकाऊ म्हणून झुगारले. आधुनिकतेच्या नावाखाली नको तेवढे आम्ही पाश्चिमात्य देशांचे अंधानुकरण केले. आमचे जे काही आहे ते सर्वकाही वाईट, हे आमच्या समाजामध्ये इंग्रजांनी पद्धतशीरपणे पेरले. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी उलटली तरी आमच्या डोक्यामधून ही मानसिकता काही केल्या जात नाही. स्वतःच्या विकासाकडे लक्ष देताना, त्यासोबत आपण विनाशही ओढवून घेत आहोत, हे आम्हास अजूनही उमगले नाही. भारतामध्ये झालेल्या एका अभ्यासानुसार महिलांमध्ये गर्भाशयाचा कर्करोग होण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. गर्भाशयाचा हा कर्करोग संपूर्ण जगामध्ये झपाट्याने वाढत असून त्याचे निदान झाल्यावर ४५ टक्के महिला फक्त ५ वर्षे आपले जीवन जगू शकल्या. आपल्या देशामध्ये सर्व आजारावर दुर्लक्ष करण्याचे प्रमाण अतिशय जास्त असून, त्यामध्ये महिला सर्वाधिक आहेत. महिलांमध्ये ज्यावेळी गर्भाशयाच्या कर्करोगाचे निदान होते, त्यावेळी बराच उशीर झालेला असतो. त्यानंतर हा उशीरच जीवघेणा ठरतो, याची सुतराम कल्पना महिलांना नसते. ८० टक्के ग्रामीण भागातील महिला आजारांकडे दुर्लक्ष करतात. गर्भाशयाच्या कर्करोगाची सुरुवात स्त्री प्रजनन प्रणालीच्या अंडाशयामध्ये होते. त्यामध्ये सुरुवातीला कोणतीच लक्षणे दिसून येत नाही. त्यामुळे अनेक महिलांना या रोगाची लक्षणे समजतच नाहीत. ओटीपोटीत दुखणे, पोटामध्ये गोळा येणे, वजन कमी होणे, थकवा येणे, पाठदुखी यासारख्या लक्षणांचा त्यामध्ये समावेश होतो. त्यामुळे सजगता हीच कर्करोगाची अचूक औषधी ठरू शकते.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

# माहिती तंत्रज्ञान रोजगारांवरील टांगती तलवार!

**दत्तात्रेय आंबुलकर**

संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 'टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस' म्हणजेच नावाजलेल्या अशा 'टीसीएस' या आघाडीच्या कंपनीने कर्मचारी कपातीची शक्यता वर्तवली आहे. जागतिक स्तरावर वाढलेली व्यावसायिक अस्थिरता व नजीकच्या काळातील अनिश्चित परिस्थिती लक्षात घेऊन 'टीसीएस' मध्यम व उच्चस्तरीय स्तरांवरील सुमारे १२ हजार कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्याची शक्यता आहे. आजतागयत व्यावसायिकता, व्यवस्थापन आणि कर्मचार्यांप्रति सहानुभूतिपूर्वक भूमिका बाळगणाऱ्या 'टीसीएस'च्या कर्मचारीकपातीच्या निर्णयाचे संभाव्य परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रात सर्व स्तरावर उमटणे स्वाभाविक होते.

यासंदर्भात प्रामुख्याने व सर्वप्रथम उमटलेली 'टीसीएस' व्यवस्थापनाची प्रतिक्रिया वर नमूद केली असून, कर्मचाऱ्यांच्या कपातीसंदर्भात आलेली त्यांची प्रतिक्रिया म्हणजेच प्रस्तावित भूमिका होय! ही भूमिका म्हणजे सद्य:स्थितीत भारतातील संगणक क्षेत्र आणि संबंधित क्षेत्रातील अस्थिरतेचे द्योतकच समजायला हवी. या क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सध्या आपले माहिती तंत्रज्ञान व संबंधित क्षेत्र हे मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे. यामुळे भारतातील संगणकीय सेवा उद्योगात तंत्रज्ञानापासून माहितीची देवाण-घेवाण, आर्थिक व्यवहार या साऱ्यांवरच मोठे परिणाम होत आहेत. याचे परिणाम भारतासह जागतिक स्तरावरही होत आहेत. यामध्ये विविध संसाधनांच्या नेमक्या व मोजक्या वापरासह आर्थिक निर्बंधांवर भर देण्यात येत असून, त्याचा अपरिहार्य परिणाम कर्मचारी आणि त्यांच्या संस्थेवर होत आहे. दरम्यान, संगणक क्षेत्र आणि व्यवसायाला त्यांच्या फायदेशीर अस्तित्वासाठी कार्यालय, कर्मचारी, तंत्रज्ञान व आर्थिक दृष्टिकोन या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच, त्यानुसार ध्येयधोरणाची नव्याने आखणी वा प्रसंगी फेरआखणी करावी लागते. वाढती स्पर्धा हा मुद्दासुद्धा सर्वांसाठी महत्त्वाचाच ठरतो. त्यातच भर पडते ती संगणक सेवा क्षेत्रातील वाढत्या अपेक्षांची! त्यांची पूर्तता करण्यासाठी यापूर्वी न वापरलेल्या उपाययोजनांचा विचार आणि वापर करणे अपरिहार्यच ठरते. यामध्ये कार्यालयीन जागा व कामकाजापासून, कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेपर्यंत सर्वच मुद्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात येतो.



याचदरम्यान संगणक सेवा क्षेत्रातील अजून एक नामांकित कंपनी असलेल्या 'इन्फोसिस'ने, त्यांच्याकडे कोणतीही कर्मचारी कपात होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. 'इन्फोसिस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सलील प्रकाश यांनी जाहीर केलेल्या निर्णयानुसार कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता व कर्मचाऱ्यांच्या नव्या स्वरूपातील कौशल्यविकासाद्वारे, कंपनीच्या कर्मचारी कपातीसंदर्भातील चर्चेला पूर्णविराम दिला आहे. एवढेच नव्हे, तर एकीकडे कर्मचारी कपातीची शक्यता स्पष्टपणे फेटाळून लावतानाच, 'इन्फोसिस' आगामी वर्षभरात सुमारे २० हजार नव्याने उत्तीर्ण झालेल्या संगणक पदवीधरांना प्रशिक्षणार्थी म्हणूनही घेणार असल्याची केलेली घोषणा हा सध्या मुख्य चर्चेचा विषय झाला आहे.

कंपनीच्या व्यवसाय आणि व्यवस्थापनाची दिशा स्पष्ट करताना सलील प्रकाश यांनी स्पष्ट केलेली बाब म्हणजे, नव्या व्यावसायिक गरजा व व्यवस्थापन पद्धती यांचा व्यवसायानुकूल भर देण्यावर त्यांचा भर राहणार असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक परिणामकारक वापर करून व्यवसाय वाढवणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र सर्वार्थाने नवे असल्याने, त्यातील कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यांची सर्वत्र वानवा आहेच. कौशल्यांच्या संदर्भातील नेमकी हीच गरज व त्याच्याशी निगडित आव्हाने लक्षात घेऊन, कंपनीने नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी उमेदवारांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून, नव्या कर्मचाऱ्यांची निवड करण्याच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १६ हजार प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

सुरुवातीलाच नमूद केल्यानुसार, सध्या जगाच्या पाठीवर माहिती तंत्रज्ञान उद्योग क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय, कार्यपद्धती, धोरण, विस्तार, कर्मचाऱ्यांचे प्रश्न यावर मोठ्या प्रमाणावर विमर्श सुरू आहे. त्यानुसार संबंधित कंपनीच्या धोरणात आणि कामकाजाच्या शैलीमध्ये आवश्यक बदल करणे अपरिहार्य ठरत आहे.

संगणक क्षेत्रातील या महत्त्वाच्या बदलांमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्यांचा समावेश करता येईल.

**व्यावसायिक फायद्यासाठीची तीव्र स्पर्धा** : इतर व्यवसायांप्रमाणेच संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान व्यवसायामध्ये स्पर्धा असणे अपरिहार्य असले, तरी सध्या या स्पर्धेची व्याप्ती आणि तीव्रता प्रकर्षाने वाढली आहे. सध्या अधिकाधिक नफा मिळविण्यावरच भर दिला जात असून, त्यासाठी प्रसंगी अतिरेकी व्यावसायिक नीतीपद्धतींचा वापर केला जात आहे.

**व्यावसायिक फेररचना** : बदलत्या व्यावसायिक गरजा, वाढती स्पर्धा व विविध स्वरूपांची आव्हाने या साऱ्यांना एकाचवेळी तोंड देण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापन आणि कंपनी-कर्मचारी या क्षेत्रांची पुनर्रचना करणे सध्या अपरिहार्य झाले आहे. यासाठी उपाययोजना म्हणून, कृत्रिम बुद्धिमता क्षेत्र अग्रक्रमाने पुढे येत आहे. त्याचा वापरही आवश्यकच नव्हे, तर अपरिहार्यपण ठरला आहे.

कर्मचाऱ्यांचे सोडून जाणे : कंपन्यांसाठी परिणामकारक स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे राजीनामे हे मोठे आव्हान असते. सद्य:स्थितीत व वाढत्या व्यावसायिक स्पर्धेला तोंड देताना, विशेषतः एरवीसुद्धा कामाच्या व कौशल्यप्राप्त कर्मचाऱ्यांना टिकवून ठेवणे हे संगणकशास्त्र उद्योगासाठी आवश्यक आहे. तरी सध्या हीच बाब बदलत्या परिस्थितीत या व्यवसाय क्षेत्रासाठी अत्यावश्यक ठरली आहे.

याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाकडे शस्त्र आणि शास्त्र उभय दृष्टिकोन आणि भूमिकांसह पाहणे गरजेचे आहे. कंपनी, तिचे कामकाज, कर्मचारी या साऱ्यांसाठीच नव्या बदलांचा अपरिहार्य हिस्सा म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यातूनच कर्मचाऱ्यांची व पर्यायाने कंपन्यांची उपयुक्तता निश्चितपणे व्यवसायपूरक ठरणार आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### गणेश मंडळांनी सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा जपावा

सध्या महाराष्ट्रात श्री गणेशाचे वास्तव्य अनंत चतुर्दशीपर्यंत प्रत्येक घरात आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. प्रत्येक वस्तीत श्रीगणेशाची स्थापना होऊ लागली. कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली. कार्यक्रमात सिनेमा दाखवणे, ऑर्केस्ट्रा, विविध कार्यक्रम होऊ लागले. वसाहतीतील नागरिकांचे विविध मनोरंजनांचे कार्यक्रम व त्यातून लोकांचे स्नेहमिलन होऊ लागले. आचारविचारांचे आदानप्रदान होऊ लागले. त्यातून स्वातंत्र्याची चळवळ उभी



राहिली. काही गणेश मंडळे अतिशय सुंदर कार्यक्रम, जे लोकमान्य टिळकांना अपेक्षित होते, ते राबवताना दिसत आहेत. पीएमजी सोसायटी माधवनगर अंतर्गत असलेल्या चारही लेआऊटमध्ये सांस्कृतिक बरोबरच आध्यात्मिक कार्यक्रम होतात. आज लहान मुलांवर चांगले संस्कार व्हावे, नवीन पिढी संस्कारक्षम निर्माण व्हावी याकरिता माधवनगर गणेश मंडळाने होम हवन करून जवळपास ११ बटूंना आवर्तनासाठी बसवले. सर्व लहान मुले एका ठिकाणी बसून मंत्राच्या घोषात २-२ तास बसतात. तसेच रवींद्र नगर, नरेंद्र नगर व सावरकर नगर याही ठिकाणी गणेश यागाचे आयोजन करून समाजात धार्मिक विचार पेरण्याचे काम महिला व लहान मुले करीत आहेत. हिंदू संस्कृतीचा हा एक भाग आहे आणि आज समाज एकसंध आणि सकारात्मक विचारसरणीचा तयार करण्यासाठी असे कार्यक्रम फार महत्त्वाचे आहेत. कारण देशामध्ये विकृत विचारांनी थैमान घातले आहे ते नष्ट करण्यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांनी पुढे येऊन आपला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा जपला जाईल त्याच पद्धतीचे कार्यक्रम करावे. समाजातील विकृतीला हद्दपार करण्याचे काम केले तरच लोकमान्य टिळकांना अपेक्षित गणेशोत्सव साजरा केल्याचे समाधान प्रत्येक मंडळाला मिळेल आणि समाजामध्ये एकोप्याचे वातावरण निर्माण होईल.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

## वाचक पत्रे

### गणेशमूर्ती मिरवणुकीत आगीच्या ज्वाळांवर बंदी हवी

अनंत चतुर्दशीला रात्री श्री विसर्जन मिरवणुकीत काही हौशी मंडळी टेंभा किंवा छोटे गॅस सिलेंडर बाळगतात व तोंडात पेट्रोल किंवा डिझेल घेऊन ते हवेत सोडतात व त्यावर गॅस किंवा टेंभ्याच्या ज्वाळा सोडतात यामुळे हवेत मोठा भडका होतो. हे खूप घातक आहे. मिरवणुकीत खूप गर्दी असते. एखाद्या भक्ताच्या अंगावर हा भडका पडून मोठा अपघात घडू शकतो किंवा आगी लागण्याचा प्रकारही शक्य आहे. तसेच फटाके पेटवून ते हवेत फेकतात. हा प्रकारही घातक ठरू शकतो. या दोन्ही प्रकारांना प्रतिबंध घालावा व श्री विसर्जन मिरवणूक शांततेत व निर्विघ्न पार पडावी असे वाटते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### गुंड्याभाऊंची एक आठवण

काही वर्षांपूर्वी चिमणराव आणि गुंड्याभाऊ ही मालिका टीव्हीवर खूपच गाजली होती आणि या मालिकेमध्ये मातब्बर असे मोठे दोन अभिनेते होते. ते म्हणजे नुकतेच निधन झालेले बाळ कर्वे आणि दिलीप प्रभावळकर. या मालिकेतील मुख्य भूमिका करणारे गुंड्याभाऊ म्हणजेच बाळ कर्वे होते. त्यांना जणू टोपण नाव गुंड्याभाऊ पडले होते. त्यांनी अनेक मालिकांमध्ये काम केले होते आणि त्यांचे काम आजही लक्षात आहे. त्यांच्यामध्ये एक नोकरदार वर्गही होता. त्यांची एक आठवण सांगावीशी वाटते की, नाला दुरुस्ती याबाबत वृत्तपत्रामध्ये माझे एक पत्र प्रसिद्ध झाले होते. हे पत्र मुनिसिपल कॉर्पोरेशन संबंधित होते. बाळ कर्वे मुनिसिपल कॉर्पोरेशन मुंबई यांच्या पूर्व विभागामध्ये स्थापत्य अभियंता होते. माझ्या पत्राची दखल घेऊन ते जोगेश्वरी ईस्ट बांदेकर वाडी येथे मला घरी भेटण्याकरिता आले. माझ्या तक्रारीचे निवारण त्यांनी केले. बाळ कर्वे हे एक मोठे अभिनेते आहेत आणि ते चिमणराव मालिकेमध्ये गुंड्याभाऊ ही भूमिका करतात हे कळताच आजूबाजूच्या परिसरातील लोक त्यांना बघण्याकरिता तेथे जमा झाले आणि त्यांनी तेथे सर्वांशी संवाद साधला. म्हणजेच एक प्रसिद्ध अभिनेता आणि एक कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी अशी त्यांची दोन्ही रूपे त्यावेळी सर्वांना पाहायला मिळाली. बाळ कर्वे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>**कुठलाही लेख**</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### खा. प्रणिती शिंदे यांच्यातर्फे मुंबईत मराठा समाजबांधवांसाठी जेवणाची व्यवस्था

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी मुंबईत आलेल्या मराठा समाज बांधवांसाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खा. प्रणिती शिंदे यांच्याकडून जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी सोलापूर सकल मराठा समाज समन्वयक माऊली पवार, विनोद भोसले, गणेश डोंगरे, श्रीरंग लाळे, पंडित ढवन, सचिन पवार, सचिन गुंड, काशिनाथ भतगुणकी आदी उपस्थित होते.



### सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर एक येथे विमुक्त दिन साजरा

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**


सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर एक येथे टकारी समाजाच्या वतीने ३१ ऑगस्ट विमुक्त दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. टकारी समाज अध्यक्ष सुनील जाधव यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकवून समाज बांधव एकमेकांना लाडू देऊन आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी टकारी समाज सरपंच नारायण जाधव, प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गायकवाड, देविदास गायकवाड, अनिल जाधव, रमेश जाधव, संजय गायकवाड, युवराज जाधव, बालाजी जाधव, बप्पा जाधव, रुक्मिणी जाधव, ज्ञानेश्वर जाधव, रवी जाधव, बजरंग गायकवाड, गैबु जाधव, आर. आर. जाधव, रामस्वामी गायकवाड, प्रकाश गायकवाड, निशांत गायकवाड, विजय जाधव, राजश्री जाधव, रेखा गायकवाड, सुशीला गायकवाड, चंदा काळे, गोपाळ गायकवाड, संतोष गायकवाड, विवेक जाधव, अंबादास जाधव, विठ्ठल गायकवाड, रवि गायकवाड, विलास लोंढे, शांताबाई गायकवाड, पुतळाबाई जाधव, चंदव्वा गायकवाड, सुसलव्वा गायकवाड आदी उपस्थित होते. याप्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी काँग्रेसच्या महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, सेवा दल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, प्रकाश माने, कमरूनीसा बागवान, रेखा बिनेकर, ज्योती गायकवाड, नीशा मरोड, सुभाष वाघमारे, सेटलमेंट भागातील नऊ समाजातील बंधू, भगिनी मोठ्या संख्येत या उपस्थित होते.



### साक्षात्कार गणपती मंडळाच्या वतीने आयोजित शिबिरात ५० जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

स्वातंत्र सैनिक नगर सांस्कृतिक बहुद्देशीय तरुण युवक मित्र मंडळ संचलित साक्षात्कार गणपती मंडळाने सामाजिक बांधिलकी या नात्याने सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिर आयोजित केले. सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र दंतकाळे यांनी रक्तदान करून सुरवात केली. दिवसभरात पन्नास रक्तदाते शिबिरात भाग घेतले. यावेळी मंडळाचे अध्यक्षा रचना कट्टा, उपाध्यक्षा प्रेमा स्वामी, सल्लागार लक्ष्मीकांत दंडी, अभिलाष स्वामी, स्वप्नील सातपुते, पदाधिकारी शेखर बिराजदार, नितीन वळते, अँड सिद्राम कोरे, जयप्रकाश नामाजी, दीपक ताडाळगी, अंबादास पवार, संगीता पवार, स्वाती मडूर, राजू कट्टा, सुदर्शन क्षीरसागर, अंजली हैदाले आदी उपस्थित होते.



### संभाजीराव शिंदे विद्या मंदिर प्रशालेत गणरायाची पूजा

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

संभाजीराव शिंदे विद्या मंदिर प्रशालेत श्री गणरायाची पूजा भक्तिभावाने संपन्न झाली. संस्थेच्या संचालिका डॉ. राधिका चिलका यांच्या हस्ते, तसेच मुख्याध्यापिका राजश्री नारायणकर यांच्या उपस्थितीत ही पूजा पार पडली. इयत्ता तिसरीच्या वर्गाच्या वतीने पूजेचे सुंदर नियोजन करण्यात आले होते. यावेळी यशवंत मसाळ, अर्चना शिंदे यांच्यासह इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांचे पालक उत्साहाने उपस्थित होते. पूजेनंतर पालकांच्या वतीने विद्यार्थ्यांना लाडूचा प्रसाद वाटप करण्यात आला. शेवटी श्री गणेशाची मंगलारती घुमताच संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

# गांजा विकण्यासाठी आलेल्या दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोलापूर जिल्ह्यात गांजा विकण्यासाठी आलेल्या दोघांना अटक करून त्यांच्याकडून ३ लाख ७३ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त केला. ही कारवाई सोलापूर ते कोल्हापूर रोडवरील कोरोली ब्रिजच्या खाली करण्यात आली.

सुरज प्रदीप नायक (वय २१), विग्यानंद वालतेनो नायक (वय २१, दोघे रा. भालीपंका, ता. गुलवा, जि. गजपती, रा. ओडिसा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत कामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातून गांजा पुरवठा होत असल्याबाबत पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना माहिती मिळाली होती. याबाबत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकास पोलिस अधिक्षक कुलकर्णी यांनी कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे सोलापूर जिल्ह्यात गांजा पुरवठा कोठून होतो, ते करणारे कोण इसम आहे याचे मागावर होते.

३० ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे



पोलीस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर यांना सोलापूर ते कोल्हापूर जाणाऱ्या रोडवरील कोरोली ब्रिजच्या खाली गांजा विक्री करण्याकरीता दोन इसम येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस पथक हे कोरोली ब्रिजच्या खाली सापळा लावून थांबले असताना, दोन इसम आपल्या हातामध्ये प्रत्येकी एक प्रवासी बॅग घेवून पुलाकडे चालत येत असल्याचे दिसून आल्याने पोलिस पथकाने त्यांना ताब्यात घेवून चौकशी केली. त्यावेळी त्यांनी त्यांची नावे सुरज नायक आणि विग्यानंद नायक अशी सांगितले. पोलिसांना त्या दोघांकडील प्रवासी बॅगांची झडती घेतली असता त्यामध्ये १७ किलो ५६७ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला. त्यामुळे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्याच्याकडून गांजा तसेच दोन मोबाईल फोन असा ३ लाख ७३ हजार ३४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत कामती पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सुरज निबांळकर हे करीत असून आरोपींना न्यायालयाने ४ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी पोलिस उपअधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागयी पोलिस अधिकारी दिपक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संजय जगताप, सहायक पोलिस निरीक्षक भिमगोंडा पाटील, पोलिस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, सहायक फौजदार निलकंठ जाधवर, पोलिस हवालदार सलीम बागवान, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, अनिस शेख, जयवंत सादुल, महिला हवालदार अश्विनी गोटे, पोलिस शिपाई सागर डोरेपाटील, प्रमोद शिपाळे, समर्थ गाजरे, यश देवकते, योगेश जाधव, संदिप हुलगे, राजेंद्र गवेकर, दिलीप थोरातमहिला कर्मचारी सुनंदा झळके यांनी केली.

# झाडाच्या पानांपासून गणरायाची स्थापना; पर्यावरण रक्षणाचा संदेश

## बाळे येथील निसर्गप्रेमींचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

गणेशो उत्सव म्हणजे सर्व भक्तांसाठी आनंदाची पर्वती असते. बाप्पा घरी आल्यावर भक्त वेगवेगळ्या प्रकारचे मकर आणि देखावा केले जाते. बाळे येथील निसर्गप्रेमींनी दीपक



करकी यांनी आपल्या राहत्या घरी वृक्षच्या पानापासून तयार केलेल्या गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. झाडाच्या पानापासून बनवलेला जिल्ह्यातील पहिलाच गणपती आहे. वट, पिंपळ, बकुळ, गुलाबी रंगाचे फुल पांढऱ्या रंगाचे फुल, आणि कडुलिंब याचे पानाचे गणपती तयार करण्यासाठी वापरली, यासारख्या विविध वृक्षाच्या पानाचा वापर करून ही मूर्ती बनवण्यात आली आहे. या पर्यावरणपूरक उपक्रमातून निसर्ग जतन करा, वृक्ष संवर्धन करा, आणि प्लास्टिकचा वापर टाळा, पर्यावरण पूरक गणेश मूर्ती सजावट करा, स्वच्छतेबाबत जनजागृती आणि डस्टबिनचा वापर करा, ध्वनी प्रदूषणाचा अंत करा सोलापूर शांत करा, असा संदेश देखील देण्यात आला आहे, झाडाचे पाने केवळ औषधीच नसतात तर माती सुपीक बनवण्यासाठी मदत करतात यावर भर देण्यात आला.



# मातोश्री गोशाळेत गोमातेचा नामकरण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

राधाष्टमीच्या मुहूर्तावर दुपारी साडेबारा वाजता गोमातेचा पाळणा समारंभ मंत्रोच्चारात उत्साहात साजरा करण्यात आला. विश्व हिंदू परिषदेतर्फे जुना विडी घरकुल येथील मातोश्री गोशाळा येथे हा कार्यक्रम झाला.

सकाळी सत्यनारायण महापूजा झाली. यावेळी प्रथमेश कोठे, केतन शहा, संजयकुमार जामदार, विठ्ठल कोठे उपस्थित होते. श्री.कोठे यांनी गोरक्षकासोबत सदैव उभे राहण्याचा संकल्प निर्धारित केला. जिल्हा मंत्री जमादार यांनी गोमातेचे महत्त्व सांगितले. प्रांत गोरक्षा व संवर्धन गोरक्ष प्रमुख संतोष खामकर यांनी गो संवर्धनाचे महत्व आणि गरज याची माहिती दिली.

यावेळी जिल्हा संयोजक सिद्धू चर्कोपल्ली, जिल्हा सहमंत्री बाबू गिरगल, रवी बोल्ली, मातोश्री गोशाळेचे श्रीनिवास बडगंची, दीपक बंदगी, उमाकांत बुधाराम, नरेश धुंपेटी, राजू गुंडला, विशाल बुगडे, सिद्धेश्वर गुर्रम तसेच विश्व हिंदु परिषद तसेच बजरंग दलाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये कला क्षेत्राविषयी आत्मविश्वास

## शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षा मार्गदर्शप्रसंगी राज्याध्यक्ष शेरशाह डोंगरी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

चित्रकलेच्या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षा एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या परीक्षेच्या माध्यमातून लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये कला क्षेत्रातील आत्मविश्वास निर्माण होतो, असे प्रतिपादन राज्याध्यक्ष शेरशाह डोंगरी यांनी केले.

रविवारी, मंद्रप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघाच्या वतीने आयोजित शासकीय रेखाकला (चित्रकला ग्रेड) परीक्षांच्या तयारीसाठीच्या व्याख्यानमालेत ते बोलत होते. परीक्षांच्या तयारीसाठी विशेष व्याख्यानमाला या कार्यक्रमात मंद्रप पंचकृशीतील २८१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या व्याख्यानमालेचे उद्घाटन लोकसेवा विद्यामंदिरचे प्राचार्य बसवराज कुमठेकर, दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पंचाक्षरी स्वामी, कला शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले, राज्यसचिव शांतप्पा काळे, जिल्हा सचिव संतोष धारेराव, दक्षिण सोलापूर शैक्षणिक कला शिक्षक संघाचे अध्यक्ष सोमशंकर म्हेत्रे आदींच्या उपस्थितीत झाले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धानप्पा बगले यांनी केले तर आभार प्रदर्शन सुभाष सुतार यांनी केले. या कार्यक्रमासाठी मदगोंडा बिराजदार, नागनाथ गावडे मोहन कांबळे, सचिन व्हनमाने, गोपाळ आरकेरी, संजयकुमार बनसोडे, मेनुद्दीन मोमीन, वजीरमा शेख, बसवराज घाटे, सतीश जकुने, संतोष माशाळे, श्रीकांत मुंजे व शैक्षणिक कलाशिक्षक संघाचे पदाधिकारी आणि लोकसेवा विद्या मंदिरच्या सेवकांनी सहकार्य केले.

### या कलाशिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

- **वस्तूचित्र :** संदीप पोतदार आणि नागेश फुलारे
- **स्मरणचित्र :** संतोष धारेराव आणि शशिकांत सदाफुले
- **संकल्पचित्र :** स्वाती साठे आणि स्नेहल गुंगे
- **कर्तव्य भूमी :** सिद्धाराम काळे आणि शांतप्पा काळे
- **अक्षरलेखन :** शेरशाह डोंगरी




# राज्य सेवारत्न पुरस्काराने रिजवान करजगी सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

साप्ताहिक मित्रप्रेमच्या वर्धापन दिनानिमित्त बशीरुज्मा सामाजिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयडियल उर्दू माध्यमिक शाळेतील शिक्षक रिजवान करजगी यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय सेवारत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर आरिफ शेख, सोलापूर विद्यापीठा कायदेशीर सल्लागर अॅड. जावेद खैरदी, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, डॉ. विजय कानेटकर, डॉ. प्रदीप सिंघल, पत्रकार सलाउद्दीन शेख, पत्रकार रिजवान शेख, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष शफिक रचभरे, मुख्याध्यापक अब्दुल करीम रचभरे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## भीमशक्ती संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

गेल्या तीन महिन्यात सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रमध्ये पावसाने जो धुमाकूळ घातला. त्यामध्ये सोलापूरसाह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी संकटात सापडला असून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कितीतरी पटीने पाऊस जास्त पडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कधी न भरून येणारे नुकसान झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने




सोलापूरसह. महाराष्ट्रामध्ये. ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी खासदार हंडोरे यांच्या आदेशानुसार जिल्हा अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी भीम शक्ती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, राजा कदम, उमेश सुरते, सलीम मुल्ला, मेजर साबळे, मनोज लोंढे, प्रमिला तुपलवंडे, ज्योती गायकवाड, इब्राहिम शेख, समीर मुजावर, मुमताज तांबोळी, मयूर तळभंडारे, माया कांबळे, के. एम. कांबळे, अशोक. नागटिळक, कीर्ती शिवशरण, सचिन सुरवसे, मिलिंद कांबळे, प्रकाश सिताफळे आदी उपस्थित होते.

Classifieds

**पाहिजेत**

**भागवत सिनेमा येथे** Operations associate, Security guard, projection **आणि** housekeeping **या पदासाठी स्टॉफ त्वरित भरणे आहे.**
**संपर्क : ८८०६३३५०५०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# १८ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थी वसतिगृह प्रवेशासाठी मुदत वाढ

## धनगर समाजासाठी स्वयंम् योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, १ सप्टेंबर-**

धनगर समाजातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पंडित दीन दयाळ स्वयंम मोफत विद्यार्थी वसतिगृह योजना सुरू करण्यात आली आहे. शासनाकडून मोफत वसतिगृहासाठी प्रवेशाची मुदत तिसऱ्यांदा वाढविण्यात आली असून जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या वसतिगृहात प्रवेश घेता येणार आहे. याकरिता प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी १८ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करू शकतात. पंडित दीनदयाळ मोफत विद्यार्थी वस्तीगृह ही स्वयंम योजना आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी धनगर समाजाच्या शंभर विद्यार्थ्यांसाठी ही योजना सुरू आहे. यापूर्वी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. आता तिसऱ्यांदा मुदतवाढ मिळाली. धनगर समाजातील इच्छुक विद्यार्थी मोफत वस्तीगृहासाठी अर्ज करू शकतात. त्यानंतर प्रवेश निश्चिती केली जाणार आहे. वसतिगृहात प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना विविध दाखल्यासह ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा लागणार आहे.

प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना बँक खाते क्रमांकांशी आधार क्रमांक लिंक केलेला खाते क्रमांक, आधार क्रमांकासह अन्य कागद पत्र द्यावे लागणार आहेत. तरी विद्यार्थ्यांनी त्वरीत अर्ज भरून वस्तीगृहातील प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आला आहे.

> जिल्ह्यातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी पंडित दीन दयाळ स्वयंम् मोफत विद्यार्थ्यांनी वस्तीगृह योजनेसाठी अर्ज भरावा. विद्यार्थ्यांच्या हितासाठी शासनाकडून तिसऱ्यांदा मुदत वाढ दिली असून याचे लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावेत. मुदतीच्या आत अर्ज भरावे.
>
> **- गणेश सोनटक्के, सहायक संचालक, इतर मागास बहुजन विभाग सोलापूर ,**

> शहरात राहून उच्च शिक्षण घेणार्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी चांगली योजना आहे. यामुळे शिक्षण पूर्ण करताना पैशाची बचत होते. गरिब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनी वस्तीगृहात प्रवेश घेऊन उच्च शिक्षण पूर्ण करावे. तीन वेळा मुदतवाढ मिळाल्याने धनगर समाजातील अधिका अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावे.
>
> **- आणप्पा सतुबर, जिल्हा उपप्रमुख, शिवसेना सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### महिला वन-डे विश्वचषकापूर्वी भारताच्या शिबिराचा समारोप

**विशाखापट्टणम्** : २०२५ च्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकासाठी भारताने विशाखापट्टणम् येथील एसीए-व्हीडीसीए स्टेडियमवर आठवडाभर चालणाऱ्या तयारी शिबिराचा समारोप केला. कौशल्य-आधारित प्रशिक्षण आणि तंदुरुस्तीवर भर देण्याशिवाय खेळाडूंनी विश्वचषकाच्या तयारीसाठी विविध सामन्यांना उत्तेजन देणारे प्रशिक्षण घेतले. सलामीवीर प्रतीका रावलने संघाच्या फलंदाजीच्या खोलीवर विश्वास व्यक्त केला. प्रतिकाने तयारी शिबिरातून संघाच्या वाढत्या मैत्रीवरही प्रकाश टाकला. आम्ही सध्या ज्या पद्धतीने एकमेकांशी जोडले जात आहोत, हे खूप चांगले लक्षण आहे. त्यामुळे आमचा संघ एकजूट दिसत आहे, असे ती म्हणाली. शिबिरामुळे तिला भरपूर आव्हाने मिळाली, विशेषतः संघातील दर्जेदार फलंदाजांविरुद्ध गोलंदाजी कौशल्य दाखवता आले, असे अष्टपैलू अरुंधती रेड्डी म्हणाली. ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या आठ संघांच्या स्पर्धेत कोलंबोमधील आर प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटीमधील बरसापारा स्टेडियम, इंदूरमधील होळकर स्टेडियम आणि नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियममध्ये सामने होतील. विशाखापट्टणममधील एसीए-व्हीडीसीए स्टेडियममध्ये ९ ऑक्टोबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि १२ ऑक्टोबर रोजी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचे विश्वचषक सामने होणार आहेत.

### पुसदची शलाका मुगवानकर विदर्भ बॅडमिंटन चॅम्पियन



**पुसद** : अल्फा बॅडमिंटन अकॅडमी आयोजित विदर्भ लेव्हल बॅडमिंटन स्पर्धेत पुसदची शलाका कविता मंगेश मुगवानकरने दमदार खेळी करीत अंडर-११ गटात विजेतेपद मिळविले तसेच अंडर-१३ गटात अंतिम सामन्यापर्यंत मजल मारीत उपविजेतेपदही पटकावले. सलग तीन वर्षे घेतलेल्या मेहनतीमुळे शलाकाने या स्पर्धेत नोंदविले आहे. तिच्या या कामगिरीमुळे अंडर-११ मध्ये नवी चॅम्पियन म्हणून शलाकाची घोषणा करण्यात आली. या यशाबद्दल राज्यमंत्री इंद्रनील नाईक व मोहिनी नाईक यांनी शलाकाला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शलाकाने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक मंगेश मुगवानकर व सय्यद अर्शद यांना दिले. तिच्या या विजयाबद्दल मुगवानकर परिवार, कौटकर परिवार, नीलेश भंडारी, प्रशांत भंडारी, अजय कोटलवार, नंदू देशमुख, अभिजित बसटवार, ललित जाधव, अमीर हिराणी, मनीष दशरथकर तसेच इशान चव्हाण यांनी अभिनंदन करून पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

### नेशन्स चषक फुटबॉलमध्ये भारताचा इराणकडून पराभव

**हिसोर** : ताजिकिस्तानमधील हिसोर सेंट्रल स्टेडियमवर सुरु असलेल्या नेशन्स चषक फुटबॉल स्पर्धेत सोमवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात आशियाई पॉवरहाऊस इराणकडून भारतीय संघाचा ०-२ असा पराभव झाला. खालिद जमील यांना भारतीय प्रशिक्षक म्हणून पहिला पराभव पत्करावा लागला. अमीरहोसेन, तारेमी आणि अलीपूरघाराने नोंदविलेल्या गोलच्या बळावर इराणने भारतावर विजय मिळवला. पूर्वार्धात भारताने बचावात्मक खेळाचे उत्तम प्रदर्शन केले असले तरी, युरोपियन फुटबॉल अनुभवाच्या अभावामुळे दक्षिण आशियाई संघाला गतविजेत्या संघाकडून पराभव पत्करावा लागला. सामन्याच्या प्रारंभी भारताने इराणला चिवट झुंज दिली, परिणामी मध्यंतरापर्यंत गोलफलक कोरा राहिला. मात्र त्यानंतर इराणने आक्रमक पवित्रा घेतला. ५९ व्या मिनिटाला अमीरहोसेनने भारताची संरक्षण फळी भेदत इराणसाठी पहिला गोल केला. सामन्याच्या ८९ व्या मिनिटाला अली अलिपोरघाराने इराणची आघाडी दुप्पट केली. सामन्याच्या ९६ व्या मिनिटाला तारेमीने गोल नोंदवून इराणच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. या पराभवानंतरही भारताला स्पर्धेतील तिसरे स्थान पटकावण्याची आशा आहे.

### भारताच्या माया रेवतीचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**न्यू यॉर्क** : किशोरवयीन माया राजेश्वरन रेवतीने चीनच्या झांग-कियान वेईवर मात करून न्यू यॉर्कमधील अमेरिकन ओपनमध्ये ज्युनियर मुलींच्या एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. कोइम्बतूर येथील रहिवासी असलेली आणि स्पेनमधील राफेल नदाल अकादमीमध्ये सराव करणारी १६ वर्षीय बिगरमानांकित रेवतीने तिच्या पहिल्या आणि दुसऱ्या सर्व्हिसवर रूपांतरित केलेल्या गुणांच्या जोरावर तिच्या चिनी प्रतिस्पर्ध्याचा दीड तासापेक्षा कमी वेळात ७-६(५), ६-३ असा पराभव केला. दुसऱ्या फेरीत तिचा सामना युनायटेड किंग्डमच्या दुसऱ्या मानांकित हन्ना क्लुगमनशी होईल. क्लुगमनने अमेरिकेच्या ॲस्पेन शुमनचा ६-०, ६-२ असा पराभव केला. एक आशादायक खेळाडू म्हणून उदयास येत असलेल्या मायाने फेब्रुवारीमध्ये झालेल्या मुंबई ओपन २०२५ डब्ल्यूटीए १२५ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत अनेक वरिष्ठ खेळाडूंना पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# प्रज्ञानंद कारकीर्दीतील सर्वोच्च स्थानी

## फिडे मानांकन : कार्लसनचे अव्वल स्थान कायम



**चेन्नई, १ सप्टेंबर**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने जाहीर केलेल्या सप्टेंबर २०२५ च्या क्लासिकल फिडे मानांकनात चेन्नईचा आर. प्रज्ञानंद कारकिर्दीतील सर्वोच्च २७८५ वर पोहोचला, याबरोबरच त्याने फिडे मानांकनात चौथ्या क्रमांकावर झेप मारली. तो भारताचा सर्वोच्च रेटिंग असलेला क्लासिकल खेळाडू ठरला. सिंकफिल्ड चषकामध्ये दुसऱ्या स्थानावर राहिल्याने प्रज्ञानंदला हा फायदा झाला. ऑगस्टमध्ये या स्पर्धेतून त्याला सहा रेटिंग गुण मिळाले.

नॉर्वेचा ग्रॅण्डमास्टर मॅग्नस कार्लसन अव्वल स्थानावर आहे. कार्लसन आता जागतिक विजेता नाही, पण तरीही रेटिंगनुसार क्रमांक १ क्लासिकल खेळाडू आहे. त्याच्या पाठोपाठ अमेरिकन ग्रॅण्डमास्टर हिकारू नाकामुरा व फॅबियानो कारुआना अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

भारताच्या इतर अव्वल शास्त्रीय खेळाडूंमध्ये अर्जुन एरिगासी क्रमांक ५ (२७७१ एलो) आणि विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशचा समावेश आहे. गुकेश सहाव्या स्थानावर आहे (२७६७ एलो).

जागतिक अव्वल १० मध्ये एक उल्लेखनीय नवागत म्हणजे जर्मनीचा व्हिन्सेंट कीमर आहे. कीमरने चेन्नई ग्रॅण्ड मास्टर्स २०२५ मध्ये प्रभावी कामगिरी केल्यानंतर २१ रेटिंग गुण मिळवून एलिट श्रेणीमध्ये प्रवेश केला.

आणखी एक मोठी कामगिरी करणारी खेळाडू म्हणजे वेस्ली सो. त्याने सिंकफिल्ड चषकातील दुसऱ्या जेतेपदामुळे शास्त्रीय क्रमवारीत जागतिक क्रमवारीत ७ व्या स्थानावर झेप घेतली.

महिला शास्त्रीय क्रमवारीत, हौ यिफानने आपले स्थान पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले आहे. सर्वोच्च क्रमांकाची भारतीय महिला कोनेरू हम्पी आहे व ती जगात सहाव्या क्रमांकावर आहे. (वृत्तसंस्था)

# महिला वन-डे विश्वचषकांत १३ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त रोख पुरस्कार

**दुबई, १ सप्टेंबर**

महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत यंदा एकूण १३ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त रोख पुरस्कार ठेवण्यात आले आहे. रोख पुरस्काराची ही रक्कम २०२३ च्या पुरुषांच्या वन-डे विश्वचषकापेक्षा जास्त आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) सोमवारी २०२५ मध्ये भात व श्रीलंका यांच्या संयुक्त आयोजनात होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषकासाठी विक्रमी बक्षीस निधी जाहीर केला.



या स्पर्धेत एकूण १३.८८ दशलक्ष डॉलर्सची बक्षीस रक्कम असेल. २०२२ मध्ये न्यूझीलंडमध्ये झालेल्या मागील आवृत्तीत देण्यात आलेल्या ३.५ दशलक्ष डॉलर्सच्या तुलनेत जवळपास चार पट जास्त आहे. उल्लेखनीय म्हणजे, हा आकडा २०२३ च्या पुरुष क्रिकेट विश्वचषकाच्या १० दशलक्ष डॉलर्सच्या बक्षीस निधीपेक्षा जास्त आहे.

२०२५ मधील विजेत्या संघाला ४.४८ दशलक्ष डॉलर्स मिळतील. या पुरस्काराची रक्कम तीन वर्षांपूर्वी विजेत्या ऑस्ट्रेलियाला मिळालेल्या १.३२ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त आहे. उपविजेत्या संघाला २.२४ दशलक्ष डॉलर्स मिळतील, तर पराभूत उपांत्य फेरीतील संघांना प्रत्येकी १.१२ दशलक्ष डॉलर्स मिळतील. २०२२ मध्ये मिळालेल्या ३००,००० डॉलर्सपेक्षा ही लक्षणीय वाढ आहे.

ही घोषणा महिला क्रिकेटच्या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह म्हणाले. बक्षीस रकमेत झालेली ही चार पट वाढ हा एक महत्त्वाचा क्षण आहे. जर महिलांनी व्यावसायिकपणे हा खेळ निवडला तर त्यांना पुरुषांच्या बरोबरीने वागवले जाईल आणि खेळाच्या दीर्घकालीन विकासासाठी आमची स्पष्ट वचनबद्धता दर्शवते, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# जितेशला स्थान देण्यास चोप्राचा पाठिंबा

**नवी दिल्ली, १ सप्टेंबर**

यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्माची सुधारित कामगिरी आणि उच्च स्ट्राईक रेटमुळे आगामी आशिया चषकांत भारतीय संघाच्या अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाया हवे, असे मत भारताचा माजी सलामीवीर आकाश चोप्रा यांनी व्यक्त केले.

भारतासाठी आतापर्यंत नऊ टी-२० सामने खेळलेला जितेश हा १७६ च्या जबरदस्त स्ट्राईक रेटने २६१ धावा करून आयपीएल २०२५ जिंकणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघातील एक महत्त्वाचा खेळाडू होता. या कामगिरीमुळे त्याला ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये होणाऱ्या आशिया चषकासाठी भारताच्या टी-२० संघात परत येण्यास मदत झाली.



जितेश शर्मा



आकाश चोप्रा

जितेश शर्मा आशिया चषकामध्ये अंतिम अकरा संघात खेळेल असे मला वाटते. पहिल्या ते तिसऱ्या स्थानाबद्दल आपण जास्त विचार करू नये, कारण त्याला तिथे संधी मिळणार नाही. तथापि, चौथ्या ते सातव्या क्रमांकावर त्याची आकडेवारी बरीच चांगली झाली आहेत. त्याचा स्ट्राईक रेट १६६ आहे आणि सरासरी २८ आहे. १५० पेक्षा जास्त स्ट्राईक रेट असणारा तो पहिला फलंदाज आहे, म्हणून जेव्हा फलंदाजी क्रमवारी तयार केली जाईल तेव्हा तो अगदी वरच्या स्थानावर जाईल. जितेश शर्माचे क्रमांक इतर सर्वांमध्ये सर्वोत्तम दिसत आहेत. त्याचा आशिया चषक चांगला होईल, असे चोप्रा म्हणाले. जितेश आल्याने व शुभमन गिलला टी-२० उपकर्णधार नियुक्त करण्यात आल्यामुळे अंतिम अकरा संघात संजू सॅमसनचे स्थान अनिश्चित आहे, असे मला वाटते असे ते म्हणाले. संजू सॅमसन हा पहिला दावेदार आहे कारण तो शेवटची मालिका खेळला होता. त्याने गत १२ सामन्यांमध्ये तीन शतके ठोकली आहेत व तो सध्या संघाचा भाग आहे, असेही ते म्हणाले. अव्वल तीनमध्ये यष्टिरक्षक हवा असेल तर संजू सॅमसन हा खरा दावेदार आहे. त्याने १४० च्या स्ट्राईक रेटने आणि ३३ च्या सरासरीने ६००० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. जितेशच्या प्रवेशाचा अर्थ ध्रुव जुरेलला राखीव खेळाडूंच्या यादीत स्थान देण्यात आले आणि चोप्राने त्याला एक आशादायक मधल्या फळीतील फलंदाज म्हणून वर्णन केले जो अजूनही पूर्ण उत्पादन होण्यापासून दूर आहे. (वृत्तसंस्था)

# महानार्यमान शिंदे यांची मध्य प्रदेश क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड

### सर्वात तरुण अध्यक्ष

**इंदूर, १ सप्टेंबर**

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे पुत्र महानार्यमान शिंदे यांची मध्य प्रदेश क्रिकेट संघटनेचे (एमपीसीए) अध्यक्ष म्हणून एकमताने निवड होणार आहे.

मंगळवारी संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) निवडणूक आणि त्यानंतर निकाल जाहीर होणार असला तरी, संघटनेचे नवीन पदाधिकारी बिनविरोध निवडले जातील, अशी मावळते अध्यक्ष अभिलाष खांडेकर यांनी सोमवारी पुष्टी दिली की



२९ वर्षीय महानार्यमान हे ग्वाल्हेर डिव्हिजन क्रिकेट संघटनेचे (जीडीसीए) उपाध्यक्ष म्हणून देखील काम करतात आणि पूर्वीच्या ग्वाल्हेर राजघराण्यातील सदस्य आहेत. ते १९५७ मध्ये स्थापनेनंतर एमपीसीएचे सर्वात तरुण अध्यक्ष होतील. एमपीसीएची जबाबदारी स्वीकारणारे ते शिंदे कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील सदस्य असतील. त्यांचे आजोबा दिवंगत माधवराव शिंदे व वडील ज्योतिरादित्य दोघेही एमपीसीए अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. २०२२ मध्ये त्यांना एमपीसीएचे आजीवन सदस्य करण्यात आले व ते मध्य प्रदेश टी-२० लीगचे (एमपीएल) अध्यक्ष म्हणूनही काम पाहतात व त्यांची पहिली आवृत्ती २०२४ मध्ये ग्वाल्हेरमध्ये झाली.

त्यांच्याशिवाय, विनीत सेठिया हे नवीन उपाध्यक्ष असतील, तर माजी आंतरराष्ट्रीय पंच सुधीर असनानी हे नवीन सचिव म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. माजी भारतीय महिला क्रिकेटपटू अरुंधती किरकिरे नवीन संयुक्त सचिव असतील, तर संजीव दुआ कोषाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. (वृत्तसंस्था)

# पुढील वर्षी जागतिक बॅडमिंटन स्पर्धा नवी दिल्लीत

**पॅरिस, १ सप्टेंबर-**

जागतिक बॅडमिंटन महासंघाने ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद भारताला प्रदान केले असून ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या या ऐतिहासिक ३० व्या आवृत्तीचे आयोजन करण्यासाठी नवी दिल्लीची निवड झाली आहे.

पॅरिसमध्ये २०२५ च्या जागतिक बॅडमिंटन स्पर्धेच्या समारोप समारंभात ही घोषणा करण्यात आली. याप्रसंगी बीडब्ल्यूएफचे अध्यक्ष खुनयिंग पटामा लीस्वदत्रकुल, फेडरेशन फ्रँकाईस डी बॅडमिंटनचे अध्यक्ष फ्रँक लॉरेंट व भारतीय बॅडमिंटन महासंघाचे सरचिटणीस संजय मिश्रा यांच्यात हस्तांतरण झाले. भारताची निवड ही जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत बॅडमिंटनमधील सर्वात सातत्यपूर्ण पदक विजेत्या देशांपैकी एक म्हणून त्याचे रूपांतर दर्शवते. १९८३ पासून भारताने जागतिक स्पर्धेत १५ वेळा पदके जिंकली आहेत. १९८३ मध्ये कोपनहेगन येथे प्रकाश पदुकोणने कांस्यपदक मिळवले, तर २०११ मध्ये ज्वाला गुट्टा आणि अश्विनी पोनप्पा या पहिल्या भारतीय दुहेरी पदक विजेत्या ठरल्या. त्यामुळे देशाची अष्टपैलू प्रगती झाली.

# टेनिस प्रीमियर लीग : अहमदाबादमध्ये ९ डिसेंबरपासून

**मुंबई, १ सप्टेंबर-**

ऑल इंडिया टेनिस असोसिएशनच्या (एआयटीए) संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारी भारतातील एकमेव व्यावसायिक टेनिस लीग, टेनिस प्रीमियर लीग (टीपीएल) ९ ते १४ डिसेंबर दरम्यान अहमदाबादमधील गुजरात विद्यापीठ टेनिस स्टेडियमवर होणाऱ्या बहुप्रतिक्षित सातव्या हंगामासाठी सज्ज झाली आहे. महाराष्ट्राबाहेर पहिल्यांदाच होणारी ही आवृत्ती टीपीएल ही भारतातील सातव्या हंगामाचा टप्पा गाठणारी चौथी स्पोर्टिंग लीग झाली आहे.

लियांडर पेस, सानिया मिर्झा, महेश भूपती, रकुल प्रीत सिंग आणि सोनाली बेंद्रे यांसारख्या दिग्गजांच्या पाठिंब्याने भरलेली ही आठ फ्रॅन्चायझी स्पर्धा एटीपीमध्ये ३० ते ५० व्या क्रमांकावर असलेले आंतरराष्ट्रीय टेनिस स्टार, दोन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता रोहन बोपण्णासह भारतातील अव्वल खेळाडूंसह सहभागी होईल. टीपीएलने आपल्या रोंचक, वेगवान खेळासाठी एक स्थान निर्माण केले असून ही लीग भारतात व जगभरातील प्रेक्षकांना मोहित करत आहे. भारतातील आघाडीच्या क्रीडा केंद्रांपैकी एक म्हणून वेगाने उदयास येणारे अहमदाबाद, लीगसाठी एक योग्य व्यासपीठ म्हणून काम करेल. गेल्या वर्षभरात, टेनिस प्रीमियर लीगने वयोगटातील स्पर्धा आयोजित करून आणि रेस टू गोल्ड स्कॉलरशिपद्वारे तरुण खेळाडूंना पाठिंबा देऊन गुजरात राज्य टेनिस असोसिएशनशी आपले संबंध अधिक दृढ केले आहेत, त्यामुळे टीपीएल ऑफद्वारे राज्यात तळागाळातील उपस्थिती मजबूत झाली आहे.



पहिल्यांदाच गुजरातमध्ये टीपीएल आणताना आम्हाला आनंद होत आहे. शहराची ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि खेळांबद्दलची आवड यामुळे ते एक आदर्श यजमान बनले आहे. सीझन ७ अहमदाबादमधील चाहत्यांसाठी जागतिक दर्जाचे टेनिस ॲक्शन देणारी एक विशेष आवृत्ती असल्याचे वचन देते, असे टीपीएलचे सह-संस्थापक कुणाल ठक्कर म्हणाले. गुजरात विद्यापीठ टेनिस स्टेडियम उत्कृष्ट सुविधा देते व अहमदाबादसारख्या नवीन बाजारपेठां ध्ये विस्तार केल्यामुळे आम्हाला भारतातील चाहत्यांना उच्च दर्जाच्या टेनिसचा जवळून अनुभव घेता येतो, असे टीपीएलच्या सह-संस्थापक मृणाल जैन म्हणाल्या.





# थ्रोबॉल स्पर्धेत व्हॅलेंटाईन स्कूलला दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

सुर्या चषक निमंत्रित थ्रोबॉल स्पर्धेत व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलने १४ वर्षांखालील मुली व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. १४ वर्षांखालील मुलांच्या व १९ वर्षांखालील मुलींच्या गटात तृतीय स्थान मिळविले. १७ वर्षांखालील मुलींनी उपविजेतेपद संपादिले. क्रीडा दिनानिमित्त संघाचा मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा व क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व शिवाजी आवताडे, मोनिका जाधव उपस्थित होते. संघाचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी कौतुक केले.

# श्री सिद्धेश्वर स्कूलमध्ये क्रीडा दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे व खेळाच्या साहित्याचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक योगेश राऊत व पर्यवेक्षक नीता तमशेट्टी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय करिश्मा चाकोते यांनी केला. यावेळी याप्रसंगी आदर्श क्रीडा शिक्षक राहुल मुनाळे यांचा सत्कार करण्यात आला. शलाका मठ हिने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व सांगितले. विजया बिराजदार यांनी आभार केले. या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख रजनी महाजन, सदस्य विजयालक्ष्मी नष्टे व.नीलावती खरात, श्रुती कुलकर्णी व कलाशिक्षक सहदेव भालेकर यांनी परिश्रम घेतले.

# स्वामी विवेकानंद प्रशालेत क्रीडा दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय जुळे सोलापूर येथे भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी विविध इनडोअर व आऊट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. सर्वांनी फिट इंडियाची शपथ घेतली. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशन चे सचिव उमाकांत



गायकवाड, सहसचिव मोहन रजपूत, सदस्य अजित शिंदे व कार्यक्रमाचे अध्यक्ष महारूद्रय्या स्वामी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर उपस्थित होते. प्राचार्य अंबादास पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली याचे आयोजन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.संतोष म्हमाणे यांनी केले. प्रास्ताविक श्रीकृष्ण कोळी यांनी केले. सौ. मुलाणी यांनी आभार मानले.

# वालचंद महाविद्यालय क्रीडा दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथे मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याप्रसंगी प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनामध्ये मेजर ध्यानचंद यांचा जाज्वल्य क्रीडा इतिहास सांगून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रांमध्ये शारीरिक व मानसिक कष्ट घेण्याची तयारी करा व आयुष्यात यशस्वी व्हा असे आवाहन केले. याप्रसंगी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे,





पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे, अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. संग्राम चव्हाण व क्रीडा शिक्षकराहुल हजारे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### ज्येष्ठा गौरी पुजनानिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणीस विशेष अलंकार

**पंढरपूर, दि.१ सप्टेंबर -**

ज्येष्ठा गौरी पुजनानिमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, मोत्याचा तुरा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगनजोड, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, झनक हार, एकदाणी, पदकासह लॉकेट, तांदळ्या हार, तुळशीची माळ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तुळशीची माळ, सुर्यकळ्याचा हार तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने



मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इ. अलंकार परिधान करण्यात आले होते.



### लोकमान्य गणेश मंडळातर्फे आरोग्य शिबिर

**अक्कलकोट, दि.१ सप्टेंबर-**

सामाजिक बांधिलकी जपणारे लोकमान्य गणेश मंडळाच्या श्री गणेशा आरोग्य शिबिराचे उद्घाटन व महाप्रसादाचे वाटप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. या अभियानातून ९६३ रुग्णांची तपासणी करण्यात आली असून यामध्ये एक हृदय व एक यकृत रुग्ण पुढील उपचारासाठी सोलापूर येथे दाखल करण्यात आल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली. मुख्यमंत्री सहायता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या रुग्ण तपासणीत डॉ. अश्विन करजखेडे (तालुका वैद्यकीय अधिकारी), डॉ. कविता देशमुख, डॉ. मंजुनाथ पाटील, डॉ. ज्ञानेश्वर वाघमारे, डॉ. ओंकार माशाळकर, डॉ. स्वप्निल हिप्परगी, डॉ. मयूर बिराजदार आदी डॉक्टरांनी सेवा बजावली. लोकमान्य गणेश मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवित असताना सामाजिक बांधिलकीची जपणूक करीत शहर व तालुक्यातील नागरिकांचे आरोग्य उत्तम रहावे या उद्देशाने श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमामुळे गणेशोत्सवाचा सामाजिक भान अधिक अधोरेखित झाल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमास माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अध्यक्ष सिद्धाराम टाके, भाजपा माजी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, माजी शहराध्यक्ष शिवशरण जोजन, भाजपा अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नन्नूभाई कोरबू, भाजपा मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, उदय नरेगल, निजाप्पा गायकवाड, धोंडाप्पा बनसोडे, रुद्रया स्वामी यांच्यासह लोकमान्य मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.तर परिचारिका व स्वयंसेवक म्हणून अलका विभुते, सिद्धाराम नंदर्गी, अमोल टोणपे, ललिता बंदीछोडे, सुनिता राठोड, सुप्रिया पवार, रूपाली शिरसागर, शिवा कोटी, विजय विजापुरे, श्वेता जाधव, अंकिता गंगापुरे, अंजली परीट यांनी सहभाग घेतला.

## निधन वृत्त...

### मंगल गाढवे



**बार्शी, दि. १ सप्टेंबर**

आडवा रस्ता येथील मंगल पंचाक्षरी गाढवे (वय ८०) यांचे सोमवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर तुळजापूर रोडवरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या बाजार समितीचे माजी संचालक मल्लिनाथ गाढवे, डीसीसी बँकेचे निवृत्त शाखाधिकारी शिवकुमार आणि आडत व्यापारी अनिल गाढवे यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# राज्यातील जनतेकडून मराठा आंदोलकांना मदतीचा ओघ कायम

### मोर्चाचे समन्वयक पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

मराठा आरक्षणाची मागणी घेऊन मनोज जरांगे पाटलांनी आझाद मैदानात गेल्या ४ दिवसांपासून आपल्या उपोषणाला सुरुवात केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत राज्याच्या दाही दिशातून लाखो मावळे मुंबईत आले आहेत. दरम्यान, या मराठा मावळ्यांची अन्न-पाण्याची दखल सरकारने घेतली नसल्याची माहिती राज्यातील सर्वसामान्य जनतेला मिळताच राज्याच्या दाही दिशातून अन्नधान्य आणि कपड्यांच्या मदतीचा प्रचंड ओघ मुंबईकडे येत असल्याची माहिती सोलापूर येथील सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. १) दिली.

मुंबई येथील मराठा आंदोलकांची सध्यस्थिती मांडताना माऊली पवार म्हणाले की, जरांगेदादांसोबत आम्ही सर्वजण गेल्या ४ दिवसांपूर्वी आलो आहोत. राज्याच्या विविध भागातून लाखो मराठा बांधव मुंबईत आल्याने मुंबई जाम झाली असली तरी सरकार या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नसल्याची खंत आहे. पहिल्या दोन दिवसांत मराठा मावळ्याचे अन्न, पाण्यामुळे थोडे हाल झाले; पावसाचा त्रास तितकाच होता. तरीही असंख्य मावळे मुंबईत जागा मिळेल त्या ठिकाणी थांबले मात्र गावाकडे परतले नाहीत. जोपर्यंत आरक्षणाचा निर्णय होत नाही तोवर घराकडे जायचे नाही; असा मराठा समाजबांधवांनी चंगच बांधला आहे. या ठिकाणी युवा वर्ग मोठ्या प्रमाणात आला आहे. जरांगे दादांबरोबर चर्चा करण्यासाठी शासनाचे



काही प्रतिनिधी येवून गेले; शिंदे समिती येवून गेली मात्र आरक्षणाबाबत समाधानकारक चर्चाच झाली नाही. यामुळे आज ४ थ्या दिवशीही जरांगे पाटलांचे उपोषण सुरूच आहे. सध्या जरांगेदादांची तब्बेत बिघडत चालली असून, सरकार या आरक्षणाबाबत लवकर तोडगा काढत नसल्याने मराठा समाज जास्तच आक्रमक होत असल्याचे चित्र आहे. यामुळे राज्य आणि केंद्र सरकारने यावर लवकर तोडगा काढणे गरजेचे आहे.

आरक्षण आंदोलनाला आलेल्या मराठा मावळ्यांसाठी महाराष्ट्रभरातून मदत मोठ्या प्रमाणात येत आहे. इतर काही जाती-जमातीचे लोकही मराठा आरक्षणाला पाठिंबा देत असून, ते सुध्दा मराठा मावळ्यांना मदत पाठवू लागले आहेत. भाकरी, चपात्या, तांदूळ, गहू, पाणी, बिस्कीट, मसाले आणि लोणचे यांसारखे साहित्य मोठ्या प्रमाणात जमा झाले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील खेडेगावांतून शेतकरी बांधवही मदत पाठवत आहेत. आंदोलनाचे दिवस वाढत असल्याने उपासमार होऊ नये, यासाठी हा मदतीचा ओघ सुरू झाला आहे. आलेले साहित्य मराठा आंदोलकांपर्यंत कसे पोहोचवायचे, त्याचे नियोजन कसे करायचे आणि ते खराब होऊ नये याची काळजी कशी घ्यायची, याचा ताण मराठा समन्वयकांवर आला आहे.

सोमवार, दि. १ ऑगस्ट हा आंदोलनाचा चौथा दिवस आहे. मुंबईच्या पूर्व मुक्त मार्गावर वाहतूक सुरू आहे आणि सध्या वाहतूक कोंडी नाही. खाजगी वाहने आणि मराठा आंदोलकांची वाहने या मार्गावरून जाऊ दिली जात आहेत. सकाळी नऊ नंतर कार्यालयाची वेळ सुरू झाल्यावर परिस्थिती बदलू शकते, असा अंदाज आहे. दरम्यान, हे संपूर्ण आंदोलन, मनोज जरांगे-पाटील यांची भूमिका आणि सरकारचं त्यावर काय उत्तर असेल याकडे संपूर्ण राज्याचे सध्या लक्ष लागले आहे. यावार लवकरात लवकर तोडगा काढावा अशी मागणी सर्व सत्रातून होत आहे. परंतू सरकारची भूमिका अजूनही गुलदस्त्यातच असल्याने मुंबईत दाखल आंदलकांचे सरकराच्या भूमिकेकडे लक्ष आहे.

### फडणवीस सरकारने लवकर तोडगा काढावा

जरांगेदादांची तब्बेत दिवसेंदिवस खालावत आहे, यामुळे सरकारने मराठा आरक्षणाला नाना प्रकारचे किचकट निकष लावत न बसता संविधानिक मार्गाने लवकर तोडगा काढण्याची गरज आहे. हा विषय सध्याच्या सरकारने म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य पध्दतीने हाताळल्यास जनता या मुख्यमंत्र्याला डोक्यावर घेवून नाचेल, जर आरक्षणाच्या विषयावर सरकारने योग्य वेळी पाऊल नाही उचलल्यास त्याचे परिणाम सरकारला भविष्यात भोगावे लागणार आहेत.

**- माऊली पवार,**
**सकल मराठा समाज समन्वयक**



# १ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

### न्यायालयाच्या निकालानंतर जप्त केलेले साहित्य नष्ट

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१ सप्टेंबर-**



मंगळवेढा पोलीस स्टेशन अंतर्गत असणाऱ्या विविध गावातून बेकायदा दारु अड्ड्यावर पोलीसांनी सन २०१८ ते २०२१ या कालावधीत छापा टाकून १ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या दारुच्या बाटल्या जप्त केल्या होत्या. दरम्यान हा जप्त मुद्देमाल न्यायालयाच्या निकालानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या परवानगीने ग्रामीण अतिरिक्त पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या उपस्थितीत तो नष्ट करण्यात आला. मंगळवेढा पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या विविध गावामधून वरिष्ठांच्या आदेशानुसार बेकायदा दारु अड्ड्यावर सन २०१८ ते २०२१ या कालावधीत पोलीसांनी छापे टाकून १ हजार ७९८ देशी,विदेशी दारुच्या बाटल्या जप्त केल्या होत्या. या सर्व गुन्ह्याचा निकाल न्यायालयाकडून लागल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या साक्षीने डी. वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे,पो. नि.दत्तात्रय बोरीगिड्डे,पोलीस हवालदार प्रमोद मोरे,दिगंबर गेजगे व अन्य दोन पंच यांच्या साक्षीने हा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.

# संत पेठ महापूर चाळ, बडवेचर झोपडपट्टीतील जाम झालेल्या ड्रेनेजची सफाई

### ॲड. बादल यादव यांच्या पाठपुरावाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. १ सप्टेंबर-**

पंढरपूर शहरातील संत पेठ महापूर चाळ, बडवेचर झोपडपट्टी या भागातील ड्रेनेज तुबंल्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे घरासमोर घाण पाणी साचत असल्याची लेखी तक्रार अँड. बादल यादव यांनी पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर यांच्याकडे दिली होती. सतत पाठपुरावा करून पंढरपूर नगरपरिषद मुख्यधिकारी यांना संत पेठ महापूर चाळ, बडवेचर झोपडपट्टी, या भागातील ड्रेनेज वारंवार जॅम होत. मैला मिश्रित घाण पाणी घरात जात होते. ड्रेनेज जॅम झाले असल्यामुळे पावसाचे पाणी ड्रेनेज मध्ये जात नसल्याने. सगळीकडे घाणीचे साम्राज्य झाले होते.

पंढरपूर शहरातील दाट लोकवस्ती असलेले संत पेठ महापूर चाळ बडवेचर झोपडपट्टी या भागातील वारंवार जाम होणारे ड्रेनेजच्या पायपा नवीन व मोठ्या टाकून कायमस्वरूपीचा ड्रेनेचा प्रश्न मार्गी लावा त्यामुळे या भागातील नागरिकांना घाण पाण्याचा होणारा त्रास कायमस्वरूपी बंद होईल. अँड. बादल यादव, पंढरपूर



ड्रेनेज कायम स्वरूपी बंदोबस्त करावा म्हणून अँड. बादल यादव यांनी अर्ज द्वारे पंढरपूर नगरपरिषद मुख्यधिकारी यांना विनंती केली असता. मुख्यधिकारी महेश रोकडे, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, बांधकाम अभियंता प्रकाश केसकर यांनी त्वरीत लक्ष घालून मुकादम सोळंकी व कर्मचारी यांच्याकडून सर्व जॅम झालेले ड्रेनेजची दुरुस्ती केली. कायम स्वरूपी ड्रेनेज जॅम होत होते. तेथील कुटुंबाना मैला मिश्रित पाणी व घाणी पासून धोका निर्माण होत होता. सर्व ड्रेनेज तुंबले साफ सफाई करून नागरिकांनाची आणी तेथील कुटुंबाची दुर्गंधी पासून सुटका केली.

ड्रेनेज पूर्ण पणे कायम स्वरूपी साफ केल्याने संत पेठ महापूर चाळ, बडवेचर झोपडपट्टी मधील नागरिकांना मधून समाधान व्यक्त होत आहे.

# जायंट्स ग्रुपच्या शिबिरात ८० जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूर व दाजी पेठ येथील आप्पा गणपती प्रतिष्ठान च्या संयुक्त विद्यमाने येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ८० जणांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन आप्पा गणपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरचे प्रेसिडेंट तथा माजी नगरसेवक मेघनाथ येमुल यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व गणपती आरतीने करण्यात आले.

अध्यक्षस्थानी आप्पा गणपती युथ फाउंडेशनचे अध्यक्ष महेश कोडम होते. याप्रसंगी जायंट्स इंटरनॅशनल फेडरेशन फेडरेशन २ बी चे ऑफिसर श्रीनिवास कोंडले, फेडरेशन माजी व्हाईस



प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, सचिव हरिनिवास सोमा, सेडाचे अध्यक्ष आनंद येमुल, मनोहर कोडम, कैलासम वडनाल, विवेक महिंद्रकर, श्रीधर बुरा, अनिल व्हनमाने, हरीश कोंडा तसेच मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.या शिबिरात ८० जणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले. दाजी पेठ आप्पा गणपती प्रतिष्ठानने गणेशोत्सव निमित्त यावर्षी कोल्हापूर महालक्ष्मी मंदिराचा देखावा केलेला आहे. गणेशभक्तांनी याच्या दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन आप्पा गणपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मेघनाथ येमुल यांनी याप्रसंगी केले.

# सिध्देश्वर एक्सप्रेस उद्यापासून मोहोळ स्टेशनवर थांबणार

### पाच वर्षांची प्रतिक्षा संपली

### कोरोना काळात बंद झालेला थांबा पुन्हा मिळाला



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१ सप्टेंबर -**

कोरोनामध्ये बंद झालेला सिद्धेश्वर एक्सप्रेसचा मोहोळ थांबा पुन्हा सुरू करण्यास मंजूरी मिळाली आहे. आता दि. ३ सप्टेंबरपासून सिद्धेश्वर एक्सप्रेस मोहोळ स्टेशनवर थांबणार आहे. मुंबईला जाणाऱ्या या परिसारतील प्रवाशांची सोय झाल्याने आनंदाचे वातावरण आहे.

याबाबतचे अधिकृत पत्र प्राप्त झाले असून अखेर ५ वर्षानंतर मोहोळ येथे सिद्धेश्वर एक्सप्रेस थांबायला सुरुवात होणार आहे. कोरोनापूर्वी मोहोळमध्ये सिद्धेश्वर एक्सप्रेस चेन्नई मेल, सोलापूर-मिरज आणि पॅसेंजर या गाड्या थांबत होत्या. मात्र कोरोनामध्ये देशाचा व्यवहार ठप्प झाल्यामुळे या गाड्या थांबण्याचे बंद झाले. त्यानंतर सर्वत्र गाड्यांचे थांबे सुरू झाले असताना मोहोळ येथे मात्र पूर्वी थांबणाऱ्या गाड्या अजिबात थांबत नव्हत्या. यासाठी भाजपाचे सोलापूर लोकसभेचे तत्कालीन खासदार डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज, भाजपचे राज्यसभेचे खासदार धनंजय तथा (मुन्ना) महाडिक, सोलापूर जिल्हा प्रवासी संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड.अविनाश काळे, भाजपाचे प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, तालुका संघटन सरचिटणीस महेश सोवनी, माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर आदिनी ३ मार्च २०२३ रोजी प्रयत्न केले होते. डिसेंबर २०२४ मध्ये मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मराज मीना यांनी मोहोळ स्टेशनची पाहणी केली होती. त्यावेळी व्यापारी संघटना, वकील, पत्रकार संघटना, विविध राजकीय पक्ष, प्रवासी संघटना आदींनी त्यांना भेटून बंद पडलेल्या सर्व गाड्यांचा थांबा देण्याची आग्रही मागणी केली होती. त्यानंतर लोकसभेच्या नूतन खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्ली येथे एक शिष्टमंडळ या मागणीसाठी नेले होते. त्या शिष्टमंडळात शिवसेना (उबाठा) महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख सीमा पाटील, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा शाहीन शेख, पत्रकार आणि निवृत्त प्रा. चंद्रकांत देवकते, काँग्रेसचे सरचिटणीस संतोष शिंदे, विक्रांत दळवी, ॲड. श्रीरंग लाळे आदिंचा समावेश होता. अशा सर्वांच्या मागणीनुसार गेल्या पंधरा दिवसांपूर्वी थांब्याला अंतिम मंजुरी मिळाली. बुधवार दि.३ सप्टेंबर पासून सोलापूर वरून मुंबईला जाताना रात्री १०:५३ वाजता आणि येताना पहाटे ५:३३ वाजता सिद्धेश्वर एक्सप्रेस मोहोळ स्टेशनमध्ये थांबणार असल्याचे अधिकृत पत्र प्राप्त झाले आहे. यामुळे मुंबई, पुणे, दौंडकडे जाणाऱ्या प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. त्याचबरोबर मुंबई-चेन्नई मेल, कोल्हापूर-कलबुर्गी एक्सप्रेस, सोलापूर-पुणे हुतात्मा एक्सप्रेस, हैदराबाद एक्सप्रेस, कोणार्क एक्सप्रेस यांना थांबा मिळावा यासाठी मागणी केली असून त्याचाही पाठपुरावा नियमितपणे सुरू राहील असे प्रवासी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड.अविनाश काळे आणि भाजप जिल्हा प्रज्ञावंत आघाडीचे माजी सहसंयोजक अविनाश पांढरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# ग्रामपंचायत कर्मचारी भरतीत अनियमितता

### विभागीय आयुक्त कार्यालयासमोर १६ सप्टेंबरला उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

जिल्हा परिषद प्रशासनाने ग्रामपंचायत कर्मचारी भरतीत अनियमितता व दिशाभूल करून कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे. या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मंगळवार दि. १६ सप्टेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर परिषद कामगार युनियनचे सरचिटणीस दिलीप जाधव यांनी दिला आहे.

सन २०२१ नंतर सोलापूर जिल्हा परिषदेत ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या दहा टक्के कोट्यातून राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली नाही. ती करावी म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत जिल्हा परिषद नगर परिषद कामगार युनियनने जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र दिले होते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी या पत्राच्या अनुषंगाने ग्रामपंचायत विभागातील रिक्त जागांबाबत प्रशासनाकडे चौकशी केल्यानंतर सन २०२१ मध्ये ५५ जागा अतिरिक्त भरण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत त्यांनी शासनाला अहवाल दिला. या अहवालावरून शासनाने ज्या अधिकाऱ्यांच्या काळात ही भरती झाली त्यांची चौकशी करून उचित कार्यवाही करावी, असे आदेश दिले. त्यानुसार जिल्हा परिषदेने तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत, सहायक प्रशासन अधिकारी अनिल जगताप, कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवानंद मगे, वरिष्ठ सहायक शेतसंधी यांची विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. दिलीप जाधव यांनी मात्र हा घोटाळा झालाच नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. जिल्हा परिषद प्रशासन दिशाभूल करून गोर गरीब ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर अन्याय करीत असल्याचा आरोप केला आहे. याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनाही निवेदन दिले आहे. पालकमंत्री गोरे यांनी सीईओ कुलदीप जंगम यांना या प्रकरणात लक्ष घालून न्याय द्यावा, असे सुचविले आहे.

युनियनचे सरचिटणीस दिलीप जाधव यांनी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांना दिलेल्या निवेदनात शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या १९ ऑगस्ट २००५ च्या नियमातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद सेवा वर्ग तीन व चारच्या पदावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दहा टक्के आरक्षण लागू केले आहे. यानुसार जिल्हा परिषदेने सन २०२१ च्या भरतीमध्ये एकूण रिक्त असलेल्या १४०४ पदापैकी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवलेल्या दहा टक्के कोट्यानुसार १४१ पदे २४ मे १९ रोजी भरली आहेत. त्यानंतर मार्च २०१९ मध्ये सरळ सेवेची ४१५ रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. पण ही जाहिरात रद्द झाली. त्यानंतर पदभरती झालीच नाही. त्यामुळे पदभरतीबाबत जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले. सन २०२३ च्या जाहिरातीत ६७४ पदे जाहीर करण्यात आली. यानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी ८६ पदे आरक्षित आहेत. पण ही पदे भरलीच गेली नाहीत. तक्रार केल्यावर २०२१ मध्ये ५५ पदे अतिरिक्त झाली आहेत असे सांगण्यात येत आहे. असे असेल तर २०२३ च्या भरतीमध्ये ८६ पदे कशी राखीव ठेवण्यात आली असा सवाल जाधव यांनी उपस्थित केला आहे.

### तीन अधिकाऱ्यांचे वेगळे अहवाल

सन २०२१ च्या भरतीबाबत जिल्हा परिषदेच्या तीन वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी वेगवेगळे अहवाल दिल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी २०२१ मध्ये झालेल्या भरतीनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या १९ जागा शिल्लक असल्याचे नमूद केले आहे. तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांनी १७ जागा शिल्लक असल्याची लेखी माहिती दिली आहे. त्यानंतर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी मात्र २०२१ च्या भरतीत ५५ जागा अतिरिक्त भरल्या गेल्या असा अहवाल दिला आहे. या अहवालावरून शासनाच्या सूचनेनुसार संबंधितांची विभागीय चौकशी सुरू करण्याची संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली आहे.

### हायकोर्टाने दिला असा आदेश

याप्रकरणी युनियन हायकोर्टात गेले होते. हायकोर्टाने जिल्हा परिषदेच्या प्रशासनाला चार आठवड्यात निर्णय घेण्याबाबत सांगितले आहे. आता चार आठवडे पूर्ण होत असल्यामुळे युनियनने आंदोलनाचा इशारा दिला आहे, असे जाधव यांनी सांगितले.

## महालक्ष्मी समोरील आरास



सोलापूर : वसंत विहार येथील रेणुका उंडाळे यांच्या गौराई समोरील आरास.



सोलापूर : संत सेवा संघाचे अध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्या घरातील महालक्ष्मी.



सोलापूर : भवानी पेठ परिसरातील आयसीआयसीआय बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी शरदचंद्र ढोकळे यांच्या गौराई समोरील कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा दरबार साकारला आहे.



सिंधू विहार जुळे सोलापूर येथील माने परिवाराच्या गौराई.



कल्याण नगर येथील चन्नप्पा शरणार्थी यांच्या घरातील गौराई.



सोलापूर : विमानतळ येथील गजानन शिंदे यांच्या गौराई समोरील आरास.



सोलापूर : विमानतळ येथील राहुल मगर यांच्या गौराई समोरील आरास.



पिलीव : येथील रेणुका सुभाष लिमकर यांनी गौराई पुढील देखावा.



पिलीव : येथील अनिता अविनाश जेऊरकर यांच्या गौराईसमोरील देखावा.



माळशिरस : जमदाडे मळा येथील साळुंखे परिवाराने श्री संत गोरा कुंभार यांचा केलेला देखावा.



### मराठा आरक्षणाची धग गौराईसमोर ।

अकलूज : येथाल माळशिरस तालुका फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ माने यांनी गौराईसमोर मराठा आंदोलनाचा देखावा केला आहे.



बार्शी : येथील ओंकार कदम यांच्या घरातील गौरी आरास झाडे लावा झाडे वाचवा हा संदेश देणारा निसर्गाच्या सानिध्यात लक्ष्मीचा वास व आषाढी दिंडी सोहळा आयोजन.

# माढ्यात गौराईसमोर समाज प्रबोधनपर आरास

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १ सप्टेंबर-**

माढ्यात गौराई समोर अनेक ठिकाणी सम ाज प्रबोधन पर आरास करण्यात आले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगरमधील सह्याद्री परिवाराच्या वतीने माँसाहेब जिजाऊ, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या रुपात महालक्ष्मीची उभारणी केली असून मागील २१ वर्षापासून हा परिवार पुस्तकरूपी आरास उभी करुन पुस्तके वाचण्याचा संदेश देण्या बरोबरच सामाजिक संदेश देत आला आहे.

यंदाच्या वर्षी देखील या परिवारातील शारदा शिंदे, धनश्री शिंदे, भाग्यश्री शिंदे यांनी पुस्तकाच्या आरास सोबतच समाजात उच्चशिक्षीत होऊन नोकरदार असो अथवा अन्य मुलां कडून आई-वडीलांचे होत असलेले हाल- आणी राज्यभरात दिवसेन दिवस वृध्दाश्रमांची वाढत चाललेली संख्या या संदर्भातला देखावा सादर केला असुन देखावा पहायला आलेल्या



महिलांना शारदा शिंदे या प्रबोधनात्मक पुस्तके भेट देत आहेत.

सह्याद्री परिवाराचे अध्यक्ष दत्ताजी शिंदे व शारदा शिंदे हे मराठा सेवा संघाच्या विचाराने प्रेरित होऊन काम करत आहेत. देखावा यशस्वी करण्याकामी महिला समवेत संदीप शिंदे, जयदीप शिंदे, शिवतेज शिंदे, संदेश शिंदे, शिवकन्या शिंदेनी हातभार लावला.



विजय पाटील यांच्या घरातील गौराई.



सोलापूर : दोंदेनगर येथील मनिषा व मंजुश्री संगवे यांच्या निवासात महालक्ष्मींच्या आगमनाप्रसंगी वेदा व जिया महालक्ष्मींचे दर्शन घेताना.

## गौराई समोरील सजावट



सोलापूर : मुरारजी पेठेतील श्री. अवस्थी यांच्या घरातील महालक्ष्मी समोरील आरास.



सोलापूर : संतोष नगर येथील संतोष पाटील यांच्या घरी गौरी आरास.



करमाळा : येथील अमोल जाधव यांच्या घरच्या महालक्ष्मीचे छायाचित्र.



सोलापूर - शहरातील जुळेसोलापूर परिसरातील सेवानिवृत्त न्यायालयीन रजिस्टार दौलत सिताफळे यांच्या घरी गौराईसमोर आकर्षक सजावट करण्यात आली आहे.



करकंब : करकंब येथील देवकी ज्ञानेश्वर दुधाणे, अनुपमा गणेश दुधाणे व दुधाणे परिवाराच्यावतीने महालक्ष्मी गौरी गणपती आरासाद्वारे सेंद्रिय शेती काळाची गरज, पाणी आडवा पाणी जिरवा,झाडे लावा झाडे जगवा, डी.जे.बंदी झालीच पाहिजे हा सामाजिक संदेश देत अतिशय सुंदर आरास सादर केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.










## ▶▶ महत्वाचे...

### मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी यांची पदोन्नतीने बदली

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील २० अधिकाऱ्यांना सह संचालक पदावर तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना करण्यात आली आहे. या आदेशांतर्गत सोलापूर महापालिकेतील मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी यांची पुणे कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या सहसंचालक (वित्त) पदी पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. तसे आदेश महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने काढले आहेत.




### बसचा कट लागल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

बसचा कट लागल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. ही घटना सोमवारी दुपारी एकच्या सुमारास महावीर चौकात घडली. सागर गणेश पवार (वय २८, रा. रेणुका नगर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. सोमवारी दुपारी एकच्या सुमारास सागर हा कुमठा नाका येथून रेणुका नगरच्या दिशेने दुचाकीवरून जात होता. महावीर चौकात आल्यानंतर त्याच्या दुचाकीला बसचा कट लागल्याने तो खाली पडल्याने उजव्या पायाला आणि हाताला मुकामार लागला. दुपारी १.५० वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### विद्युत मोटारीचा धक्का लागून महिला जखमी

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

पाणी भरल्यानंतर विद्युत मोटार बंद करताना अचानक विजेचा धक्का लागून महिला जखमी झाली. हा प्रकार कुमठा नाका परिसरातील भारत नगरात रविवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडला. नंदिणी भरतसिंग कजाकवाले (वय ३२) असे महिलेचे नाव आहे. रविवारी सायंकाळच्या सुमारास विद्युत मोटार लावून नंदिणी नळाचे पाणी घरात भरत होत्या. पाणी भरून झाल्यानंतर त्या विद्युत मोटार काढत असताना, त्यांना अचानक विजेचा धक्का लागून त्यांच्या डाव्या हाताला जखम झाली आहे. भाऊ शिवलिंग याने उपचारास सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### सिध्देश्वर तलावातील पाण्यात पडून एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

सिध्देश्वर मंदिर परिसरातील तलावाच्या पाण्यात पडून एकाचा मृत्यू झाला. हा प्रकार रविवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आला. सिराज मक्तुम शेख (वय ५७, रा. न्यू पाच्छा पेठ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. रविवारी दुपारी एकच्या सुमारास सिध्देश्वर तलावातील पाण्यावर तरंगत असताना दिसून आला. पोलिसांनी त्यांना पाण्यातून बाहेर काढून शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. उपचारापूर्वीच मृत पावल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

# घरोघरी गौराईसमोर साकारली विविध रुपे

## सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पौराणिक कथेवर आधारित केली सजावट

**सोलापूर : भाद्रपद महिन्यातील ज्येष्ठा नक्षत्रावर घरोघरी गौरी (महालक्ष्मी) पूजन केले जाते. यावेळी ज्येष्ठा व कनिष्ठा अशा स्वरुपातील महालक्ष्मीची विविध प्रकाराने सजावट केली जाते. हा उत्साह अद्वितीय असा असतो. यामध्ये महिलांचा विशेष सहभाग तर घरातील सर्वांचे सजावट करण्यामध्ये सहकार्य असते.**

(सर्व छायाचित्रे : केवल तिवारी)



**महाशिवरात्री देखावा**
जुनी मिल चाळीतील रवींद्र तळीखेडे यांच्या घरी महाशिवरात्री देखावा करण्यात आला.




**गौराई दंग झाली राधा-कृष्णाच्या रासलिल्यात**
मुरारजी पेठ परिसरातील जुनी पोलिस लाईन येथील क्रांती अमोल व्यवहारे यांच्या घरी गौराईला राधा-कृष्ण रुपामध्ये सजविण्यात आले आहे. तसेच गौराईसमोर श्रीकृष्ण-राधा आणि गोपिका यांचा रासलिलाचा हालता देखावा देखील सादर करण्यात आला आहे.




**‘माझी आई’**
जुनी मिल चाळीतील नागेश सोलंकर यांच्या घरी ‘माझी आई’ देखावा सादर केला आहे



**प्राचीन काली मंदिर**
शहरातील जुनी मिल चाळीतील रहिवासी विठ्ठल खुळे यांच्या घरी प्राचीन काली मंदिराचा देखावा सादर केला आहे.



**बालोद्यान, कारंजे व वारकरी दिंडी**
जुळे सोलापूर येथील बँक कॉलनीमध्ये अश्विनी जोशी यांच्या घरातील गौराईसमोर शाल्मली जोशी हिने बालोद्यान, कारंजे व वारकरी दिंडीचा देखावा साकारला.



**स्मार्ट सिटी**
संतोषनगर येथील प्रशांत पाटील यांच्या घरी स्वच्छता अभियान स्मार्ट सिटी देखावा सादर केला.

# मुलगा पाहिजे म्हणून विवाहितेचा छळ; पतीसह तिघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

मुलगा पाहिजे म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत साजेदा लाडलेमशाक नदाफ (वय २८, रा. बेघर हौसींग सोसायटी नं. ३, विजापूर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती लाडलेमशाक, सासू कोंडीबी, सासरे अल्लाबक्ष (रा. शंकर नगर, होटगी रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ जून २०१९ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजेदा या पती लाडलेमशाक यांच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती लाडलेमशाक व त्याच्या घरातील लोकांनी साजेदा हिस माहेरून पैसे आणण्याची मागणी करून तु आम्हांस पसंद नाही व आम्हांस मुलगा पाहिजे होता असे म्हणून तिचा शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच लाडलेमशाक याने साजेदार हिस हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून घरातून हाकलून देण्याची धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जाधव तपास करीत आहेत.



# सोन्या मारुती गणरायाचे शिक्षणमंत्री पाटील व पालकमंत्री गोरेंच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

मानाचा सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळाच्या गणरायांचे पुजन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याहस्ते करण्यात आली.

सोन्या मारुती गणपती स्वातंत्र्यपुर्वकाळातील मंडळ असुन लालबागच्या राजाला आभुषणे बनविणाऱ्या सुवर्णकारांने सोन्या मारुती गणरायांची आभुषणे बनविले आहे. मंत्री पाटील यांचा सोन्या मारुती गणेशाची प्रतिमा महावस्त्र श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. रात्री उशीरा पालकमंत्री गोरे यांनीही सोन्या मारुती गणरायांचे दर्शन घेतले यावेळी त्यांच्यासमवेत भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची उपस्थिती होती. सदर प्रसंगी मंडळाचे प्रमुख विनायक महिंद्रकर, ज्येष्ठ सल्लागार राम तडवळकर, प्रसाद कुमठेकर, सोनू मंठाळकर, उत्सव अध्यक्ष केदार सोहनी, ज्ञानेश्वर महिंद्रकर, सोपान महिंद्रकर, नंदकुमार कुमठेकर, ओंकार कुमठेकर, सागर हावले, अभिषेक रंपुरे, अभिजीत छत्रबंद, ओंकार वाले, जितेंद्र टेंभुर्णीकर, संतोष कुमार घोडके, गजभार सर, अमर कुलकर्णीसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.





# सोलापुरात विसर्जन मिरवणुकीत डीजेवर बंदी

- पोलीस आयुक्तांचा आदेश; श्री गणेश विसर्जन मिरवणुक, ईद ए मिलाद मिरवणुकीत वाजणार पारंपारिक वाद्ये

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

यंदाची श्री गणेश उत्सव मिरवणूक व ईद ए मिलाद मिरवणुकीत डीजे लावण्यास बंदी घालण्यात आल्याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दिले आहेत. यामुळे यंदा श्री उत्सवाची मिरवणुक ही पारंपारिक पध्दतीने होणार आहे. डीजेमुक्त सोलापूर या चळवळीला यानिमित्ताने यश आले आहे. या आदेशाचा भंग करणा-याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



डीजेमुक्त सोलापूर असा नारा देत हजारो विद्यार्थी रस्त्यार उतरले होते. यासाठी सजग सोलापूरकर समितीतर्फे आयोजित मानवी साखळीला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला होता. तसेच डॉक्टरांनीही मोर्चा काढत डीजे बंद झालाच पाहिजे या मागणीचे पोलीस आयुक्तांना निवेदन दिले होते. दरम्यान जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी डीजे आणि डॉल्बीचा कर्णकर्कश आवाज नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याने जिल्ह्यात डीजे बंदचा आदेश पारित केला आहे.

पोलीस आयुक्तालयात श्री गणेशोत्सवानिमित्त झालेल्या बैठकीतही विविध मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिका-यांनी डीजेबंद बाबत आवाज उठविला होता. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. आबासाहेब माने यांनी घेतलेला पुढाकार हा या चळवळीला दिशा देणारा ठरला. यानंतर शहरातील विविध संस्था तसेच संघटनांनी या चळवळीत उडी घेतली आणि डीजेमुक्त सोलापुरचा आवाज दिल्याने या चळवळीला बळ मिळाले.



पोलीस आयुकत एम. राजकुमार यांनी एक सप्टेंबर रोजी डीजेबंदचा आदेश काढला आहे. यात २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान होणा-या श्री गणेश विसर्जन तसेच ईद ए मिलाद कमिटीकडून आयोजित डीजे सिस्टीमचा वापर केला जातो. यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका व इतर शारिरिक दुष्परिणाम होत असल्याने गणेश विसर्जन व ईद ए मिलाद मिरवणुकीत डीजे लावण्यास बंदी घातली असल्याचा आदेश पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी दिला आहे.

### डॉल्बी बंदीचे आदेश काढले आता अंमलबजावणी महत्वाची

जीवघेण्या डॉल्बीच्या विरोधात सोलापूकरांनी सनदशीर मार्गाने पुकारलेल्या आंदोलनाला यश येत असल्याचे चित्र आहे. सोलापुरातील ज्येष्ठ विधिज्ञ आणि संवेदनशील व्यक्तिमत्व ॲड. धनंजय (आबासाहेब) माने यांच्यासह समाजातील प्रतिष्ठीत, विविध सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती आणि लहानमुलांनी डॉल्बी विरोधात पुकारलेला यल्गार अखेर शासन-प्रशासनाने ऐकलेला आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी जिल्ह्यात डॉल्बी व लेझर बंदीचा आदेश काढला होतो. आता पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी सोलापूर शहरात डॉल्बी व लेझर बंदीचा आदेश काढला आहे. डॉल्बी बंदीसंदर्भात दैनिक तरुण भारतमधून नुकतेच बातमी प्रसिध्द झाली होती की, जिल्हाधिकारी, सीपी, एसपी आणि विविध मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संवेदनशीलता दाखवून डॉल्बी व लेझर बंदीसाठी पाऊल उचलावे. जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाने डॉल्बी व लेझर बंदीचे आदेश काढून सोलापूकरांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. डॉल्बी बंदीचे आदेश काढले आता आवश्यकता आहे ती या आदेशाच्या काटेकोर अंमलबजावणीची होय. नागरिकांना होणारा डॉल्बीचा त्रास अनेकांच्या जीवावर बेतत असल्याने लोकप्रतिनीधी, प्रशासन आणि मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉल्बी बंदीसाठी आता ठाम राहण्याची नितांत गरज आहे.

# अतिवृष्टीने दक्षिणच्या मुस्ती येथील शेतकऱ्याचा घेतला बळी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

अतिवृष्टीने शेतातील पिकाचे झालेल्या नुकसानाने शेतक-याने शेतातील वस्तीत गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी रात्री ७.३० च्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुकयातील मुस्ती गाव परिसरात घडला.

चंद्रकांत गुरुपदप्पा माळगे (वय ८०, रा. मुस्ती ता द सोलापूर) असे शेतक-याचे नाव आहे. चंद्रकांत यांची मस्ती परिसरात तीन एकर शेती आहे. साधारण तीन वर्षापूर्वी त्यांनी बँकेकडून सुमारे दोन लाख इतके कर्ज घेतले होते. शेतातील नापिकीमुळे त्यांना हे कर्ज फेडता आले नाही. त्यामुळे बँक कर्जाचे व्याज वाढत गेले. सध्य स्थितीत एक लाख ८० हजार मुद्दल आणि १.२५ लाख व्याज असे तीन लाखाचे कर्ज त्यांच्या डोक्यावर होते.



गतवर्षीही शेतातील पिकातून त्यांना उत्पन मिळाले नाही. यामुळे त्यांनी नातेवाईक तसेच ओळखीच्या लोकांकडून पुन्हा लाख रुपये हातउसने घेऊन शेतात बोअर घेतला. परंतु मे महिन्यात पडलेल्या पूर्व मोसमी पावसाने माती पडून ती बोअर बंद पडली. त्यानंतरही त्यांनी प्रयत्न सोडला नाही. खरीप हंगामात त्यांनी शेतात मूग, उडीद व कांदयाची पेरणी केली. पीक हातातोंडाला येत असतानाच, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मोठा पाऊस झाला. गत १५ दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाने शेतातील पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचून पिकाचे नुकसान झाले. दरम्यान रविवारी चंद्रकांत शेतात गेले होते. शेतातील पिकाचे नुकसान पाहून त्यांचे मन हेलावले. त्यातूनच त्यांनी रविवारी रात्री ७.३० च्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी रात्री ७.३० च्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुकयातील मुस्ती गाव परिसरात घडला.या याबाबत विरेश माळगे यांनी माहिती दिली. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### नुकसानीचा पंचनामा आम्ही गेल्या आठवड्यात केला

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करण्याचे आदेश काढल्यानंतर मुस्ती येथील गावच्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे २३ ऑगस्टला आमच्या महसूल यंत्रणेने केले आहेत. यामध्ये लक्ष्मण चंद्रकांत माळगे यांच्याही शेतातील नुकसानीचा पंचनामा झाला आहे.

**- किरण जमदाडे,** तहसीलदार, दक्षिण सोलापूर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९६

**पडिला विसर माझा तुजलागी । आता पांडूरंगी करणे काय ।।**
**तुजलागी माझी न येचि करूणा । धरिले की जाण दूरी मज ।।**

पंढरीच्या पांडूरंगाने संत सेनाजींच्या श्रध्देचा, प्रेमाचा मन:पुर्वक स्विकार केला होता. म्हणूनच ते अधिकार वाणीने सेनाजी पांडूरंगाला,

**पडिला विसर माझा तुजलागी । आता पांडूरंगी करणे काय ।।,**

या शब्दांत तुला माझा विसर पडला की काय ? तुला माझी आठवण व्हावी म्हणून मी काय करू ? असे प्रश्नात्मक पण अधिकार वाणीने बोलतात. खरे म्हणजे असे प्रश्नात्मक अधिकारवाणीचे बोल संतच बोलू शकतात. तुकाराम महाराज पांडुरंगाला,

**माझे विषयीं तुज पडतो विसर ।**
**नको धरुं दूर पांडुरंगा ।।,**

असे म्हणतात. आपली ज्याच्यावर श्रध्दा असते किंवा आपले ज्याच्यावर जीवापाड प्रेम असते, त्याच्यावर आपला अधिकार चालतो. अर्थात, आपल्या श्रध्देचा, प्रेमाचा समोरच्याने स्विकार केला तरच अधिकार चालतो.



संसारात अडकलेला जीव स्वार्थापोटी चार दोन उपवास करतो, चार दोन वेळा यात्रेला जातो आणि नको तेवढी मागणी भगवंताकडे करतो. त्याच्या मागणीची पूर्तता झाली नाही, तर दुसऱ्या देवदेवतांचा तो शोध घेतो. स्वार्थापोटी केलेल्या श्रध्दा भक्तीला न ओळखण्याइतपत भगवंत वेडा नाही. असो, ज्याला कुटुंबातील सदस्यावर, शेजाऱ्यापाजाऱ्यावर नि:स्वार्थ प्रेम करता येत नाही, तो भगवंतावर नि:स्वार्थ प्रेम करू शकत नाही, हे लक्षात असावे.

संसारात अडकलेल्या जीवाला सकमेकांवर तसेच अधून मधून भगवंतावर अधिकार गाजवण्यात आनंद वाटत असला तरी खऱ्या अर्थाने ते भगवंतावर अधिकार गाजवू शकत नाहीत. ज्याला स्वत:वर म्हणजे स्वत:च्या मनावर, इंद्रियावर अधिकार गाजवता येतो तो भगवंतावर अधिकार गाजवू शकतो. भगवंताला भक्तांकडून अधिकार गाजवून घेण्यात आनंद वाटत असतो. भगवंतावर अधिकार संतच गाजवू शकतात. संसारात अडकलेला जीव स्वत:च्या मनावर अधिकार गाजवू शकत नाही. उलट मनच त्याच्यावर अधिकार गाजवते. त्यामुळे हा जीव भगवंतावर अधिकार गाजवू शकत नाही. म्हणून हा जीव ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, मीपणा, लोभ, स्वार्थ आदिमध्ये गुरफटतो. असे गुरफटणे त्याला त्याच्या स्वत:पासून दूर नेते. जो स्वत:पासून दूर जातो तो दुसऱ्याच्या जवळ जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे हे भगवंता तुला माझी दया, आठवण कांही येत नाही का ? मला दूर लोटतोस की काय ?,

**तुजलागी माझी न येचि करूणा ।**
**धरिले की जाण दूरी मज ।।,**

असे अधिकारात्मक फक्त सेनाजीच भगवंताला बोलू शकतात. कारण ते ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, लोभ आदिपासून पूर्णत: दूर होऊन मनाला अधिन करण्यात यशस्वी झाले आहेत. संत वचनांप्रमाणे वागले तर असे यश आपणाला सुध्दा मिळवता येऊ शकते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २ सप्टेंबर २०२५ | ज्येष्ठा गौरी विसर्जन, |
| विक्रम संवत् २०८२ | घरगुती गणेश विसर्जन, |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (२७.५२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मूळ (२१.५०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - प्रीति (१६.३८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१५.२२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# भटके विमुक्तांच्या रॅलीत अवतरली लोककला

## पारंपारिक वेशात मरीआईवाले, डोंबारी, नंदीवाले, वैदू, नाथपंथी, डवरी अन् गोसावी






**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर -**

३१ ऑगस्ट हा भटके विमुक्तांचा स्वतंत्र दिन म्हणून शासनाने घोषित केल्यामुळे भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती महाराष्ट्र सोलापूर यांच्यावतीने भटके विमुक्त मुक्ती दिनानिमित्त सांस्कृतिक रॅली काढण्यात आली.

भटके विमुक्त समाजातील बहुरूपी मरीआईवाले, डोंबारी, नंदीवाले, वैदू, नाथपंथी, डवरी, गोसावी इत्यादी समूहातील आपापल्या पारंपारिक वास्तव वेशभूषामध्ये या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आले. भारत जाधव, मल्लेश सूर्यवंशी, शहाजी गडहिरे, यशवंत फडतरे, विजय शिंदे, अप्पाराव राठोड यांच्या हस्ते अर्पण करून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले.

या रॅलीमध्ये सरकारकडे नागरिकत्वाचे विविध पुरावे गृह चौकशीच्या आधारे द्या भटक्या विमुक्त समाजातील स्वतंत्र मंत्रालय व मंत्री असावे, सरकारी जमीनीवर अतिक्रमित जमिनीचे नियमतीकरण करुन भूमिहीनांना जमीन देण्यात यावी. रुढीग्रस्त भटक्या विमुक्त समाज भिक्षेकरी साठी स्थलांतरित होत असतो त्यांना शासनाने ओळखपत्र देण्यात यावे इत्यादी मागण्या घेऊन ही संस्कृती रॅली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते पुनम गेट येथे आल्यानंतर भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती वतिने ठराव वाचण्यात आला. या ठरावांमध्ये शासनाचे आभार मानण्याचा ठराव मांडण्यात आला. महादेवी विभुते, सुनिता मरीआई वाले, शांताबाई विभुते, मल्लेश सूर्यवंशी शहाजी गडहिरे व यशवंत फडतरे यांनी भटक्या विमुक्त समाजाच्या व्यथा भाषणातून मांडल्या.

यावेळी देवेंद्र सैनसाकडे, मडेळपा शरणप्पा पुजारी, विजय शिंदे, यल्लाप्पा तेली, गोविंदा आप्पा सितारे, सोपान पवार, बाबासाहेब शेळके, मुतप्पा भारती, मल्लेश इपोळे, सुनिता शेळके, रमेश शिंदे, मारुती मरीआईवाले, सुनिल डांगे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. मल्लेश सुर्यवंशी, विजय शिंदे, यशवंत फडतरे, रोहिणी गायकवाड, धनलक्ष्मी देशमाने, सुषमा कांबळे, फडतरे, मारुती मरीआईवाले, केवल फडतरे, कपील शंखे यांनी परिश्रम घेतले.

## उत्तम संयम धर्म

मानव जीवन सुंदर, शांत आणि आनंदी करण्यासाठी संयम ही सर्वात महत्त्वाची किल्ली आहे. जैन धर्मातील दशधर्मांपैकी एक प्रमुख धर्म म्हणजे उत्तम संयम धर्म. संयमाशिवाय जीवन म्हणजे विना-दिशेची नौका. ज्याच्या मनात संयम आहे त्याचे जीवन संतुलित आणि पवित्र होते. संस्कृत श्लोक म्हणतो,

**संयमे सर्वमास्थानं संयमे सर्वमगलम्।**
**संयमात् जायते धर्मः संयमः परमं सुखम।।**




संयमातच सर्व मंगल आहे, संयमातूनच धर्म जन्माला येतो, संयम हेच खरे सुख आहे. संयम म्हणजे केवळ आहार किंवा वाणीवर नियंत्रण नव्हे, तर मन, वाणी आणि शरीर या तिन्ही गोष्टींवर नियंत्रण ठेवणे होय. इच्छा, राग, लोभ, मोह या दुर्गुणांवर नियंत्रण ठेवून शुद्ध आचरण करणे म्हणजे संयम धर्म.

**इन्द्रियाणांच सर्वेषां संयमः परमं बलम्।**

इंद्रियांवर संयम ठेवणे हेच सर्वात मोठे बळ आहे. आजच्या वेगवान युगात संयमाचा अभाव सर्वत्र जाणवतो. उतावळेपणा, राग, लोभ आणि स्वार्थ यांमुळे अनेक समस्या निर्माण होतात. पण संयमाचे पालन केले तर मनःशांती मिळते, नातेसंबंध टिकतात आणि समाजात सद्भावना निर्माण होते.विद्यार्थ्यांच्या जीवनात संयमाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. मोबाईल, इंटरनेट, आकर्षणे यामध्ये अडकून पडणारा विद्यार्थी योग्य संयम राखून अभ्यासात लक्ष घालतो तेव्हाच खरे यश मिळवू शकतो. संयमधर्म फक्त वैयक्तिक नाही तर सामाजिक स्तरावरही आवश्यक आहे. जर प्रत्येकाने आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवले, तर शांती, अहिंसा आणि सौहार्द यांचा विकास होईल.

**यो जितेन्द्रियः स पण्डितः**

ज्याने इंद्रिये जिंकली तोच खरा पंडित. उत्तम संयम धर्म, आपल्याला शिकवतो की, इच्छा,वासना आणि राग-लोभावर विजय मिळवणे म्हणजेच खरी साधना आहे. संयमामुळेच मन शुद्ध होते, आत्मा प्रसन्न होतो आणि जीवन परमसुखी होते. म्हणूनच प्रत्येकाने जीवनात उत्तम संयम धर्माचे पालन करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**- प्रा. अजित देवसाळे**
**९८५००९२९७५**

# श्री कालिका गणपती मंडळातर्फे रक्तदान शिबीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

श्री कालिका गणपती मंडळाच्या वतीने रविवारी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. प्रारंभी श्रीं ची आरती उपस्थित मान्यवर किस्ट्रल डेव्हलपर्सचे सर्वा सुनील बुरबुरे व लक्ष्मण कोळी, वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, नागेश शिवशक्ती, कालिका मंडळाचे उत्सव अध्यक्ष शशिकांत बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे श्रींच्या प्रतिमेचे प्रकाशन करून रक्तदानास प्रारंभ करण्यात आला.

७२ जणांनी या शिबिरात रक्तदान केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण कलागते नागेश वडणे, अनिल कुलकर्णी, अजित पाटील, प्रवीण वाले, शुभम उळागड्डे, रणजित मोरे, मल्लिनाथ पोतदार, महेश शिवशेट्टी, चेतन कुलकर्णी, रितेश पाथरीकर, हेमंत हरकारे, अजित कुलकर्णी, सागर दिक्षित, प्रथमेश तुळजापूरकर, ओंकार बिराजदार, प्रथमेश पाथरीकर यांनी परिश्रम घेतले.

## पाणीवेस तालीम गणेशोत्सव मंडळातर्फे सामुहिक अथर्वशीर्ष पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

शहरातील मध्यवर्ती भागातील ११० वर्षे जुना मानाचा पाणीवेस तालीम गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षी विश्वकल्याणासाठी गुरुवार दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता दत्त चौक येथील पाणीवेस गणपती मंडपासमोर सामुहिक अथर्वशिर्ष पठण होणार आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष तुषार पवार आणि शिवराज झुंजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पंढरपूर येथील संदीप कुलकर्णी यांच्या मुख्य पौरोहित्याखाली व मंडळाचे आधारस्तंभ चंद्रकांत वानकर यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम होणार आहे. ११ आवर्तन होणार आहेत. त्याच सोबत श्री गणेश वंदना व शेवटी सर्व महिलांकडून सामुहिक आरती देखील होणार आहे. यावेळी सुमारे ३०० महिलांचा सहभाग राहणार आहे. शेवटी मंडळाकडून सर्वांना प्रसाद वाटप केला जाणार आहे. बुधवार दि. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता बाल वारकऱ्यांचा पखवाज कार्यक्रम आयोजित केला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गणेश विसर्जन मिरवणुकीत सुमारे २५० कार्यकर्त्यांचा लेझीम ताफा सहभागी राहणार आहे. पारंपरिक वाद्यासह ही मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन उत्सव अध्यक्ष तुषार पवार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गणेश वारे, शिवराज झुंजे, राहुल पवार, अर्जुन चव्हाण, शुभम तिवारी, सचिन रेळेकर उपस्थित होते.

## विनाकारण मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

अक्कलकोट रोडवर विनाकारण मारहाण करणाऱ्यांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत आबा नागनाथ काळे (रा. पडगाजी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन चेतन मस्के, एक अज्ञात इसम, सलमान होटगीकर (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ ऑगस्ट रोजी रात्री आबा काळे हे घराचे काम करणारा मिस्त्री प्रकाश गायकवाड सोबत उमर पान शॉप येथे पान खाऊन जात असताना विनाकारण चेतन मस्के व इतरांनी काळे यास शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच सलमान होटगीकर याने हातातील धातूच्या कड्याने काळेच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

# रस्ते दुरुस्ती व विसर्जनस्थळाची तयारी अंतिम टप्प्यात



## श्री गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

सोलापूर : आगामी श्री गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी शहरतील निघरणाऱ्या गणेश उत्सव मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची पाहणी केली. यावेळी त्यांनी हिप्परगा खाण येथील विसर्जन स्थळालाही भेट देऊन तयारीची पाहणी केली.

यावेळी नगर अभियंता सारिका आकुलवार व सहायक अभियंता दिवाणजी यांच्या सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थिती होते. मिरवणुकीदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजवणे,पावसाळ्यात चिखल होणार नाही. हिप्परगा खाण विसर्जन स्थळावर आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबतही विभागीय अधिकाऱ्यांना सूचनाही देण्यात आल्या. परिसरात साफसफाई व विसर्जन ठिकाणी पुरेशी प्रकाशयोजना यावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी संबंधित विभागाला दिले. गणेश विसर्जन हा शहरातील मोठा सांस्कृतिक व धार्मिक सोहळा असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन वाहतुकीची सोय, प्रकाशयोजना, स्वच्छता, पाणीपुरवठा, तसेच पोलिस विभागासोबत समन्वय ठेवून आवश्यक ती कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश नियंत्रण अधिकारी यांना अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिले.

# पारदर्शक बदली प्रक्रियेस गालबोट

**जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेत पारदर्शकता आणल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. एकाच वेळी १२४ उमेदवारांची अनुकंपा भरती करून उमेदवारांना हक्काची नोकरी मिळवून दिली. शिवाय आणखी ५० उमेदवारांची अनुकंपा भरती करण्याचे जाहीर केले आहे.**

सीईओंनी शिक्षण, कृषी, आरोग्य विभागासह ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बदली करताना कुणाचाही मुलाहीजा न ठेवता बदली प्रक्रिया राबविली. शिवाय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार समायोजनाद्वारे बदली केल्याने कर्मचााऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले. बारा वर्षानंतर जिल्ह्यातील ८४ ग्राम सेवकांची बदली करण्यात आली. यावेळी सीईओंनी पाच किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे एकाच गावात ठाण मांडलेल्या ग्रामसेवकांना दणका देत अन्यत्र बदली केली. यावेळी सीईओंनी आमदार, खासदार अथवा अन्य कुणाचेही न ऐकता बदली केली. यामध्ये कुंभारी येथील २० वर्षांपासून काम करणाऱ्या व मंद्रुपमध्ये सात वर्षे स्वग्राम काम करणाऱ्या ग्रामसेवकांचा समावेश आहे. ८४ ग्राम सेवकांपैकी ७५ ग्रामसेवक बदलीच्या ठिकाणी हजर झाल्याने पदभार प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. मात्र आठ ते दहा ग्रामसेवक पदभार न सोडता सीईओंच्या आदेशाला आव्हान देत आहेत. अनेक ग्रामसेवकांनी बदली आदेशाला आव्हान देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत वशिला लावला आहे. दोन ग्रामसेवकांनी विभागीय आयुक्तांकडे अपिल केले आहे. तर उर्वरीत ग्राम सेवक बदली आदेशाला केराची टोपली दाखवित पदभार सोडण्यास तयार नाहीत. मंद्रुपचे ग्रामसेवक नागेश जोडमोटे हे स्वग्राम नियमबाह्य काम करीत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यांनी पदभार न देता तीन महिन्यापासून काम काज सुरु ठेवले आहे.

जोडमोटे यांची गेल्या वर्षी मे महिन्यात बदली झाल्यानंतर सहा महिन्यात पुन्हा प्रभारी पदभार घेऊन कामकाज सुरू केले आहे. विस्तार अधिकारीसह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने बिनधास्त काम करीत आहेत. सीईओंनी आषाढी वारी संपल्यानंतर पदभार न देणाऱ्या ग्राम सेवकांच्या ग्रामपंचायतीचे बँक खाती बंद करणार असल्याचे सांगितले होते. शिवाय दक्षिणच्या बीडीओंनी त्या ग्रामसेवकांचे पगार थांबविणार असल्याचे सांगितले होते. मात्र, दोन्ही अधिकाऱ्यांकडून आदेशाचे पालन करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामसेवक जोडमोटे यांची ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांच्या मागणीनुसार नियमबाह्य मुदतवाढीचा प्रस्ताव देण्यात आला आहे. वास्ताविक पाहता जोडमोटे यांची मूळ सज्जा निंबर्गी असताना त्यांना मंद्रुपमध्ये अधिक 'इंटरेस्ट' असल्याचे दिसून येते. याशिवाय दक्षिणमधील आणखी तीन ते चार ग्रामसेवक बदली ठिकाणी हजर न होता बिनकामाचे पगार घेत आहेत. त्यामुळे बदली झालेले सर्व ग्रामसेवक हजर झाले असताना मुदतवाढीचा प्रस्ताव स्वीकारून सीईओंकडून त्या ग्रामसेवकांना अभय मिळणार का? त्यामुळे सीईओंकडून इतर ग्रामसेवकांसंदर्भात दुजाभाव होणार का? हे पाहावे लागणार आहे.

प्रशासनप्रमुख सीईओंनी बदली केली असताना नियमबाह्य मुदतवाढीचा प्रस्ताव देऊन आदेशाला आव्हान देत आहेत. पुरस्काराच्या नावांनी सीईओंची दिशाभूल करण्यात येत असल्याची चर्चा सुरू आहे. सीईओंनी बदली केलेल्या ग्रामसेवकांवर कारवाई करून पदभार प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज आहे. त्यामुळे सीईओंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मंद्रुपचे ग्रामसेवक पदभार सोडण्यास तयार नसल्याने कुंभारीसह इतर अनेक ग्रामसेवक पुन्हा मूळ ग्राम पंचायतला येण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे बदलीप्रक्रियाच वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. बदलीचे सर्व ग्राम सेवक हजर झाले असताना विशिष्ट ग्रामसेवकांना मुदतवाढ अथवा प्रभारी पदभार देण्यामुळे सीईओंकडून दुजाभाव होत असल्याची चर्चा सुरु आहे. दक्षिणच्या बीडीओंकडून बदली झालेल्या ग्रामसेवकाला बदलीच्या ठिकाणी न पाठवता दुसऱ्या ग्रामपंचायतीचा पदभार देऊन सीईओंच्या आदेशाला केराची टोपली दाखवित असल्याची चर्चा सुरू आहे. मूळ सजा देण्याऐवजी अन्य ग्रामपंचायत पदभार देण्यामागे 'अर्थ'पूर्ण घडामोडी घडल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे बदली प्रक्रियेला गालबोट लागू नये असे वाटत असेल, तर सीईओंनी बदली झालेल्या सर्व ग्रामसेवकांचा पदभार काढून पारदर्शक प्रक्रिया असल्याचे दाखवून देण्याची गरज आहे.



**जिल्हा परिषदेतून**
**अमोगसिध्द मुंजे**
**मो. 9423535294**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्वाचे...



## वेळापुरातील शिबिरात ५० जणांचे रक्तदान

**वेळापूर, दि. १ सप्टेंबर-**

वेळापूर येथील सुन्नी शाही मदिना मशीद येथे जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त नवजवान जुलूस कमिटी, वेळापूर यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत झालेल्या रक्तदान शिबिरात ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे व चैतन्य देशपांडे यांनी भेट दिली. रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाला मुस्लिम संघटनेचे अध्यक्ष खुदबदिन कोरबू, सचिव व माजी उपसरपंच जावेद मुलाणी, नवजवान जल्लोष कमिटी अध्यक्ष सुरज दरवेशी, सचिव अमजद शेख, शाहिद मुलाणी, माजिद मुलाणी, फिरोज शेख, फिरोज पठाण, निसार शेख, रहीम मुलाणी, अशपाक मुलाणी, मोहसीन मुलाणी, वाहिद मुलाणी, साहिल शेख, निहाल शेख, राहत शेख, फैयाज मुलाणी, यासीन मुलाणी, सलमान मुलाणी, हुमायन शेख, जहांगीर आतार, जेद मुलाणी, सोन्या शेख, निहाल शेख, वासिम मुलाणी, राजू इकबाल मुलाणी उपस्थित होते.



## अक्कलकोट तालुका काँग्रेसची बैठक

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीची बैठक अध्यापक विद्यालयात जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी सातलिंग शटगार यांनी निवड झाल्याबद्दल अक्कलकोट तालुका काँग्रेसच्या वतीने तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी सत्कार केला. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष डॉ.सुवर्णाताई मलगोंडा, जिल्हा उपाध्यक्ष अरुण जाधव, मोतीराम चव्हाण, लक्ष्मण भोसले, सिद्राम पवार, मल्लिनाथ हात्ती, जहांगीर शेख उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुवर्णाताई मलगोंडा होत्या. यावेळी युवक काँग्रेसचे नूतन पदाधिकारी यांना जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार गजानन जकिकोर यांनी केले. यावेळी हजरत पटेल, समर्थ भरमशेट्टी, रतनकुमार बिराजदार, हनुमंत फुलारी, प्रथमेश जानकर, अनिल करंडे, अकबर पिरजादे, कमाल मकानदार, गंगाधर बंदीछोडे, मशाक मुल्ला, प्रथमेश जाधव, मल्लिनाथ जांभळे, शिवानंद पाटील, पंडित माळी, सिद्धराम कालीबत्ते, चंद्रकांत महेंद्रकार लाडले साहेब घाटे राहुल चौगुले, दौलत शिंदे, विजय यादव,शरण गोगांव, अभिषेक दिंडोरे, सिताराम कोळी, रेवणसिद्ध नालवार, विनोद राठोड, सेवालाल चव्हाण, लखन जाधव, गणेश चिनवार, विजय स्वामी, हर्षदीप गायकवाड, प्रतीक हाताळे, मौलाली पठाण, संजय तोडनूर ,शिवराया पुजारी, कुणाल जाधव, युनूस पटेल, जाफर पिरजादे, चंद्रकांत महेंद्रकर, विनोद राठोड आदी उपस्थित होते.



## रक्तदान काळाची गरज : पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे

**सोलापूर, दि.१ सप्टेंबर-**

रक्तदान ही काळाची गरज आहे. कोरोना काळात रक्ताची गरज सर्वांना जाणवली. महात्मा बसवेश्वर गणेश तरुण मंडळांनी या आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरामुळे अनेक गरजु रुग्णांना मदत होणार आहे. अशा शिबिरांची गरज असून मंडळाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मंद्रुप पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी केले. मंद्रुप येथील मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर गणेश तरुण मंडळाकडून माळी गल्ली सभागृहामध्ये येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी १०३ जणांनी रक्तदान केले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष माळाप्पा घाले, युवा उद्योजक मिथुन मुगळे, भाजपचे युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष शिवराज कालदे, सिद्धेश्वर ब्लड सेंटर सोलापूरचे नागेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रवी नंदुरे, रवि कालदे, निरंजन ख्याडे , मल्लू घाले, जगदीश हेळकर मंडळाचे उपाध्यक्ष सोमनिगं लच्याणे, संतोष नंदूरे, अक्षय जकूणे ,निंगाप्प ख्याडे, सागर घाले, सिद्धेश्वर नंदुरे, भीमाशंकर लच्याणे, मल्लू हेळकर आदी उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी विनायक ख्याडे, संतोष जकुणे परिश्रम घेतले.

## 'नाच मोरा' गाणे प्रदर्शित

**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

श्रेय पिक्चर कंपनी प्रस्तुत आणि नम्रता सिन्हा निर्मित बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट 'सकाळ तर होऊ द्या'मधील पहिले गाणे 'नाच मोरा' प्रदर्शित झाले आहे.हिमेश रेशमिया मेलोडीजच्या लेबलखाली सादर झालेले हे गाणे प्रेक्षकांची पावले थिरकवेल, यात शंका नाही.मराठी सिनेसृष्टीत संगीत प्रस्तुतकर्ता म्हणून पदार्पण करणाऱ्या हिमेश रेशमिया यांच्यासाठी हा एक विशेष टप्पा असून,या चित्रपटाबाबतची उत्सुकता त्यांनी सोशल मीडियावर व्यक्त केली आहे.शीर्षक जाहीर झाल्यापासूनच चर्चेत असलेल्या 'सकाळ तर होऊ द्या' या चित्रपटातील वैशिष्ट्ये एकामागून एक प्रेक्षकांसमोर उलगडत आहेत, आणि 'नाच मोरा' हे गाणे त्यातील पहिले आणि आकर्षक पाऊल ठरते.हा चित्रपट वेगळ्या आशयावर आधारित असून, मराठी प्रेक्षकांना नवी झलक देण्यास सज्ज आहे. आलोक जैन दिग्दर्शित या चित्रपटात सुबोध भावेच्या खास लूकची चर्चा रंगली आहे, तर मानसी नाईकसोबतची त्यांची जोडी कथेला नवा रंग भरते. या चित्रपटाचे संवादलेखन ओंकार बर्वे आणि अंकुश मारोडे यांनी केले असून, छायांकनाची जबाबदारी सुनील पटेल यांनी सांभाळली आहे. सिनेपोलीस वितरित करणारा 'सकाळ तर होऊ द्या' हा चित्रपट येत्या १० ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

# दररोज सूर्यास्ताच्या किरणाने उजळते गणेशाची मूर्ती

- मंगळवेढ्यात रिध्दीसिध्दी महागणपती मंदिरात विशेष पर्वणी
- गणेशोत्सवात होतेय दर्शनासाठी गर्दी
- उजव्या सोंडेचा नवसाला पावणारा गणपती असल्याची अख्यायिका






**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १ सप्टेंबर-**

मंगळवेढा ही पूर्वी संतांची भूमी म्हणून राज्यभर ओळखली जात होती. सध्या मंगळवेढा शहरामध्ये श्री रिध्दी सिध्दी महागणपती मंदिर उभारल्याने मंगळवेढ्याची एक नवीन ओळख निर्माण होण्यास भर पडली असून श्री गणेश चतुर्थीला हजारो भावीक लगतच्या कर्नाटक राज्यासह अन्य विभागाच्या कानाकोपर्यातून मनोभावे दर्शनासाठी येत असल्याचे चित्र आहे. दरम्यान या गणपतीची मुर्ती उजव्या सोंडेची असल्याने नवसाला पावणारा गणपती म्हणून राज्यभर होतेय ओळख.

मंगळवेढा-पंढरपूर या मार्गालगत मोठ्या मोकळ्या मैदानात श्री रिध्दीसिध्दी महागणपती मंदिर दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी अभिजीत शुभ मुहूर्तावर विधीवत पूजा करुन मंदिर सुरु झाले. हे मंदिर कोणत्याही पुर्वनियोजीत नकाशाप्रमाणे बांधले गेले नाही. या बांधकामासाठी जसजसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे हे बांधकाम पुर्णत्वास गेले. राजस्थान येथील मंदिराचे शिल्पकार मोहनलाल फुलचंद सोमपुरा यांच्या कलेतून हे मंदिर साकारले आहे. तसेच राजस्थान मधील मकराना येथील कुंभारी जातीच्या पाशाणात नागरशैली या वास्तू कलेनुसार बांधले गेले असून या मंदिराचे आयुष्यमान जवळपास एक हजार वर्ष असल्याचेही संगण्यात येत आहे. एकदा श्री रिध्दीसिध्दी महागणपतीजींना आपले आई वडिल श्री शंकर पार्वती यांना भेटण्याची इच्छा झाली होती. दरम्यान यावेळी त्यांनी १६४ गजराज असलेल्या व ९० खांबावर उभारलेल्या रथावर आरुढ होवून ते निघाले होते. यावेळी इंद्रदेवाने ते पाहून त्यांची सेवा घडावी म्हणून १०२ देवनर्तीकांना या रथ सोहळ्यात नृत्य, गायनासाठी सहभागी होण्यास सांगितले. त्यावेळी सर्वांनी या मिरवणूकीत नाच, गात सहभागी झाल्या. हे पाहून श्री गणपतीचे प्रिय वाहन मुषकराज यांनी आपल्या १०६ मुषक सवंगड्यांनाही वेगवेगळ्या प्रकारचे मंगल वाद्य वाजवीत गायन करीत सामील होण्याचा आदेश दिला. त्यामुळे दिमतीला १२ घोडे, १२ उंट, ४ मोर हे सर्व सहभागी झाल्याने मिरवणुकीला शोभा आली व ही मिरवणूक शिवपार्वतीच्या महाला समोर आले असता श्री महागणपतीच्या स्वागतासाठी सुर्यमुषक व चंद्रमुषक उभे राहून त्यांचे स्वागत केले अशी या मंदिराची अख्यायिका व संकल्पना असल्याने त्याच धर्तीवर या मंदिराचे बांधकाम केले गेले आहे.




### मंदिराची वैशिष्ट्ये

मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये श्री रिध्दीसिध्दी महागणपतीचे दर्शन घेवून बाहेर आल्यावर आतील प्रदक्षिना मार्गावर असलेल्या २३ ओवऱ्यामध्ये (छोटी मंदिरे) व बाहेरील प्रदक्षिना मार्गावर असलेल्या २१ ओवऱ्यामध्ये (छोटी मंदिरे) देवी देवतांच्या सर्व जाती धर्मातील साधू संतांच्या ५५ मुर्ती व श्री रिध्दीसिध्दी महागणपतीची मुर्ती अशा एकूण ५६ मूर्तीची प्रतिष्ठापना बुधवार दि.१४ फेब्रुवारी २०२४ रोजी अभिजीत शुभमुहूर्तावर विधीवत व वेधशास्त्र पध्दतीने गुरुजनांकडून संपन्न झाली आहे. श्री महागणपतीची मुर्ती जयपूर येथील मुर्तीकाराने उच्च जातीच्या अखंड पाषाणात (मार्बल) ही मूर्ती बनवली आहे. दरम्यान या मंदिराचे बांधकाम करताना सुर्योदय-सुर्यास्त यांचे योग्य नियोजन करुन मंदिराची रचना केली आहे. सदरचे मंदिर हे पश्चिमाभिमुख असल्याने या मंदिरातील श्री रिध्दीसिध्दी महागणपतीच्या मूर्तीवर सुर्यास्ताच्यावेळी सुर्याची किरणे मुर्तीच्या पायापासून डोक्यापर्यंत मूर्तीला उजळून टाकत असल्याने गाभाऱ्यात विद्युत रोषणाई केल्याचा भास तयार होत आहे. मंदिराच्या बाहेरील प्रांगणामध्ये दोन अष्टसिध्दी मंगल दिपस्तंभ व दोन तुळशीवृंदावन आहेत. अष्टसिध्दी मंगल दिपस्तंभावर हिंदू धर्म शास्त्रातील अष्टशुभ चिन्हे (ॐ, श्री, स्वस्तिक, शंख, त्रिशुळ, कमळ, दीप, मंगलकलश) आदी कोरलेले आहेत. तुळशी वृंदावनामध्ये रामतुळस वृंदावन म्हणजे हिरव्या पानाची तुळस व शामतुळस वृंदावन म्हणजे लाल काळसर रंगाची तुळस आहे. दिपस्तंभ व तुळशीवृंदावनाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वर्षातील अकरा संकष्टीला ११ प्रदक्षणा घातल्यास त्या भक्तास त्याची इच्छीत फलप्राप्ती होत असल्याचे गणेश पुरानात सांगीतले असल्याने भाविकांची दृढ श्रध्दा बसल्याने नवसाला पावणारा गणपती असा लौकीक असून प्रत्येक गणेश चतुर्थीला हजारोच्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी हजेरी लावत आहेत.

येथील श्री रिध्दीसिध्दी महागणपती मंदिरातील पुजेचा मान हा दैनंदिनी वैभव कुंभारे, रमेश स्वामी,गजानन कुलकर्णी,अनुज शुक्ला (मध्यप्रदेश) यांना असून सकाळी ७ वाजता,सायंकाळी ७ वाजता यावेळी पुजा होते. तर दुपारी १२ वाजता नैवद्य दाखविला जातो. रात्री १० च्या दरम्यान शेज आरती करुन मंदिर दर्शन बंद केले जात असल्याचे सांगण्यात आले. हे मंदिर उभारण्यासाठी अध्यक्ष अशोक कोळी यांनी परिश्रम घेतले असून ते मुंबई येथे कस्टम विभागात वरिष्ट अधिकारी पदावर कार्यरत होते. सध्या ते सेवानिवृत्त झाल्याने त्यांनी गणपती मंदिर बांधण्याचा संकल्प हाती घेवून तो पुर्णत्वास नेला. राज्यातील अष्टविनायक गणपती सोबत मंगळवेढ्यातील रिध्दीसिध्दी गणपतीलाही अधिक महत्व प्राप्त होत असल्याने संकष्टीला जवळपास १० हजार तर दैनंदिनी १ हजार भाविक दर्शनाचा लाभ घेत असल्याचे चित्र आहे.

## महिलेला अपशब्द वापरत विनयभंगाचा प्रकार

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

बार्शीतील सिद्धार्थनगरात एका विवाहित महिलेस विनयभंग केल्या प्रकरणी संशयित अभिषेक दत्ता शितोळे (रा. सिध्दार्थनगर) या तरुणाविरुद्ध पोलीसात तक्रार दाखल आहे. घटना अशी की, फिर्यादी महिला आपल्या भावजयीसोबत बांगड्या आणण्यासाठी बाजारात गेली होती. रात्री परत येताना स्थानिक किराणा दुकानाजवळ आरोपी तरुणाने तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून हाताला धरुन ओढण्याचा प्रयत्न करुन लज्जास्पद वर्तन केले. यावेळी पीडित महिलेनं आरडाओरड केल्यावर तिच्या भावाने सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी तरुणाने त्यालाही शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे पीडित महिलेने शहर पोलीसात गुन्हा नोंदवला आहे.

# चैतन्य पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

**यंदा दोन लाखांचा झाला नफा**



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १ सप्टेंबर-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील चैतन्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन रामचंद्र उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत संपन्न झाली.

सचिव रघुनाथ नरळे यांनी विषयाचे वाचन करून गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची माहिती दिली. ताळेबंद, तेरीज पत्रकातील नफा-तोटा पत्रकाचे वाचन करून जमाखर्चाची माहिती दिली. संस्थेचे एकूण ६६५ सभासद असून संस्थेची वार्षिक उलाढाल ३ कोटी ५५ लाख एवढी झाली असून जमा खर्च पाहता संस्थेस २ लाख २१ हजार एवढा निव्वळ नफा झाल्याचे त्यांनी सांगितले. आर्थिक वर्षात एकूण ६२ लाख रुपये कर्ज वाटप झाले असून कर्जाची ४५ टक्के एवढी वसुली झाली आहे. सध्याची संक्षेप ठेव तथा पिग्मी दररोज ४० हजार रुपये पेक्षा जास्त असून कर्ज मर्यादा तीन लाख एवढी ठेवली आहे. यावेळी ऑडिटर अनिल खटावकर यांनी संस्थेच्या ऑडिटविषयी व संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती दिली. विद्यमान ऑडिटर अनिल खटावकर यांचीच पुढील वर्षीच्या ३१ मार्च २०२६ अखेर ऑडिटर म्हणून नियुक्ती करण्याचे सर्वानुमते ठरले. यावेळी संचालक अरिफ खान पठाण यांनी मनोगत व्यक्त केले. चेअरमन देशमुख यांनी सभासदांचे आभार व्यक्त करताना थकबाकी असलेल्या कर्जदारांनी कोर्ट कारवाई टाळण्यासाठी व संस्थेचे कामकाज सुरळीत चालून आर्थिक प्रगती साधण्यासाठी आपल्याकडे असणारी कर्जाची थकबाकी वेळेत भरण्याचे आवाहन केले.

यावेळी डॉ. मिलिंद गुळभिले, प्रभाकर वाघमारे, विठ्ठल भिषण, संग्राम पाटील, दामोदर लोखंडे, अशोकभाऊ घोंगडे, अशोक खलीपे, चंद्रकांत खलिपे, राजेंद्रसिंग जामदार, लक्ष्मण काळे, कल्याण जावळे, कुमारसिंग भैस, प्रा. संतोष शेंडगे, विठ्ठल सदेवाले , सचिव रघुनाथ नरळे उपस्थित होते. यावेळी कर्मचारी विठ्ठल जाधव, गणेश ढेकळे अशोक राजमाने यांनी परिश्रम घेतले.

## राजेंद्र मोलाणे सेट परीक्षा उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ सप्टेंबर -**



रयत शिक्षण संस्थेचे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय बिजवडी येथे कार्यरत असलेले उपशिक्षक राजेंद्र अंकुश मोलाणे -भोसले (रा.गादेगाव ता.पंढरपूर ) हे यूजीसी पुणे विद्यापीठा मार्फत घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक (सेट-मराठी) परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोलाणे मळा या ठिकाणी झाले.तसेच महाविद्यालयीन शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर या ठिकाणी झाले.या अगोदरच त्यांनी सोलापूर विद्यापीठाच्या मराठी व इंग्रजी विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी संपादन केलेली आहे. नुकतीच त्यांची शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी मधून रयत शिक्षण संस्थेमध्ये उपशिक्षक पदावर नेमणूक झालेली आहे.अत्यंत खडतर प्रवासातुन त्यांनी हे यश संपादन केले आहे.

## मुलीस फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी अज्ञाताविरूद्ध गुन्हा

**मंगळवेढा, दि.१ सप्टेंबर-**

मंगळवेढयाच्या ग्रामीण भागातून एक १७ वर्षीय मुलीस कोणीतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून अज्ञात व्यक्तीविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी, यातील १७ वर्षीय मुलगी ही अन्य तालुक्यातील असून ती दि.२८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता ती भावासह मंगळवेढयातील एका गावात आली होती. आई घरात स्वयंपाकाचे काम करत असताना काही वेळानंतर आईने सदर मुलीस बाहेर जावून अर्ध्या तासाने पाहिले असता ती अल्पवयीन मुलगी घराबाहेर दिसून आली नाही. तिचा सर्वत्र नातेवाईकाकडे शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याने तिच्या आईने पोलिसात अज्ञाताविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# हनुमान हायस्कूलमध्ये रोपांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १ सप्टेंबर-**

तांदुळवाडी (ता. माळशिरस) येथील हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये एक पेड माके नाम या उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी ते ८ वीतील विद्यार्थ्यांना प्राचार्य एम. एम. देवकर यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले.




आईच्या नावाने रोपटे लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या रोपाचा वाढदिवस दरवर्षी साजरा करण्याची शपथ घेतली. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. वृक्ष लागवड ही काळाची गरज असून पर्यावरणाचे रक्षण, हवामानाचा समतोल व शुद्ध श्वास यासाठी वृक्ष उपयुक्त आहेत, याची जाणीव या उपक्रमातून करून देण्यात आली. एन. डी. कोडग यांनी सूत्रसंचालन केले.

# कोणत्याही कामाचे यश हे कृतीतूनच

**डॉ. धानय्या कवटगीमठ : खेडगी महाविद्यालयातील व्याख्यानात गुंफले चौथे पुष्प**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ सप्टेंबर-**

केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे या उक्तीच्या अर्थाप्रमाणे कोणतीही गोष्ट केवळ विचार केल्याने किंवा इच्छा धरल्याने होत नाही, तर त्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. म्हणजेच, कोणत्याही कामाचे यश हे कृतीतूनच मिळते, आणि कृती हाच देव आहे, असे मानून प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मंगरुळे प्रशालेतील सहशिक्षक तथा सेट नेट परीक्षेतील विश्वविक्रमवीर व्याख्याते डॉ. धानय्या कवटगीमठ यांनी केले.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालय व महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेशोत्सवानिमित्त यंदाच्या पहिल्या वर्षी आयोजित बौद्धिक व्याख्यानातील 'खडतर प्रवासातून हमखास यश' या विषयावरील चौथे पुष्प गुंफताना डॉ. कवटगीमठ बोलत होते.अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले हे होते. व्यासपीठावर उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत जिड्डीमनी, उपाध्यक्ष श्रीमंत बुक्कानुरे, सचिव दत्तात्रय होटकर, संचालक मंडळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्राचार्य डॉ. धबाले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. सी. डी. आणेकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले तर संचालक विरुपाक्ष कुंभार यांनी आभार मानले. यावेळी माजी मुख्याध्यापक धुळप्पा भजे, राचप्पा वागदरे, रमाकांत राजापुरे, पालक वर्ग, प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकपात्री प्रयोगातून उलगडले संत तुकारामांचे चरित्र

**विवेकानंद प्रतिष्ठानच्या व्याख्यानमालेत योगेश सोमणांनी केले सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ सप्टेंबर-**




श्री तुकाराम महाराज संतांचे संतश्रेष्ठ, नस्तीकांते नास्तिक, बंडखोरातील बंडखोर, क्रांतिकारकांचे क्रांतिकारक, भक्तांतील परमभक्त, शतकानुशतके आपल्या विचारांचा, कवित्वाचा ठसा मानवी जीवनावर उमटवणारा महामानव संत तुकाराम महाराज होते. असे योगेश्वर लिखित आनंद स्वरूप सादरकर्ते योगेश सोमण एक पात्री नाटकातून बोलत होते.

ते विवेकानंद प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सव व्याख्यान मालेच्या चौथे पुष्प गुफतांना योगेश सोमण बोलत होते. कार्यक्रमाचे शुभारंभ दीप प्रज्वलन गणेश प्रतिमा पूजन उपस्थित मान्यवर आनंदडोही कलावंत योगेश सोमाण -प्रशांत शिंपी, प्रताप भोसले सुरेश पाटील व खंडेराव घाटगे यांचे हस्ते करण्यात आला. योगेश सोमण याचे सत्कार डॉ.बसवराज चिणकेकर याच्या शुभ हस्ते करण्यात आले.

आनंदडोही नाट्य सादर करताना सोमण म्हणाले अशा या संत श्रेष्ठाचा जीवन वेध घेतलाय या नाट्य प्रयोगातून.इंद्रायणीच्या डोहात गाथा बुडवल्या आणि तेरा दिवसांनी त्या तारल्या गेल्या. या तेरा दिवसातील तुकाराम बुवांचा आणि आवलीचा आपल्याशी आणि आत्म्याशी घडलेला संवाद म्हणजेच आनंदडोह हि कलाकृती. आनंदडोही नाट्य सादर करताना श्री तुकाराम महाराजांचे विचार जीवनातील नाट्य अत्यंत प्रभावीपणे या कलाकृतीत सोमण यांनी मांडले आहे.

यावेळी प्रवीण शहा, शिवानंद वाले अशोक पोतदार, गुरुपाद आळगी, मल्लिनाथ मसुती, विलास कोरे, अप्पा हलगुनकी महेश कापसे, आप्पासाहेब पाटील उपस्थित होते. निशिगंधा कोळी यांनी सूत्रसंचालन केले. बापूजी निंबाळकर यांनी परिचय करुन दिला. चंद्रकांत दसले यांनी आभार मानले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



मोडनिंब (ता.माढा) : येथील राजेश पाटणे यांचे घरी गौरींच्या आगमनानिमित्त 'श्री शिवाय नमस्तुभ्यं' संकल्पनेवर देखावा साकारण्यात आला. दोन गौरी महादेवाच्या पिंडीला पाणी अर्पण करताना भक्तिमय देखावा साकारला.



## महालक्ष्मी समोरील आरास



पिलीव : येथील विजयालक्ष्मी गोरे यांच्या गौराई पुढील देखावा.



अकलूज : येथील सुवर्णा लोळगे यांच्या घरी महालक्ष्मी समोरील आरास.



अकलूज : शंकर नगर (अकलूज) येथील शामा चंद्रकांत कुंभार यांच्या घरातील गौरी महालक्ष्मी सजावटीचा देखावा.



मंद्रूप (ता.द.सोलापूर) : येथील अनिल कामतकर यांच्या घरी गौराई समोर 'ऑपरेशन सिंदूर' देखावा करण्यात आला आहे.



कुंभारी (द.सोलापूर) : येथील माजी ग्रामपंचायत सदस्य पार्वती स्वामी यांच्या घरी श्री 'स्वामींचा दरबार' हा देखावा सादर केला आहे.

# अकलूजचा आठवडे बाजार दर्जेदार करणार

## शिवतेजसिंह मोहिते-पाटील : बाजार व्यवस्थापन बैठकीत शेतकरी, व्यापाऱ्यांना दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ सप्टेंबर-**

शेतकरी व व्यापाऱ्यांची योग्य ती सोय करून ग्राहकांनाही सुविधा देऊन अकलूजचा आठवडे बाजार दर्जेदार करणार असल्याचे आश्वासन अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी दिले.

नवीन बाजारतळावर आयोजित बाजार व्यवस्थापन संदर्भातील बैठकीत ते बोलत होते. यावेळी नगरपरिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, बांधकाम विभाग प्रमुख धोंडीराम भगनुरे, विद्युत विभागाचे पवन भानवसे, आरोग्य विभागाचे मेहबूब शेख, तसेच नितीन काकडे, सुनील काशिद यांच्यासह सर्व विभागांचे कर्मचारी, व्यापारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मोहिते-पाटील म्हणाले की, शेतकरी व व्यापाऱ्यांच्या मागण्या समजून घेतल्या असून सर्वांना एका छताखाली बसवले तर व्यवसायाला चालना मिळेल. शेतकरी व व्यापाऱ्यांना बसण्यासाठी सध्या ३ कोटी ३३ लाख खर्च करून शेड उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. यातून ३०० जणांची सोय होईल. उर्वरित २०० ते २५० जणांसाठीही आवश्यक जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सध्या अकलूजच्या आठवडे बाजारात सुमारे ५०० व्यापारी व शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी येतात. सर्वांना सरकारी जागेत योग्य सुविधा देऊन आधुनिक बाजारपेठ उभी करणे हे आपले उद्दिष्ट आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शेतकरी व व्यापाऱ्यांनी बाजार व्यवस्थापनात सहकार्य करत मुख्य रस्त्याच्या कडेला बसू नये, असे आवाहन करण्यात आले. ग्राहकांची व वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठीही त्यांनी एकजुटीने पुढाकार घ्यावा, असे आवाहनही मोहिते-पाटील यांनी केले.

या बैठकीत व्यापारी व शेतकऱ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. नगरपरिषदेकडून ते प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशा सूचना मोहिते-पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## सिद्धेश्वर एक्सप्रेसचा मोहोळ थांबा पुन्हा सुरू

### खा. प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ सप्टेंबर-**

मोहोळ तालुका व परिसरातील प्रवासी, व्यापारी, शेतकरी आणि भाविकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. कोरोना काळापासून बंद असलेला सिद्धेश्वर एक्सप्रेस (गाडी क्र. १२११६ सोलापूर-मुंबई व १२११५ मुंबई-सोलापूर) याचा मोहोळ रेल्वे स्थानकावरील थांबा पुन्हा सुरू करण्यास मंजुरी मिळाली. आज त्याबाबतचा अधिकृत आदेश जाहीर झाला आहे. खा. प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

हा महत्त्वपूर्ण निर्णय खासदार प्रणिती शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शक्य झाला. त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदनाद्वारे ही मागणी केली होती. या निर्णयामुळे मोहोळ व परिसरातील प्रवासी वर्ग, व्यापारी व शेतकरी यांना प्रवास अधिक सुलभ होणार असून वेळेची बचतही होणार आहे.स्थानिक नागरिक, व्यापारी व शेतकरी यांनी या प्रयत्नांसाठी खा. प्रणिती शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## पंढरपुरात 'नमो ज्ञानेश्वरा' सांगितिक जीवनपटाने रसिक मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ सप्टेंबर-**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या संगीत महोत्सवात 'नमो ज्ञानेश्वरा' हा भावार्थ देखणे यांच्या निवेदनातून आणि अवधूत गांधी, प्रियांका चौधरी यांच्या सुमधुर स्वरातून ज्ञानमय झाला.





कार्यक्रमाच्या सुरुवातीला विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, प्रकाश महाराज जवंजाळ, व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखाधिकारी मुकेश आणेचा, संजय कोकीळ आणि सर्व कलाकार मंडळी यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

त्यांनी सुरुवातीला ओम नमो ज्ञानेश्वरा, आजी सोनियाचा दिनू, अवघाची संसार सुखाचा करीन आदी ज्ञानेश्वर माऊलींचे अभंग गात निरुपणकार भावार्थ देखणे आणि पूजा देखणे यांनी माऊलींच्या जन्मापासून ते आळंदी येथे समाधी घेईपर्यंतचा जीवनपट संगीत अभंग आणि अभंगांच्या रुपातून उलगडून सांगितला. यावेळी प्रत्यक्षात माऊलींच्या काळात घेऊन गेले आणि कार्यक्रमाची सांगता ब्रह्माची पुतळी मीचि पै झालो या भैरवीने करीत शेवटी पसायदानाने आपली गायन सेवा विठूरायाच्या चरणी समर्पित केली.

यावेळी त्यांना तितकीच सुंदर साथसंगत हार्मोनियम अभय नलगे, तबला चैतन्य पवार, पखवाज राजेंद्र बघे, टाळ प्रसाद भांडवलकर यांनी करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.

दरम्यान सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि मंदिर समितीचे सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रभारी कार्यकारी अधिकारी सचिन इथापे, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखाधिकारी मुकेश आणेचा यांचे उपस्थितीत झालेल्या संगीत कार्यक्रमास विठ्ठलभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यापुढेही तीन दिवस चालणाऱ्या या गणेशोत्सव संगीत महोत्सवाला उपस्थित रहावे असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात आले आहे.



## मोडनिंब परिसरातील 'शिदोरी' मुंबईकडे

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १ सप्टेंबर-**

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरू आहे. आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा बांधवांना जेवणाची सोय व्हावी यासाठी मोडनिंबसह परिसरातील गावकऱ्यांनी 'शिदोरी' म्हणून अन्नसामग्री मोठ्या प्रमाणात जमा करून विशेष वाहनाने मुंबईकडे रवाना केली.

माढा तालुक्यातील मोडनिंब, बावी, अरण, पडसाळी, जाधववाडी, बैरागवाडी, गिड्डेवाडी, उंबरे, सोलंकरवाडी, तेलंगवाडी आदी गावांतील म राठा बांधवांनी भाकरी, फरसाण, शेंगाचटणी, ठेचा, बिस्किट, चिवडा, शेवचिवडा,पाण्याच्या बाटल्यांचे बॉक्स यासह विविध खाद्यपदार्थांची शिदोरी दिली. अनेक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत

रविवारी दिवसभर मोडनिंब व परिसरातील विविध भागातून मुंबईतील समाज बांधवांसाठी अन्नपदार्थ मोठ्या प्रमाणावर जमा झाले.

## गौरी पूजनानिमित्त महापुरुषांच्या पुस्तकांचा देखावा

### जेऊरच्या खटके कुटुंबियांकडून महामानवांची आरास

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१ सप्टेंबर-**

जेऊर (ता. करमाळा) येथील जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा कार्याध्यक्ष प्रियांका खटके यांच्या घरी महानमाता यांच्या प्रतिमेचे पूजन व पुस्तकांची आरास राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्यामाई होळकर, शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, माता रमाई यांच्या प्रतितेचे पूजन करून गौरी पूजन झाले.



गौरीसमोर महापुरुषांच्या पुस्तकांचा देखावा करण्यात आला. पुस्तकांमध्ये सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध, जिजाऊंचे जीवनचारित्र, तुकाराम महाराजांची गाधा, चार्वाक, भारताचे संविधान, संभाजी महाराजांचे बुधभूषण ग्रंथ, अहिल्याबाई होळकरांचे जीवनचरित्र, संतविचारांचे पुस्तक, शिवचरित्र, संत गाडगेबाबांच्या विचारांची पुस्तके, शहिद भगतसिंग या पुस्तकांनी लक्ष वेधून घेतले.

# अकलूजमध्ये गौराईसमोर अवतरली तुकोबांची गाथा

### देशमुख परिवाराचे प्रबोधनात्मक देखाव्याचे सहावे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ सप्टेंबर-**

अकलूजच्या मोहनराव देशमुख कुटुंबाने यंदा गौरईंसमोर 'तुका आकाशाएवढा' हा देखावा साकारला आहे. संत तुकाराम म हाराजांची गाथा जरी इंद्रायणी नदीत बुडवली गेली असली तरी त्यांच्या अभंगातील विचार आजही तरंगत असल्याचा प्रबोधनात्मक देखावा त्यांनी उभा केला आहे. सामाजिक विषयांवर देखावा साकारण्याचे हे त्यांचे सहावे वर्ष आहे.



या देखाव्यात तुकोबा इंद्रायणीच्या डोहात गाथा सोडताना दिसत आहेत मात्र तीच नदी पुढे प्रवाहित होत असताना गाथेतील अभंग महापुरुषांच्या कृतीतून तरल्याचे पाहून गाथा जिवंत झाल्याचा प्रत्यय येत आहे.

'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या तुकोबांच्या अभंगानुसार सावित्रीबाई फुलेंनी बहुसंख्य लोकांच्या विरोधात जाऊनही सत्य स्वीकारले आणि शैक्षणिक क्रांती केली हा प्रसंग नदीतून अभांगला नवसंजीवनी देतो.

तुकोबा आणि शिवबा हे या मातीचा प्राण आहेत. या दोहोंचा विचार म्हणजे महाराष्ट्र धर्म होय. या गुरू शिष्य भेटीचा घडलेला प्रसंग गौरईंसमोर पाहताना भक्ती शक्तीच्या संगमाची अनुभूती येते. तुका म्हणे मायबापे, अवघी देवाची स्वरूपे हा देखावा सांगत आहे की आई वडील म्हणजे ईश्वराचे स्वरूप होत. आई वडीलांची सेवा हीच ईश्वराची पूजा होय. वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणत तुकोबांनी दिलेला पर्यावरण संवर्धनाचा संदेश देखाव्यातील आकर्षण आहे.

संत तुकाराम महाराज हे मानवी जीवनाचे एक श्रेष्ठ भाष्यकार होते. इंद्रायणीच्या डोहात बुडालेले वैभव लोकगंगेमध्ये मात्र यशस्वीपणे तरले आहे. चांगल्या विचारांच्या रुपात असलेला तुकोबा असंख्य लोकांच्या वाणीतून, कृतीतून आजही स्वतः चा प्रत्यय देत आहे, हीच देखावा साकारण्यामागची मूळ संकल्पना आहे.- **मोहनराव देशमुख, अकलूज**

'जे का रंजले गांजले त्यासी म्हणी जो अपुले तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा' या अभंगाचा सिंधुताई सपकाळ खऱ्या अर्थाने गाथेतील विचार जिवंत ठेवताना दिसतात. पुढचा नदीत तरंगणारा अभंग आहे 'असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे.

संतश्रेष्ठ तुकारामांनी अभ्यास म्हणजे सायास, प्रयास, प्रयत्न, सराव, मेहनत. जीवनात कोणत्याही प्रकारची परिस्थिती आली तरी तुम्ही दृढनिश्चय केलात तर तुमची स्वप्ने सत्यात उतरवू शकता असा संदेश देणारे डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे अभांगला देखाव्यातून सार्थ ठरतात.